# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूर शिक्षण केंद्र

## मध्ययुगीन भारतातील संप्रदाय
## (Devotional Cults in Medieval India)
## (1206-1750)

(शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून)

**एम. ए. भाग-१**

**इतिहास**

HIST-206 (Optional Paper)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०१८
एम. ए. भाग - १ करिता (मध्ययुगीन भारतातील संप्रदाय)
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती :** ५००

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-81-939381-7-1

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

★ दूर शिक्षण विभाग-विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या विकसन अनुदानातून या साहित्याची निर्मिती केली आहे.

## दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ सल्लागार समिती ■

**प्रा. (डॉ.) डी. बी. शिंदे**
मा. कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II,
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) ए. एम. गुरव**
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) भारती पाटील**
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. डी. राऊत**
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. एम. ए. काकडे**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. व्ही. टी. पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. ए. अनुसे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ इतिहास समन्वय समिती ■

अध्यक्ष - **प्राचार्य डॉ. ए. एल. बेलवटकर**
मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालय, इस्लामपूर, जि. सांगली

- **डॉ. व्ही. आर. पाटील**
  आर्टस् कॉलेज, कोवाड,
  ता. चंदगड, जि. कोल्हापूर
- **प्रा. डॉ. नंदा पारेकर**
  इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

| | |
|---|---|
| दूर शिक्षण केंद्र,<br>शिवाजी विद्यापीठ,<br>कोल्हापूर | **(मध्ययुगीन भारतातील संप्रदाय)**<br>**एम. ए. भाग–१ : इतिहास** HIST 206 |

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **प्रा. आर. के. देशमुख**<br>यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, पाचवड, ता. वाई, जि. सातारा | १ |
| **डॉ. माधुरी राजाराम खोत**<br>जयवंत महाविद्यालय, इचलकरंजी | २ |
| **प्रा. उर्मिला न. क्षीरसागर**<br>श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली | ३ |
| **प्रा. डॉ. विश्वनाथ पवार**<br>छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा | ४ |

**■ संपादक ■**


**प्रा. आर. के. देशमुख**
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, पाचवड,
ता. वाई, जि. सातारा

# प्रस्तावना

शैक्षणिक वर्ष २००७ पासून शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, यांच्या वतीने दूरशिक्षण केंद्रामार्फत बहिःस्थ विद्यार्थ्यांना दूरशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. तसेच यंदाच्या वर्षापासून म्हणजे २०१७-१८ पासून अभ्यासक्रम बदललेला आहे, सत्रपद्धती राबविण्यात येत आहे. त्यानुषंगाने, एम. ए. भाग-१ इतिहास या वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी ''मध्ययुगीन भारतातील संप्रदाय'' या विषयाचे स्वयंःअध्ययनासाठी हे पुस्तक सन २०१८-१९ या वर्षात लिहिले आहे. सदर पुस्तकाच्या लेखनासाठी शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पदव्युत्तर विभागात अध्ययन करणाऱ्या अनुभवी व तज्ज्ञ लेखकांकडून या विषयाच्या अभ्यासक्रमानुसार असलेल्या विविध घटकांचे लेखन करून घेण्यात आले आहे. या पुस्तकातील विविध घटक लिहिताना साधी व सोपी भाषा, संकल्पनात्मक स्पष्टता, विषयाच्या आकलनासाठी तक्ते, इत्यादींचा वापर केलेला आहे. वाचक व विद्यार्थ्यांना समजेल अशी विषयाची सोपी व सुटसुटीत मांडणी करण्यात आलेली आहे. प्रत्येक घटकाच्या शेवटी स्वयंःअध्ययन प्रश्न व त्यांची उत्तरे दिलेली आहेत. तसेच घटकाच्या शेवटी सरावासाठी स्वाध्याय, पारिभाषिक शब्द, विषय व अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथांची सूची दिलेली आहे.

मध्ययुगीन भारतातील संप्रदाय या स्वयंअध्ययन साहित्यामध्ये उत्तर भारतातील भक्तीमार्ग, सूफी संप्रदाय, वारकरी संप्रदाय व शीख धर्म इ. घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे.

या पुस्तकामध्ये विविध घटकांच्या विवेचनात अचूकता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु त्यामध्ये कांही उणिवा असल्यास वाचक व विद्यार्थ्यांनी त्या आमच्या निदर्शनास आणून द्याव्यात. त्याचा उपयोग पुढील आवृत्ती अधिकाधिक सुधारित करण्यासाठी निश्चितपणे होईल. हे पुस्तक पदवी, पदव्युत्तर व विविध स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरेल असा आम्हाला विश्वास आहे. सदर पुस्तक पूर्ण करण्यासाठी घटक लेखकांनी जे परिश्रम घेतले. पुस्तक प्रकाशनासाठी शिवाजी विद्यापीठाचे प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, दूरशिक्षण विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी जे परिश्रम घेतले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

**■ संपादक ■**

**प्रा. आर. के. देशमुख**
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, पाचवड,
ता. वाई, जि. सातारा

## दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**■ अभ्यासमंडळ : इतिहास ■**

अध्यक्ष **– डॉ. अवनिश पाटील**
इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती एन. डी. पारेकर**
  इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. डी. बी. मासाळ**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
- **डॉ. श्रीमती संघमित्रा व्ही. सरवदे**
  आण्णासाहेब डांगे कॉलेज, हातकणंगले,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. दिपक शंकरराव जाधव**
  लाल बहाद्दूर शास्त्री कॉलेज, सातारा
- **डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले**
  चंद्राबाई शांताप्पा शेंडूरे कॉलेज, हुपरी,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. एम. व्ही. जाधव**
  यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. निवासराव अधिकराव वरेकर**
  आदर्श महाविद्यालय, विटा, ता. खानापूर,
  जि. सांगली
- **डॉ. सुरेश मारूती चव्हाण**
  आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, गडहिंग्लज,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. राजश्री दिलीप निकम**
  कृष्णा महाविद्यालय, रेठरे बु।।, शिवनगर,
  ता. कराड, जि. सातारा
- **डॉ. श्रीमती मंजिरी कामत**
  इतिहास अधिविभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
- **डॉ. चंद्रकांत अभंग**
  सचिव, भारत इतिहास संशोधक मंडळ,
  इमिनंट स्कॉलर ऑफ मराठा हिस्ट्री.
- **डॉ. अरुण भोसले**
  निवृत्त प्राध्यापक, इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. भारतभुषण माळी**
  सचिव, शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद
- **डॉ. अमर आडके**
  सल्लागार, किल्ले जतन आणि संवर्धन, कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | उत्तर भारतातील भक्तीमार्ग | १ |
| २. | सूफी संप्रदाय | १७ |
| ३. | वारकरी संप्रदाय | ३८ |
| ४. | शीख धर्म | ६५ |

■ **विद्यार्थ्यांना सूचना**

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१७-१८ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक १

# उत्तर भारतातील भक्ती मार्ग

## (Devotional Cults in North India)


१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

- १.२.१ तुलसीदास व सुरदास
- १.२.२ कबीर
- १.२.३ मीराबाई

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


### १.० उद्दिष्ट्ये :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला,

- तुलसीदास व सुरदास यांचे जीवन व कार्य समजून घेता येईल.
- कबीर यांच्या जीवन व कार्याची माहिती समजून घेता येईल.
- मीराबाई यांचे जीवन व कार्य जाणून घेता येईल.
- उत्तर भारतातील भक्ती चळवळीची माहिती करून घेता येईल.

## १.१ प्रास्ताविक :

बाराव्या शतकाच्या अखेरीस भारतावर इस्लामी आक्रमणास सुरुवात झाली. या आक्रमणामुळे भारतातील सत्ता टिकाव धरू शकल्या नाहीत. इस्लामी आक्रमकांचा राज्यविस्ताराबरोबरच धर्मप्रसार करणे हा उद्देश असल्याने भारतातील धार्मिक स्थळांवर हल्ले होऊ लागले. पुढील काळामध्ये उत्तर भारतातून दक्षिण भारतामध्ये इस्लामी सत्तेचा विस्तार झाला. त्यामुळे आपसात लढणाऱ्या स्वतंत्र हिंदू राज्यांचे अस्तित्व राहिले नाही. या राजकीय उलथापालथीमुळे हिंदू समाजामध्ये निराशा व उदासिनता निर्माण झाली. यातूनच समाज ईश्वराची शक्ती व करूणा याकडे आकर्षित झाला.

या काळामध्ये वज्रयानी व कापालिक यांचा पूर्वभागामध्ये तर नाथपंथीयांचा पश्चिम भागामध्ये प्रभाव होता. वज्रयानी व नाथपंथाने दैववाद, तीर्थाटन व पर्वस्नान यांचा प्रसार केला. जनतेचे लक्ष आत्मकल्याण व जनकल्याण याकडे वेधण्याऐवजी दुसरीकडे वळविण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या उपदेशामध्ये गुढता व सिद्धी यावर भर होता. त्यांच्या साधनेमध्ये भक्ती, प्रेम व भावना याला स्थान नव्हते. त्यामुळे सामान्य व अशिक्षित समाज तंत्र, मंत्र यामध्ये गुरफटला व त्याचा विश्वास अलौकिक सिद्धीवर बसला.

विद्वान, पंडीत यांच्यावर याचा प्रभाव पडला नाही. ते त्यांचे कार्य करीत राहिले. पंडीत शास्त्रावर चर्चा करीत होते. दार्शनिक ग्रंथ लिहिले जात होते. वेदांतावर चर्चा होत असे. ब्रह्मसुत्र, उपनिषदे, गीतावर भाष्य करण्याची परंपरा विद्वानांमध्ये होती. यामुळे परंपरागत भक्तीमार्ग अनेक स्वरूपामध्ये विकसित झाला. भक्तीचा हा मार्ग इतका प्रबळ व विकसित याचा प्रभाव हिंदूसह या देशातील काही इस्लामी लोकांवर पडला. या विद्वानांनी हिंदू आणि इस्लामी लोकांसमोर ईश्वराला मनुष्याच्या सामान्य रूपात आणले व भेदभाव कमी करण्याचा प्रयत्न केला.

भक्तीचा हा प्रवाह दक्षिणेकडून उत्तरेकडे हळूहळू चालू राहीला. राजकिय परिवर्तनाने समाजातील मनातील पोकळी भक्तीने भरून काढली. भक्ती सगुण व निर्गुण या दोन प्रकाराने करता येते. ११ व्या शतकामध्ये रामानुचार्यानी शास्त्रीय पद्धतीने सगुण भक्तीचे निरूपण केल्याने लोक सगुण भक्तीकडे आकर्षित होऊ लागले. उत्तर भारतामध्ये सगुण भक्तीमध्ये रामोपासक व कृष्णोपासक असे दोन प्रवाह सुरू झाले. या दोन प्रवाहामध्ये तुलसीदास हे रामोपासक तर सुरदास व मीराबाई कृष्णोपासक होते. कबीर हे निर्गुण प्रकारे भक्ती करीत.

या घटकामध्ये आपण तुलसीदास, सुरदास, कबीर व मीराबाई यांची माहिति घेणार आहोत.

## १.२ विषय-विवेचन :

### १.२.१ तुलसीदास व सुरदास :

**तुलसीदास :**

तुलसीदास यांचा जन्म इ. स. १५११ मध्ये मध्ये उत्तर प्रदेशमधील चित्रकूट जिल्ह्यातील राजापूर येथे ब्राह्मण कुटुंबामध्ये झाला. त्यांच्या आईचे नाव हुलसी तर वडीलांचे नाव आत्माराम दुबे होते. जन्म झाल्यानंतर लगेचच रामनामाचा उच्चार केल्याने त्याचे नाव रामबोला पडले. जन्मानंतर दुसऱ्या दिवशी त्यांच्या आईचा मृत्यू झाला.

त्यांच्या वडिलांनी तुलसीचा जन्म अशुभ मुहूर्तावर झाला त्यामुळे आपणास मृत्यू येईल असे वाटल्याने तुलसीदासला चुनिया दासीकडे सोपविले व स्वत: संन्यास स्वीकारला. वयाच्या पाच वर्षापर्यंत त्यांचा सांभाळ चुनिया या दासीने केला. माता पित्यापासून वंचित झाल्याने त्यांना गरीबी व अपमान सहन करावा लागला. या परिस्थितीमध्ये त्यांना साधू संतांची साथ मिळाली. त्यांनी तुलसीदासचे जीवन बदलले. तुलसीचा विवाह रत्नावली नावाच्या स्त्रीशी झाला. एकदा रत्नावली माहेरी गेल्यानंतर तुलसीला पत्नीचा विरह सहन न झाल्याने तुलसी रत्नावलीला भेटण्यासाठी मध्यरात्री तिच्या माहेरी गेले. रत्नावलीला हा अपमान वाटला. त्यामुळे ती तुलसीला कठोर शब्दात अपमानकारक बोलली. त्यामुळे तुलसीच्या मनामध्ये वैराग्य निर्माण झाले. तुलसी उलट पावली माघारी फिरले. त्यांनी वैराग्य स्विकारले. या काळात त्यांना नरहरीदास यांचा सहवास लाभला. नरहरीदास यांना तुलसीदासाचे गुरू मानले जाते. तुलसीदासांनी आपल्या गुरूकडून रामभक्तीचे मर्म जाणून घेतले. विविध शास्त्रे, पुराणे, रामायण, काव्ये, नाटके यातून वर्णन केलेल्या रामकथा जाणून घेतल्या.

तुलसीला त्याच्या इच्छेबद्दल विचारल्यानंतर त्यांनी रामदर्शनाची इच्छा व्यक्त केली. भक्त कल्पदूत भक्तमाल, हरिभक्ती प्रकाशिका या ग्रंथांमध्ये चित्रकूट येथे तुलसीला हनुमान दर्शन व रामदर्शन झाल्याचे वर्णन केले आहे. चित्रकूट येथे सहा महिने तुलसीदास राहिले. त्यानंतर ते काशी, जनकचूर, नेमिषारण्य, अयोध्या, बिठूर, वृंदावन, मलीहाबाद इ. ठिकाणांना त्यांनी भेट दिली. अयोध्या ही रामजन्म भूमी असल्यामुळे तुलसीदासला या ठिकाणाची ओढ होती. काशीमध्ये तुलसीदास फार काळ राहिले. येथे त्यांनी वेद पुराण व शास्त्रांचा अभ्यास केला. येथे त्यांनी विनयपत्रिका, रामाज्ञाप्रश्न, दोहावली या ग्रंथांची रचना केली. काशीमध्ये त्यांना पंडीत, गोसाई व चांडालांचा विरोध सहन करावा लागला. काशीमध्ये ते अस्सी घाट, गोपालमंदिर, प्रल्हादघाट व संकटमोचन हनुमान येथे राहिले. त्यांना गोस्वामी ही पदवी मिळाली.

काशी येथे अस्सी घाटावर सन १६२३ मध्ये वयाच्या ९१ व्या वर्षी तुलसीदास यांचा मृत्यू झाला.

**तुलसीदास यांच्या रचना :**

तुलसीदास यांनी अनेक ग्रंथ लिहिले. यामध्ये रामलला नहछू, वैराग्य संदीपानी, रामाज्ञा प्रश्न, रामचरित मानस, सतसई, जानकी मंगल, पार्वती मंगल, गीतावली, कृष्ण गीतावली, बरवै रामायण, कूंडलीया रामायण, विनयपत्रिका, दोहावली, कवितावली व बाहुक आणि हनुमान चालीसा यांचा समावेश होतो.

**रामलला नहछू :** ठेठ अवधी भाषेमध्ये लिहिलेल्या या ग्रंथातील भाषा व विचार पाहता तुलसीदासची ही प्रारंभीची रचना आहे असे वाटते. हा छोटा ग्रंथ तुलसीदासच्या गृहस्थ जीवनाची रचना वाटते.

**वैराग्य संदीपनी :** वैराग्य संदीपनी म्हणजे भक्तीची प्रेरणा होय. या ग्रंथामध्ये रामभक्ती, संत महिमा, संत स्वभाव व शांती भाव याची चर्चा केली आहे.

**बरवै रामायण :** सात प्रकरणात विभागलेल्या या ग्रंथामध्ये रामकथेतील काही प्रसंगाचा समावेश करण्यात आला आहे.

**पार्वती मंगल :** यामध्ये शिव-पार्वती विवाहाची कथा आहे. काही लोक यास कालीदासाच्या कुमारसंभव या ग्रंथावरील आधारित ग्रंथ मानतात. कारण कुमारसंभव यातील या ग्रंथातील कथेमध्ये अधिक साम्य आहे.

**रामचरितमानस :** सन १५७४ मध्ये रामनवमी दिवशी श्रीरामचरितमानस हा ग्रंथ लिहिण्यास सुरुवात केली. दोन वर्ष सात महिने व सव्वीस दिवसांनी हा ग्रंथ लिहून पूर्ण झाला. हा त्यांचा अत्यंत महत्त्वपूर्ण ग्रंथ मानला जातो. त्यांच्या कार्यामुळे त्यांना महर्षी वाल्मिकीचा अवतार मानले जाते.

**रामाज्ञाप्रश्न :** यामध्ये ३९३ दोहे आहेत. याचे स्वरूप प्रश्नोत्तराचे आहे. याचे स्वरूप फलादेशाचे आहे.

**दोहावली :** यामध्ये ५७३ दोहे आहेत. तुलसीदासने राज तोडरच्या सांगण्यावरून हा ग्रंथ लिहिला. यामध्ये रामभक्तीविषयीचे सिद्धांत, रामामध्ये आस्था व श्रद्धा, रामभक्तीचा प्रभाव, रामराज्याचे विविध रूप व भक्तांचे कार्य याबाबत चर्चा केली आहे.

**कवितावली :** तुलसीदासच्या पाच मोठ्या ग्रंथांपैकी हा एक आहे. हा ग्रंथ सात विभागामध्ये विभागला असून हा रामचरित्राच्या ऐश्वर्य या भागाशी संबंधित आहे. दोहावलीसारखा हा ग्रंथही संग्रह आहे. हा ग्रंथ तुलसीदासच्या श्रेष्ठ रचनापैकी एक आहे. गीतावली १६५ पृष्ठांच्या या ग्रंथाचे इतर ग्रंथाप्रमाणेच सात भागामध्ये विभाजन करण्यात आले आहे. बाल, अयोध्या, अरण्य, किष्किंधा, सुंदर, लंका व उत्तराकांड असे विभाग करण्यात आले आहेत. यामध्ये उत्तराकांडची कथा या रामचरितमानसपेक्षा वेगळी आहे. सीतेच्या त्यागाची कथा विस्तृत आहे.

**कृष्ण गीतावली :** कन्नोजी भाषेतील हा ग्रंथ ६१ पदांचा काव्यसंग्रह आहे. याच्या रचनेबाबत काही विद्वान सहमत नाहीत. हे काव्य कृष्णासंबंधीत आहे.

**विनयपत्रिका :** ब्रज भाषेमध्ये लिहिलेल्या या ग्रंथामध्ये २७९ पदे आहेत. रामभक्त तुलसीदासचे प्रभू रामचंद्राकडे कलीयुगातील घटनांविरोधात केलेल्या तक्रारीचे स्वरूप व ते त्यांना स्वीकारावयास लावणे हा या ग्रंथाचा मुख्य उद्देश आहे.

**तुलसीदासांचे कार्य :**

तुलसीदास यांच्या काळामध्ये दिल्लीमध्ये मुघल सत्ता होती. अकबराचे सहिष्णू धोरण होते. त्याने रजपूतांशी वैवाहिक संबंध जोडले. अकबराचे वंशज हिंदूंशी उदारपणे वागण्यात अपयशी ठरले. प्रजेची हालत अत्यंत खराब होती. प्रजा निराश्रीत होती. सत्तेसाठी आपल्या जवळच्या नातेवाईकांचे खून केले जात होते. या पार्श्वभूमीवर तुलसीदासने आपली शासनविषयक रामराज्याची कल्पना मांडली.

हा काळ इस्लामी संस्कृतीच्या भारतीयीकरणाचा काळ होता. हिंदूंचे सनातन संस्कार आणि इस्लामी कट्टर धर्मवाद यांच्यामध्ये संघर्ष सुरू झाला होता. सतीप्रथा, बहुपत्नीत्व, समाजातील आर्थिक दुरावस्था, स्त्रीयांची दयनीय अवस्था व शासनरहीत अवस्था अशा अवस्थेमध्ये तुलसीदासने श्रीरामला आदर्श पात्र म्हणून उभे केले.

मुस्लीम धर्माचे वाढते वर्चस्वाच्या आव्हानाला हिंदू धर्मातील सर्वांना सामोरे जावे लागले. इस्लामच्या व्याप्तीने हिंदूंना कठोर व्हावे लागले. सुफींनी हिंदू व मुस्लीम यांच्यामध्ये समन्वय घडवून आणण्याचा प्रयत्न केला. मंदिरांमध्ये

देवदासी पद्धत सुरू होती. हिंदूंमध्ये अनेक पंथ स्थापन झाले होते. अशा निराशमय परिस्थितीमध्ये तुलसीदासने लोकांच्या जीवनामध्ये संयम, उत्साह, एकता व साहस निर्माण केले. सगुण व निष्काम भक्तीचा सिद्धांत लोकभाषेमध्ये मांडला. तुलसीने उद्ध्वस्त संस्कृतीच्या रक्षणासाठी धर्माचे खरे चित्र समोर मांडले. सामंजस्याच्या मार्गाने त्यांनी रामभक्तीचा मार्ग सर्वांसाठी खुला केला. ज्ञान, कर्म व उपासना यांना मानवतेच्या धाग्याने बांधले.

तुलसीदासाचे युग भक्ती चळवळीचे युग होते. अनेक पंथ भक्तीचा प्रचार करत होते. तुलसीदासने श्रीरामच्या सौंदर्याबरोबर शीलशक्ती व मर्यादा स्पष्ट केली. तुलसीदासच्या मते विषयासक्ती, मोह, माया, लोभ, काम, क्रोध व ईर्षा हे भक्ती मार्गातील अडथळे आहेत. कलीयुगामध्ये जप-तप, तीर्थ, योग, समाधी इ. साधने कमकुवत झालेली आहेत. लालच व स्वार्थाने उपासना भ्रष्ट झालेली आहे असे सांगितले. अशा प्रकारे भक्ती मार्गातील अडथळे सांगण्याच्या निमित्ताने जनसामान्यांना सुगम मार्गाने जाण्यास सांगितले. तुलसीदासने योगींच्या कठोर साधनेचे खंडन केले. त्यांच्या मते प्रेमविरहित ज्ञान अज्ञान बनते.

तुलसीदासच्या मते, भक्त साधनेमध्ये गुरूकृपा व सत्संग आवश्यक आहे. गुरूशिवाय भगवान शंकरसुद्धा साधकाचा उद्धार करू शकत नाही. गुरू शिष्यासाठी अंजन आहे. सदाचार व नीती भक्तीचे आधार आहेत. परोपकार हे त्याचे मूळ आहे, असे त्यांनी सांगितले. गुरू भक्ती संतांचा सहवास, प्रार्थना व सदाचार ही चार तत्त्वे भक्तीसाठी आवश्यक आहेत. तुलसीदासने सांगितलेला भक्ती मार्ग साधा व सोपा आहे. ज्यावेळी भक्त राम चरणी दास होतो त्यावेळी तो ज्ञानी, विज्ञानी, पंडीत व सर्व गुण संपन्न होतो असे तुलसीदासचे मत होते.

तुलसीदासने ईश्वराकडे निरपेक्ष भक्तीची मागणी केली. शुद्ध भक्ती ईश्वराचा प्रसाद असतो. भक्तीमुळे सर्व त्रास, व्याधी दूर होतात. सर्व प्राण्यांचे जीवन भक्तीमुळे सुखी, निरपेक्ष व आनंदीत होते. भक्ती हे प्रेमाचे रूप असून प्रेमाने भक्ती अमृत बनते. निष्कपट भक्ती रामभक्तीचे श्रेष्ठ वैशिष्ट्य आहे. ईश्वर भक्ताच्या प्रेमाची परीक्षा घेतो व खऱ्या प्रेमह भक्तास मोक्ष देतो. तुलसीदास द्वैतवादी व सगुण भक्तीवादी होते. त्यांनी अद्वैतवादी व निर्गुण भक्तीचे खंडन केले.

**सुरदास :**

**अल्पचरित्र :**

भक्तीकाळातील रचनाकारांमध्ये सुरदासचे स्थान वरचे आहे. सुरदास यांच्या जन्मतिथीबाबत विद्वानांमध्ये मतभेद आहेत. परंतु वल्लभाचार्य यांनी सिद्ध केलेली वैशाख शुक्ल ५, मंगलवार संवत १५३५ इ. स. १४७८ ही सुरदासची जन्मतिथी मानली जाते. त्यांचे जन्मस्थान सीही हे आहे. ते जन्मांध असल्याने व घरातून बाहेर पडल्याने ते जातीपातीपासून मुक्त झाले होते. त्यांच्या वडीलांचे नाव रामदास सांगितले जाते. सूरदास अविवाहीत होते. जन्मांध असल्याने त्यांना मातापित्याचा तिरस्कार सहन करावा लागला. त्यामुळे त्यांनी घर सोडण्याचा निश्चय केला. वयाच्या ६ व्या वर्षी सीही पासून चार कोस दूर तळ्याच्या काठी एका झाडाखाली ते राहू लागले. तिथे त्यांनी ज्योतिष सांगण्याचे काम सुरू केले. अनेकांनी त्यांना गुरू मानले. परंतु थोड्या दिवसानंतर अचानक त्यांच्या मनात वैराग्य निर्माण झाले व ते मथुरा-आग्रा येथे आले. तिथे वल्लभाचार्य यांनी सूरदासला संवत १५६७ (इ. स. १५१०)

मध्ये दीक्षा दिली. यानंतर सूरदासमध्ये आत्मचेतना व आत्मगौरव वाढला, गरीबी कमी झाली. ही घटना त्यांच्या जीवनाला वेगळे वळण देणारी ठरली. वल्लभाचार्यांनी त्यांच्याकडे श्रीनाथ मंदिराची किर्तन सेवा करण्याची जबाबदारी सोपविली. सुरदास यांचा मृत्यू पारसोली येथे संवत १६४० (इ. स. १५७३) मध्ये झाला असावा.

**सूरदास यांच्या रचना :**

भक्तीकाळातील वैष्णव कवीमध्ये सूरदासचे नाव अग्रगण्य आहे. इतिहास ग्रंथामध्ये सांगितल्या प्रमाणे सूरदास यांनी २५ ग्रंथ लिहिले आहेत. परंतु काही विद्वान सुरदास यांची सुरसागर, सुर सारावली आणि साहित्य लहरी रचना मानतात.

**सुरसागर :** सुरसागर ही नि:संशयपणे सुरदासला महाकवी घोषित करण्यासारखी रचना आहे. हे महाकाव्य संग्रहात्मक व बार स्कंधात्मक स्वरूपात मिळते. हे काव्य सव्वा लाख ओव्या असणारे अमूल्य प्रबंध काव्य आहे असे म्हटले जाते. परंतु सध्या २५०० ओव्याच उपलब्ध आहेत. सूरदासने विष्णूला हरीकथा मानून सुरसागरमध्ये हरीलीला वर्णन केलेली आहे. विष्णूच्या दशावताराच्या आधारावर सूरदासने कृष्णावताराच्या लीला गायल्या आहेत. बाललीला, प्रेमलीला, दानलीला, विनय, दैन्य, सत्संग, गुरू महिमा, मानलीला, विरहलीला व भ्रमरगीत यावर आधारित वर्णन केलेले आहे. सुरसागरच्या बारा भागामध्ये अनुक्रमे पहिल्या भागामध्ये विनय किंवा मंगलचरण पदे, शुकदेवचा जन्म व कौरव-पांडवांच्या कथा आहेत. दुसऱ्या भागामध्ये नाममहिमा, सत्संग भक्ती, वैराग्य व ब्रह्माची वस्तुती केली आहे. तिसऱ्या भागामध्ये शुकदेवता उपदेश व वराहवतार कथेचे वर्णन केले आहे. चौथ्या भागामध्ये दत्तात्रय व ध्रुवची कथा सांगितली आहे. पाचव्या भागामध्ये ऋषभदेव व जड भरत आख्यान सांगितले आहे. सहाव्या भागामध्ये राज परिक्षित व शुकदेवचे प्रश्नोत्तर व अजामिलची कथा आहे. सातव्या भागामध्ये नरसिंह अवतार व नारदाचा जन्माचे वर्णन आहे. आठव्यामध्ये कुर्मावतार, वामनावतार व मत्सावतार यांची कथा आहे. नवव्यामध्ये परशुराम अवतार व रामावतारची कथा आहे. दहाव्या भागामध्ये कृष्ण लीला वर्णित आहे. यामध्ये पुतना वध व भ्रमरगीत सार आहे. नारायणावतार व हंसावताराची कथा अकराव्या भागात आहे. बाराव्या भागात बुद्ध व कलकी अवताराची आणि जन्मेजय राजाची कथा आहे.

**सूरसारावली :** यामध्ये राधाकृष्णच्या नित्यविहार - रूपदर्शन गायले आहे. या ग्रंथामध्ये लक्षावधी पदे असणाऱ्या सूरसागरला सुरसारावलीमध्ये थोडक्यात सांगितले आहेत. सारावलीमध्ये फक्त हरीलीलाचे सार आहे. कृष्ण चरित्र, ब्रजलीला, मानलीला, विहारलीला इ. सारावलीचे विषय आहेत.

**साहित्यलहरी :** हा ग्रंथ कूटपदांचा विशिष्ट संग्रह आहे. यामध्ये वाग्विलासबरोबर गुढार्थ असतो. याच्या साह्याने छळाच्या माध्यमातून चमत्कार उत्पन्न केला जातो. दृष्टीकूटांची परंपरा प्राचीन आहे सूरदासने या परंपरेमध्ये कोड्यात या ग्रंथाची रचना केली आहे. या ग्रंथामध्ये ११८ पदे असून यामध्ये राधाकृष्णाचे प्रेमलीलाचे वर्णन केले आहे.

**सूरदासचे कार्य :**

सूरदासच्या मते भक्ती हा ईश्वराच्या सेवेचा प्रकार आहे. भक्ती मिळविल्यानंतर मानवाची कोणतीही इच्छा

रहात नाही. त्याच्या आकांक्षा नष्ट होतात आणि आत्म्याचा साक्षात्कार झाल्यानंतर तो ईश्वराच्या नामस्मरणामध्ये सर्व काही विसरून जातो. ईश्वराचे सतत किर्तन, श्रवण व प्रार्थना ही भक्तीची साधने आहेत.

ईश्वराच्या प्रति असणारे अनन्य प्रेम व सांसारिक मार्ग व भौतिक जगतापासून वैराग्य वृत्ती ही भक्तीची दोन लक्षणे आहेत. हरीभक्ती हा ईश्वराच्या साक्षात्काराचा सर्वोच्च उपाय असून या जगातील बंधने, प्रपंच यामुळे सुटू शकतात अशी सूरदासची विचारसरणी होती. कलीयुगामध्ये मानवाला होणाऱ्या त्रासातून सुटका होण्यासाठी ईश्वर भक्ती हा एकच उपाय आहे. सूरदासने सर्वांना समान मानले. ईश्वराच्या दरबारामध्ये भेदभाव मानला जात नाही. सुरदासने स्त्रियांना भक्तीचे पूर्ण स्वातंत्र्य दिले. तंत्र, मंत्र यांना सूरदासने विरोध करून फक्त ईश्वराच्या प्रार्थनेला श्रेष्ठ मानले. सूरदासने सगुण भक्तीचे समर्थन केले. निर्गुण भक्तीवर त्यांचा विश्वास नव्हता. तरीही दोन्ही प्रकारच्या भक्तीला त्यांची मान्यता होती. सूरदास द्वैतवादी होते.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - १ :**

**(अ) योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

१) ............ यांना तुलसीदासचे गुरू मानले जाते.

अ) नरहरीदास ब) रामदास क) वल्लभाचार्य ड) शंकराचार्य

२) रामचरितमानस हा ग्रंथ ............ यांनी लिहिला.

अ) वल्लभाचार्य ब) सूरदास क) तुलसीदास ड) नरहरीदास

३) तुलसीदासचा सांभाळ ............ यांनी केला.

अ) चुनिया ब) हुलीया क) आत्माराम दुबे ड) मुनिया

४) सूरदासचा जन्म ............ येथे झाला.

अ) मथुरा ब) आग्रा क) सीही ड) काशी

५) ............ यांना सुरदासचे गुरू मानले जाते.

अ) वल्लभाचार्य ब) माधवाचार्य क) तुलसीदास ड) तानसेन

**(ब) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) सुरसागर हा ग्रंथ कोणी लिहिला?

२) रामबोला हे नाव कोणाचे होते?

३) कोणत्या ग्रंथामध्ये सव्वा लाख ओव्या होत्या?

४) जन्मांध कोण होते?

५) तुलसीदासच्या आईचे नाव काय होते?

### १.२.२ कबीर :

भक्तीकाळातील निर्गुण भक्ती मार्गाचे कबीर मुख्य आधारस्तंभ होते. मध्यकालीन भारतामधील जनतेमध्ये अज्ञानरूपी अंधारामध्ये ज्ञानरूपी प्रकाश देण्यासाठी कबीरसारख्या महाकवीची आवश्यकता होती. चौदाव्या शतकाच्या मध्यास आक्रमकांच्या जुलमी राजवटीमध्ये भारतीय जनता अत्याचार व शोषण यामध्ये पिचली जात होती त्यावेळी भेदभावाच्या रेषेला समाप्त करून शांततेचा मार्ग दाखविणाऱ्या महामानवाची गरज होती. दुसऱ्या बाजूस नाथ, शैव, जैन, बौद्ध व वैष्णव इ. मते अस्पष्ट होती. त्यांच्यामध्ये परस्पर विरोध होता. जो तो आपलीच टिमकी वाजवित होता. या परिस्थितीवर मात करून प्रजेला शांतीचा संदेश देऊन एकतेच्या धाग्याने बांधून सत्याचा मार्ग दाखविण्याची गरज निर्माण झाली. अशा वेळी जननायकच्या रूपात कबीरचा उदय झाला.

**अल्पचरित्र :**

कबीरच्या जन्मदिनांक व जन्मस्थळाबाबत विद्वानांमध्ये मतभेद आहेत. वेगळ्या साहित्यामध्ये जन्मदिनांक व जन्मस्थळाबाबत विविध माहिती मिळते. कबीर पंथियांच्या मते संवत १४५५ (इ. स. १३९७) मध्ये कबीरचा जन्म झाल्याचे मानतात. काही विद्वान इंडियन क्रोनोलाजीमध्ये कबीरच्या जन्माची नोंद संवत १४५६ (इ. स. १३९८) आहे. कबीरच्या जन्मस्थळाबाबत काशी, आजमगढ, मगहर व मिथिला असे उल्लेख आढळतात. परंतु लोकमान्यतेनुसार कबीरचे जन्मस्थळ काशी मानले जाते.

कबीरच्या परिवाराबाबतही वेगवेगळी मते आढळतात. एका जनमान्यतेनुसार एका विधवा ब्राह्मण स्त्रीने कबीरला जन्म दिला. लोकलज्जेस्तव तिने काशीच्या तलावाजवळ ठेवले. याचवेळी नीमा व नीरू नावाच्या नि:संतान असणाऱ्या जोडप्याने त्यास उचलून घेतले व त्याचे पालनपोषण केले.

कबीर पंथीय कबीरला कोणत्याही जातीशी जोडत नाहीत. काही साहित्यकारांच्या मते कबीर नीमा व नीरूचा औरस मुलगा होता. अपरिपक्व वयामध्ये त्याचा जन्म झाल्याने त्याच्या आईने धोका पत्करून त्याचे पालन पोषण केले. कबीर गृहस्थी होते. त्यांच्या परिवारामध्ये त्यांचे माता पिता नीमा व नीरू व पत्नी लोई व दोन मुले कामल व कमाली यांचा उल्लेख मिळतो. त्यांच्या अनेक पदांमध्ये लोईचा अनेक वेळा उल्लेख आढळतो. काही विद्वानांच्या मते लोई प्रारंभी त्यांची शिष्या होती व नंतर त्यांची पत्नी बनली. काही कबीर चरित्र लेखकांच्या मते कबीरला कामल व निहाल ही दोन मुले व निहाली व कमाली या दोन मुली असल्याचे म्हटले आहे.

कबीरला अक्षरज्ञान नव्हते. त्यांच्या अध्यात्मक गुरूंबाबतही विद्वानांमध्ये एकवाक्यता नाही. काही विद्वान रामानंद यांना तर काही शेख तकी यांना तर काही पीतंबर पीरला गुरू मानतात. कबीरच्या नामकरणाबाबतही अनेक वर्णने मिळतात. कबीर या फारसी शब्दाचा अर्थ महान किंवा सार्थक होतो. एका कथेनुसार कबीरचा जन्म हाताच्या अंगठ्यातून झाला त्यामुळे त्यास करवीर म्हणजे कबीर म्हटले गेले. दुसऱ्या एका दंतकथेनुसार कबीरला नाव देण्यासाठी काजीने कुराण उघडले त्यावेळी त्यास कबीर हे शब्द दिसले म्हणून कबीर हे नाव ठेवले.

कबीरच्या मृत्यूबाबत ही विवाद आहेत. काही विद्वान कबीरचे मृत्यूस्थळ मगहर मानतात तर काही जगन्नाथपुरी

तर काही अयोध्या मानतात. कबीरच्या मृत्यूच्या वर्षाबाबत चार प्रवाह आढळतात पण बहुतांश विद्वान विक्रम संवत १५७५ (इ. स. १५१८) मानतात.

**कबीरची रचना :**

कबीरला लिहिता येत नव्हते त्यामुळे कबीरने स्वत: आपली कोणतीही रचना लिहिली नाही, हे स्पष्ट आहे. कबीरच्या शिष्यांनी कबीरची रचना लिपीबद्ध केली. कबीरच्या रचनेच्या संख्येबाबत विद्वानांमध्ये मतभेद आहेत. प्रो. विल्सन कबीरच्या ८ रचना मानतात, बेस्टकार ही संख्या ८२ सांगतात, मित्रबंधू ७५ रचना मानतात तर रामदास गौंड ७१ रचना सांगतात. रामकुमार वर्मा यांनी कबीरांच्या रचनेची पुढील प्रमाणे यादी दिली आहे.

१. अनुराग, २. रामरक्षा, ३. अठपदरा, ४. विचारमाला, ५. अमरमूल, ६. शब्द अहलटूक, ७. अर्जनामा, ८. संत कबीर, ९. अक्षरखंड रमैनी, १०. सतनामा, ११. मूल सिद्धांत, १२. साधों का अंग, १३. कबीर अष्टक, १४. हिंडोरा, १५. कबीर गोरख गोष्टी, १६. ज्ञान सरोदय, १७. कर्मकांड रमैनी, १८. ज्ञान स्तोभ, १९. कार्यापणी, २०. आलिफनामा, २१. छप्पय, २२. आरती, २३. जन्मबोध, २४. अक्षरभेद रमैनी, २५. निर्भय ज्ञान, २६. उग्रगीता, २७. पिय पहचानने को अंग, २८. उग्रगान, २९. बीजक, ३०. कबीर और धर्मदास की गोष्ठी, ३१. भक्ती का अंग, ३२. कबीर की वाणी, ३३. रमैनी, ३४. कबीर जी की साखी, ३५. कबीर परिचय की साखी, ३६. रेखता, ३७. चोका पद की रमैनी, ३८. विवेकसार, ३९. चोतीसा. ४०. शब्द वंशावली, ४१. तीसा मंत्र, ४२. हँस मुक्तावली, ४३. नाम महात्म की साखी, ४४. ज्ञान गूदडी, ४५. प्रकार, ४६. ज्ञानसागर, ४७. ब्रह्मनिरूपण, ४८. ज्ञान बोध, ४९. भक्ती का अंग, ५०. भाती खंड चौतीसा, ५१. राम सार, ५२. ज्ञान चौतीसी, ५३. मंगलनाद, ५४. मुहम्मद बोध, ५५. बलरव की पैज, ५६. शब्द राग काफी और फगुआ, ५७. शब्द गलेरी और राग भैख.

**कबीरचे कार्य :**

कबीर प्रतिमा संपन्न व्यक्तीमत्व होते. बाल्यावस्थेमध्ये त्यांना दोन विरोधी संस्कृतींचे संस्कार झाले होते. जन्माने ते हिंदू होते तर मुस्लीम परिवारामध्ये त्यांचे पालन पोषण झाले होते. त्यांची क्रांती भावना ही त्यांच्या व्यक्तीमत्त्वाची विशेषता होती. त्यांचे संपूर्ण विचार क्रांती भावनांनी प्रेरित होती. कबीर अकडू होते. ते कोणाशीही स्पष्टपणे बोलत होते. त्यांच्यासमोर पंडित, मुल्ला व अघोरी बाबासुद्धा टिकत नसत. समाजाला त्यांनी चांगले ओळखले होते. त्यामुळेच त्यांनी प्रत्येक ठिकाणी विनम्रतेचा प्रयोग केला नाही. कबीरला आपल्या कुटुंबातील कोणाच्याही मृत्यूची चिंता नव्हती. त्यांनी तत्कालीन समाजामध्ये क्रांतीची सुरुवात केली. त्यांनी जिथे वाईट पाहिले ते सहन न करता विरोध करून मुळापासून उखडून टाकण्याचा प्रयत्न केला. कबीरकालीन समाजामध्ये अवडंबर व अनाचार वाढला होता. पंडीत व मुल्ला-मौलवी स्वत:ला समाजाचे ठेकेदार समजत होते. अशिक्षित व अज्ञानी प्रजा त्यांच्या नादी लागून अंधविश्वासू होऊ लागली होती. पंडीत व मुल्ला यांचा आदेश ईश्वराचा आदेश समजून पालन केले जात होते. स्पृश्य, अस्पृश्य, उच्चनीच, वर्णभेद, शोषण व स्त्रीभोग यासारख्या अनिष्ठ बाबींनी समाज नैतिकदृष्ट्या हीन बनला होता. अशा परिस्थितीमध्ये समाजाला चुकीच्या रस्त्याने नेणाऱ्या लोकांना कबीरने फटकारले. कबीरने मूर्तीपुजेला विरोध केला. कबीरवर स्त्री निंदकाचा आरोप केला जातो. परंतु त्यांनी आध्यात्मामध्ये धन, दौलत,

पुत्रपुत्रादि सर्व निरर्थक व बाधक आहेत. आध्यात्मिकतामध्ये माया बाधक आहे आणि स्त्री मायाचे प्रमुख स्वरूप आहे. अशा प्रकारे कबीरने सामान्यपणे स्त्रीला बाधक मानले आहे. स्त्रीबाबत कबीर भारतीय ऋषी परंपरेप्रमाणे राहीले. ऋषी परंपरेमध्ये स्त्री घरी राहूनसुद्धा आध्यात्मिक उन्नतीसाठी पतीची सहाय्यक बनू शकते.

कबीर रागीट आणि फटकळ असले तरी तेवढेच विनम्र होते. चांगल्या बाबींसाठी ते विनम्र होते. संत, भक्त व साधूंसाठी ते दास बनले. कबीर रागीट व लवकर खवळत असत. कारण त्यांना बिघडत्या परिस्थितीचे स्वरूपाची जाणीव होती. कबीर परमार्थी होते, ज्यावेळी कबीर पिता त्यांना बाजारामध्ये चादरी विकण्यासाठी पाठवित असत त्यावेळी संतांना पाहून त्यांच्या मनामध्ये दया उत्पन्न होत असे व संतांना चादरी देत असत. भुकेलेल्या साधूंना जेवण देत असत. त्यांच्यामध्ये इर्षा किंवा बदल्याची भावना नसे.

कबीर हिंदू व मुस्लीम संस्कृतीचे मिळते जुळते रूप होते. त्यांच्यावर सिद्ध, नाथ, महाराष्ट्री, संत, सूफी संत, हटवादी आणि रामानंदच्या शिष्य परंपरांचा प्रभाव असल्यामुळे द्वैतवादी व विशिष्टाद्वैतवादींचा प्रभाव दिसून येतो. त्यांची मूळ विचारसरणी वैष्णव विचाराची होती परंतु जुलाहा असल्यामुळे त्यांच्यावर नाथ व सिद्धांचा प्रभाव होता. नाथ परंपरा बौद्ध सिद्धांताचे रूप होते. वैष्णव, बौद्ध प्रभावाबरोबरच त्यांच्यावर इस्लामचा प्रभाव होता. त्यांनी हिंदू व मुस्लीम धर्माच्या मर्यादा व बाह्याचाराच्या विरोधात समान मार्ग निवडला. त्यांनी दोघांनाही खडसावले.

कबीरने एका ठिकाणी कायम वास्तव केले नाही. त्यांनी संपूर्ण भारतामध्ये फिरून जनतेपर्यंत आपले विचार पोहोचविले. तीर्थयात्रांवर कबीरचा विश्वास नव्हता. अज्ञानी जनतेला ज्ञान देणे हा त्यांच्या प्रवासाचा मुख्य उद्देश होता. देशभर फिरून त्यांनी मानवतेचा संदेश दिला.

कबीरने निर्गुण ईश्वरामध्ये विश्वास ठेवून ईश्वर नामस्मरणाचा उपदेश केला. मांसाहारी, दारू पिणारे व व्यभिचारी शाक्तांचा विरोध केला. वर्षानुवर्षे चालत आलेल्या अनिष्ट परंपरा व हिंदू-मुस्लीम धर्मातील अवडंबरला उघडपणे विरोध केला. कबीरने गुरूपुजेवर जोर दिला. गुरूचे स्थान ईश्वरापेक्षा वरचे सांगितले. कर्म प्रधान वर्णव्यवस्था कबीरला मान्य होती. परंतु जातीव्यवस्थेला विरोध केला. निर्गुणी असणाऱ्या कबीरने प्रेमाचे महत्त्व जाणले. प्रेमहीन हृदयाला निरर्थक व अशा प्राण्यांना पृथ्वीवरील भार मानले. कबीर एकेश्वरवादी होते.

भक्तीशिवाय ज्ञान, कर्म व योग निरर्थक आहेत. सर्व प्रथम आपली भावना शुद्ध, पवित्र, निर्मळ, परोपकारी व मंगलमय पाहिजे. जर आपण ईश्वरामध्ये भाव ठेवला तरच ज्ञान, कर्म व योगाचे फलीत मिळेल असे कबीरचे मत होते.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - २ :**

**(अ) योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

१) लोकमान्यतेनुसार कबीरचे जन्मस्थळ ............ मानले जाते.

अ) काशी　　ब) अजमगढ　　क) मगहर　　ड) मिथिला

२) कबीरच्या आईचे नाव ............ होते.

अ) नीमा　　ब) कमाली　　क) निहाली　　ड) हुलसी

३) कबीर या फारशी शब्दाचा अर्थ ............ होतो.

अ) महान　　ब) लहान　　क) दिव्य　　ड) तेजस्वी

४) कबीर जन्माने ............ होते.

अ) मुसलमान　　ब) हिंदू　　क) ख्रिश्चन　　ड) पारसी

५) कबीरच्या व्यक्तीत्वाची विशेषता ............ होती.

अ) क्रांती भावना　　ब) स्पष्टता　　क) समन्वयता　　ड) फटकळता

**(ब) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) स्वत:ला समाजाचे ठेकेदार कोण समजत असत?

२) कबीरच्या मते आध्यात्मामध्ये काय बाधक आहे?

३) कोणाचे स्थान ईश्वरापेक्षा वरचे आहे? असे कबीरने सांगितले.

४) कोणाला पाहून कबीरांच्या मनामध्ये दया उत्पन्न होत असे?

५) कबीरने कोणाला पृथ्वीवरील भार मानले?

### १.२.३ मीराबाई :

मीराच्या जीवनासंबंधी जी साधने मिळतात यामध्ये जोधपुरच्या महाराज जसवंतसिंहचे दिवाण नैणसीने संग्रहीत केलेले महता नैणसी री ख्यात महत्त्वपूर्ण आहे. ऐतिहासिक दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या या ग्रंथामध्ये जोधपुरच्या राठोड घराण्याची पुरेसी माहिती मिळते. यामध्ये महाराणा संगच्या मुलांची माहिती दिलेली आहे. त्याबरोबरच राणा संगचा मुलगा भोजराजाची पत्नीच्या रूपामध्ये मीराचे नाव येते. उदयभान चंपावन संकलीत उदयभान चंपावत री ख्यात, मारवाड रा परगाना री विगत यामधून मीराबाबत माहिती मिळते. याशिवाय वैष्णवदास लिखित भक्तमाल, राघौदास लिखित भक्तमाल, ब्रह्मदास लिखित भक्तमाल, सुर लिखित मीराबाई की परची, हिंदीतील पहिल्या कथा संग्रह चौरासी वैष्णव की वार्ता यातून मीराबाईबाबत माहिती मिळते.

मीराबाई ही तत्कालीन निर्भय, साहसी व कर्मामध्ये विश्वास ठेवणारी महिला होती. आपल्या प्रेमीची प्रार्थना करण्यासाठी जीवनात येणाऱ्या सर्व संकटांशी संघर्ष करत राहिली. ती राजघराण्यातील अशी एक स्त्री होती की प्रेम व भक्तीच्या ज्योतीच्या रूपात आयुष्यभर जळत राहिली.

**अल्पचरित्र :**

इतर संताप्रमाणेच मीराच्या जन्मकाळाबाबत विद्वानांमध्ये विविध मते आहेत. परंतु नाभादासच्या भक्तीमालनुसार मीराबाईंचा जन्म संवत १५६१ (इ. स. १४९८) मध्ये झाला. विद्वानांनी हा काल मान्य केला आहे. कारण इतर

संवतपेक्षा हे संवत जास्त बरोबर वाटते. मीराबाईच्या जन्मस्थळाबाबतही विद्वानांमध्ये अनेक प्रवाद आहेत. परंतु मीराबाई की परची, नाभादासचा भक्तीमाल व इतर ग्रंथामध्ये मीराबाईचा जन्म मेडता येथे झाल्याचा उल्लेख आहे. यावरून मीराबाईचा जन्म संवत १५६१ (इ. स. १४९८) मध्ये राजस्थानमधील मेडता येथे झाला. मीराबाईच्या वडीलांचे नाव रतनसी होते. आईच्या नावाबाबत विद्वानांमध्ये मतभेद आहेत. मीरा स्मृती ग्रंथ आणि मीरा सुधा सिंधु या ग्रंथामध्ये मीराबाईच्या आईचे नाव वेगवेगळे आहे. मीरा स्मृती ग्रंथामध्ये कुसुम कुंवर तर मीरा सुधा सिंधुमध्ये वीर कुंवारी नाव आहे. ठोस पुराव्याच्या अभावी मीराबाईच्या आईचे नाव निश्चित सांगता येत नाही.

मीराबाईचे शिक्षण कांट्या तिवाडी शाखेच्या गुर्जर गौंड पंडित गजाधर यांच्या सानिध्यात झाले. मीराबाईच्या विवाहानंतर गजाधर यांना मीराबाईने सासरी बरोबर नेले. त्यांना व्यास या पदवीने गौरवून पूर गावामध्ये २००० बिघे जमीन दिली. लहानपणापासूनच मीराबाईने कथा, पुराण आणि धार्मिक बाबी ऐकल्याने मीराबाईवर भक्तीचा अंकुर फुटला. कालांतराने त्याचा विशाल वटवृक्ष झाला.

मीराबाईचा विवाह महाराणा संगचा मुलगा भोजराज याच्याबरोबर झाला. मीराबाईला वैवाहिक जीवन फार कमी मिळाले. भोजराजाच्या मृत्यूनंतर राजपूतांच्या सती पद्धतीनुसार मेवाड राजघराण्याने मीराबाईने सती जावे म्हणून इच्छा व्यक्त केली परंतु मीराबाईने सती जाण्यास नकार दिला. तिने कृष्णाच्या भक्तीसाठी स्वत:ला जिवंत ठेवले.

भोजराजाच्या मृत्यूनंतर महाराणा संगमुळे मीराला त्रास झाला नाही. महाराणा संगच्या मृत्यूनंतर रतनसिंह सत्तेवर आला. या काळातही मीराबाईला कोणताही त्रास झाला नाही. परंतु रतनसिंहाच्या मृत्यूनंतर सत्तेवर आलेल्या विक्रमजित याने मीराबाईला त्रास देण्यास सुरुवात केली.

तारूण्यात आलेले वैवध्य व कुटुंबियांकडून दिल्या जाणाऱ्या त्रासाने मीराबाईच्या जीवनात बदल घडवून आणला. त्यांच्या मनात नश्वर जगाबाबत वैराग्य निर्माण झाले. लहानपणापासून मीराबाईच्या मनात कृष्णभक्तीकडे ओढा होताच, तारूण्यामध्ये मिळालेल्या दु:खाने तिला अधिकच कृष्णाजवळ नेले. राजपूत कुळाची सून होण्याच्या नात्याने तिच्यावर अनेक बंधने होती. या बंधनामुळे तिला कृष्ण भक्ती व साधू संगतला परवानगी देत नव्हते. या बंधनातून मुक्त होण्यासाठी आपल्या माहेरी निरोप पाठवून मेडतामध्ये राहण्याची इच्छा व्यक्त केली. यानंतर मीराबाई मेडता येथे राहण्यास गेली. यानंतर मीराबाईने पुष्कर, वृंदावन आणि द्वारका या तीर्थस्थळांना भेटी दिल्या. इ. स. १५४६ मध्ये तिचा मृत्यू झाला.

**मीराबाई रचित रचना :**

विद्वानांच्या मतानुसार मीराबाईने अकरा रचना केल्या आहेत. १) गति गोविंद की टीका, २) नरसी का मायरा, ३) राग सोरठ का पद, ४) मलार राग, ५) राग गोविंद, ६) सत्यभामानु रूसणु, ७) मीरा की गरवी, ८) रुक्मिणी मंगल, ९) नरसी मेहता की हुंडी, १०) चरित, ११) स्फुट पद.

**मीराचे कार्य :**

मीराच्या भक्तीमध्ये कृत्रीमता नव्हती. मीराने स्वत:ला कोणत्याही संप्रदायामध्ये बांधून घेतले नाही की

कोणत्याही परंपरेमध्ये बांधून घेतले नाही. जरी मीराच्या भक्तीचे स्वरूप सगुण असले तरी काही वेळा तीने आपल्या आराध्य देवतेला निर्गुण रूपामध्ये स्वीकार केले. मीराने आपल्याला पुर्णपणे कृष्णाप्रती समर्पित केले. कृष्णाला खऱ्या प्रेमीच्या स्वरूपात स्वीकारलेली मीरा प्रत्येक क्षण कृष्णाच्या सानिध्यामध्ये प्रत्येक क्षण घालवू इच्छित होती. कृष्ण ज्या परिस्थितीमध्ये ठेवेल त्या अवस्थेमध्ये राहण्यास तयार होती.

मीराने आपल्या आराध्य देवतेची भक्ती करणे आपले कर्तव्य मानले. आराध्य देवतेला सर्वगुण संपन्न व शक्तीशाली मानले. मीराच्या भक्तीमध्ये सगुण भक्तीचे शांतभाव, दास्यभाव, सख्यभाव, वात्सल्यभाव व दांपत्यभाव इ. सर्व रूपे मिळतात.

मीरा भक्ती कवयित्री व गायिका होती. ज्या काळामध्ये ती कृष्ण भक्ती करत होती तो काळ सरंजामदार राजांचा होता. दिल्लीवर मोगलांची सत्ता होती. भारतीय संस्कृतीचे जलद गतीने पतन होत होते. विदेशी संस्कृती विस्तारीत होती. समाज उच्च व निच वर्गामध्ये विभागला होता. सामाजिक व राजनैतिक परिस्थिती असामान्य होती. सर्व कवी, संत या अंतविरोधी प्रवृत्तीतून सावरण्याचा प्रयत्न करीत होती. अनेक संत कनिष्ठ वर्गातील लोकांमध्ये मानवतेची ज्योत पेटविण्याचा प्रयत्न करीत होते. यामध्ये समाज सुधारक सहभागी होत होते.

मीराच्या परिवाराचा व जाती संस्कार व परंपरांचा विचार करता मीराचे घर सोडणे, साधू संतांबरोबर रात्रंदिवस कृष्ण भक्तीचे गीत गाणे, भजन कीर्तन करणे, नाचणे ही घटना अशक्य होती. मीराने राजकुलाच्या मर्यादावर अतिक्रमण केले होते. व्यक्ती स्वातंत्र्यास बाधा आणणाऱ्या रिती रिवाजांना मूळापासून नष्ट करण्याचा प्रयत्न केला. ही एक स्त्रीने केलेली क्रांती होती. याची शिक्षा म्हणून मृत्यूदंड देणे निश्चित होते त्यामुळे त्यांना मारण्यासाठी विषाचा पेला, सापाची पेटी आणि सूळाची व्यवस्था करण्यात आली.

मीराने आपल्या मृत्यूची पर्वा न करता कृष्णाच्या चरणी आपल्याला समर्पित करून तत्कालीन परिस्थितीला तोंड दिले व स्त्रीमुक्तीचा प्रयत्न केला. मीराने लौकीक संबंधांना नष्ट करून ईश्वरीय संबंध निर्माण केले व स्वत:ला स्वतंत्रपणे भक्तीमार्गावर नेले. हे कार्य साधारण स्त्री करू शकत नाही. मीराच्या काव्यामधून स्त्री मुक्तीचा सशक्त सूर दिसतो. तिने आपल्या जीवनाला असामान्यपणे विरोध करून रूढीवादी, सामंती प्रथा, मर्यादा व सत्तेच्या विरोधी स्त्री जागृती घोषणा करून जगामध्ये आपले स्थान उंच केले.

मीराच्या काव्यांनी जगामध्ये सर्वांना प्रभावित केले. मीराचे तत्कालीन सामंती मर्यादाच्या विरोधी बंड होते. वर्षानुवर्षे चालत आलेल्या पडदा पद्धतीला विरोध करणयाचे धैर्य दाखविले. विधवांवर होणाऱ्या अत्याचारांचा प्रखर शब्दामध्ये विरोध करून स्त्रीयांना कृष्ण भक्तीमध्ये आकर्षित केले. सती प्रथेला विरोध केला. स्त्री जागृतीचा आवाज उठवून स्त्रीयांना आत्मविश्वासाने जगण्याचा धडा शिकविला. भक्तीच्या माध्यमातून भेदाभेद कायम मिटविण्याचा प्रयत्न केला. मीराच्या या धाडसामुळे दक्षिणेमध्ये अम्मैयार व आण्डाल यासारख्या श्रेष्ठ भक्त स्त्रीया झाल्या. मीराचे साहित्य लोकभाषेमध्ये होते त्यामुळे लोकभाषा समृद्ध झाली. लोकांनी प्रेमाचे महत्त्व जाणले. संपूर्ण स्त्री समाज भय, हीनता, दुबळेपणा परिस्थितीतून मुक्त झाला. प्रजेमध्ये आस्था व आत्मविश्वास वाढला.

मीराने स्वत: साहित्य लिहिले नाही विविध प्रदेशातील भक्तांनी काही बदलाबरोबर लिहिले. मीराची भाषा साधी व बोली भाषा होती.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - ३ :**

**(अ) योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

१) मीराबाईचा जन्म ............ येथे झाला.

अ) जोधपूर ब) जयपूर क) चितोड ड) मेडता

२) मीराबाईचे शिक्षण ............ गुरूंच्या सान्निध्यात झाले.

अ) पंडीत गजघर ब) पंडीत तानसेन क) तोडरमल ड) बिरबल

३) मीराबाईचा विवाह ............शी झाला.

अ) भोजराज ब) रतनसिंह क) विक्रमजित ड) संग्रामसिंह

४) मीराबाईने ............ ची भक्ती केली.

अ) राम ब) कृष्ण क) शिव ड) विष्णू

५) मीराबाईने पंडित गजघरला ............ पदवी दिली.

अ) पंडित ब) व्यास क) वाल्मिकी ड) आचार्य

**(ब) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) मीराबाईच्या वडीलांचे नाव काय होते?

२) मीराबाईने कोणत्या प्रथेला विरोध केला?

३) मीराबाईला कोणी त्रास देण्यास विरोध केला?

४) मीराबाईने कोणाला जमीन दिली?

५) मीराबाईच्या काळात दिल्लीमध्ये कोणाची सत्ता होती?

## १.३ सारांश :

मध्ययुगामध्ये भारतामध्ये इस्लामी सत्ता आपला विस्तार करीत होत्या. राजपूत सत्ता कमकुवत झाल्या होत्या. सामान्य जनता अत्याचारामुळे हालाखीचे जीवन जगत होत्या. आध्यात्मिक दृष्ट्या अनेक पंथ व धर्म आपला प्रचार करीत होते. आपले तत्त्वज्ञान मांडताना त्यांच्यात परस्पर विरोधाभास होता. अशा परिस्थितीमध्ये समाजाला भक्तीचा मार्ग दाखविण्याचे कार्य संतांनी केले. तुलसीदास, सूरदास, कबीर व मीराबाईने समाजाला भक्तीचा मार्ग दाखविला. या चारही संतांनी क्लेश सहन केले. तुलसीदासने रामभक्ती द्वारे मर्यादा, प्रेम व विरह समाजासमोर मांडला. प्रेमाशिवाय

भक्ती अपूर्ण आहे हे स्पष्ट केले. सुरदासने भक्ती हा ईश्वराच्या सेवेचा प्रकार आहे हे स्पष्ट केले. नामस्मरणाने सर्व बंधने नष्ट होतात हे सांगितले. कबीरने हिंदू व मुस्लीम धर्माच्या ठेकेदारांना खडसावले. मुस्लीम व हिंदू धर्मात समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. समाजातील अनिष्ट प्रथांवर टीका केली. मीराबाईने सती जाण्यास नकार देऊन स्त्री सबलीकरणाच्या दिशेने एक पाऊल टाकले. भक्तीमुळे सर्व संकटे दूर होतात असे सांगितले. लोकभाषेमध्ये संदेश दिल्यामुळे सामान्यांपर्यंत पोहोचला.

## १.४ पारिभाषिक शब्द व अर्थ :

**१) संवत =** हिंदू कालगणना

**२) पद =** ओवी

## १.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न - १**

(अ) योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.

१) नरहरीदास २) तुलसीदास ३) मुनिया ४) सीही ५) वल्लभाचार्य

(ब) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) सूरदास २) तुलसीदास ३) सूरसागर ४) सूरदास ५) हुलसी

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न - २**

(अ) योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.

१) मगहर २) नीमा ३) महान ४) हिंदू ५) क्रांती भावना

(ब) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) पंडीत व मुल्ला-मौलवी २) स्त्री ३) गुरू ४) संतांना ५) प्रेमहीन हृदयाला

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न - ३**

(अ) योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.

१) मेडता २) पंडीत गजधर ३) भोजराज ४) कृष्ण ५) व्यास

(ब) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) रतनसी २) सती ३) विक्रमजित ४) पंडीत गजधर ५) मोगल

## १.६ सरावासाठी स्वाध्याय :

**(अ) टिपा लिहा.**

१) तुलसीदास

२) सुरदास

३) कबीर

४) मीराबाई

**(ब) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१) तुलसीदासचे अल्पचरित्र सांगून त्यांचे कार्य सांगा.

२) सूरदासचे अल्पचरित्र सांगून त्यांचे कार्य सांगा.

३) कबीरचे अल्पचरित्र सांगून त्यांचे कार्य सांगा.

४) मीराबाईचे अल्पचरित्र सांगून त्यांचे कार्य सांगा.

## १.७ अधिक वाचनासाठी पुस्तके :

१) Faroogui Salma Ahmed : 'A comprehensive history of medieval India'

२) Satish Chandra : 'History of medieval India'

३) Panday S. M. : 'Mirabai & her contribution to bhakti movement'

४) Lele Jayant : 'Tradition & modernity in Bhakti movement'.

❑❑❑

## घटक २

# सूफी संप्रदाय


२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ सूफी संप्रदायाचे स्वरूप व रचना

२.२.२ सूफी उपसंप्रदाय व सूफी संत

२.२.३ सूफी संप्रदायाचा वारसा / योगदान

२.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

२.४ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.५ सारांश

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


### २.० उद्दिष्ट्ये :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला,

- सूफी संप्रदायाच्या उदयाची माहिती घेता येईल.
- सूफी संप्रदायाची व्याख्या व अर्थ लक्षात येईल.
- सूफी संप्रदायाचे तत्त्वज्ञान समजेल.
- सूफी संप्रदायाची तात्त्विक भूमिका लक्षात येईल.

- सूफी उपसंप्रदायाची माहिती मिळेल.
- सूफी संताचे कार्य लक्षात येईल.
- सूफी संप्रदायाच्या योगदानाविषयी माहिती मिळेल.

## २.१ प्रास्ताविक :

मध्ययुगीन भारतीय समाजावर विविध धर्मांचा विशेष प्रभाव असल्याचे जाणवते. प्राचीन काळात भारतात हिंदू, बौद्ध व जैन धर्म यासारखे धर्म अस्तित्वात होते. १० व्या शतकाच्या प्रारंभी भारतावर तुर्कांची आक्रमणे सुरू झाली. त्याबरोबर इस्लाम धर्माचा भारतीयांवर प्रभाव वाढू लागला. या काळात विविध धर्मात धर्मसुधारणा चळवळ सुरू झाली. तशीच चळवळ मुस्लीम धर्मातही सूफी चळवळ सुरू झाली. यासाठी अनेक सूफी संतांची विचारसरणी उल्लेखनीय ठरली. सामाजिक समन्वय, शांतता, अहिंसा, धर्मसहिष्णुता यांचा विकास होण्यास मदत झाली.

## २.२ विषय-विवेचन :

### २.२.१ सूफी संप्रदायाचे स्वरूप व रचना :

**सूफीची व्याख्या व अर्थ :**

१) प्रा. अलबेरी - ''मुस्लीम व्यक्तीने आपले जीवन अल्लाहला अर्पण करण्याचा अनुभव घेणे म्हणजे सुफीझम होय.''

२) डॉ. ताराचंद - ''कळण्यास कठीण व गुंतागुंतीचे असलेले अपूर्व तत्त्वज्ञान जे एखाद्या प्रवाहासारखे आहे. ज्यामध्ये अनेक भागातील उपनद्या येऊन मिळतात. सूफीझमचा मुख्य आधार कुराण आणि प्रेषित आहे.''

३) डॉ. डी. के. भार्गव - ''मुस्लीम गुढवाद किंवा सूफीझम हा अति उच्च सौंदर्याची कदर बाळगतो. पूर्वेकडील विचार आणि पश्चिमेकडील विचार यांचे एकत्रीकरण प्रेमाच्या मूलगामी विचारधारेमध्ये झाले.''

**सूफी शब्दाचा उदय / उत्पत्ती :**

सूफी शब्दाच्या उदयाबाबत विद्वानांमध्ये एकवाक्यता नाही. या शब्दाच्या उत्पत्तीबाबत आपली विविध मते त्यांनी मांडली आहेत.

१) 'सुफिया' या फार्सी शब्दापासून सूफी म्हणजे आधात्मवादातील ज्ञानी असा शब्द आला आहे.

२) सूफी म्हणजे लोकरीचे जाडे भरडे वस्त्र. आपल्या अंगावर जाडे भरडे वस्त्र पांघरून इस्लामचा प्रसार करणाऱ्यांना सूफी म्हटले जाई. या व्युत्पत्तीबद्दल इबन्नश्वल्दुन, एडवर्ड ब्राऊन, निकोत्सन यासारख्या विद्वानांचे एकमत आहे.

३) 'सूफी' हा शब्द साफ म्हणजे शुद्ध. ज्याचे अंत:करण शुद्ध आहे तो म्हणजे सूफी होय.

४) ग्रीक शब्द 'सोफिया' म्हणजे ज्ञानी होय.

५) 'सुफ्फा' या मदिनीतील मशिदी समोरच्या चबुतऱ्यावर बसणाऱ्या फकीरांना सूफी संबोधले जाते.

६) सूफी म्हणजे संन्यस्त वृत्तीने अल्लाची भक्ती करणारे आध्यात्मिक लोक.

राहूल सांस्कृत्यायन यांच्या मते, सर्वप्रथम प्रसिद्ध तत्त्वज्ञ अबु घसिम यांना सूफी अशी उपाधि प्राप्त झाली. इमाम गजाली (१०५९-११११) यांनी म्हटले की तवत्सु म्हणजे ईश्वरी ज्ञान व तद्नुसार आचरण करणारे हे 'सूफी' असतात. पुढे ईश्वरी ज्ञानाचा विचार मांडणाऱ्या आणि तसे प्रत्यक्ष आचरण साधुपुरूषांची ही व्यापक चळवळ होत गेली. त्यात गृहस्थाश्रमी व कडक ब्रह्मचर्याचे पालन करणारे असे दोन्ही प्रकारचे 'सूफी' होऊन गेले.

**अबु हमीद महफदूल गजाली (१०५०-११११) :** सूफी पंथाला तत्त्वज्ञानाची बैठक मिळवून देण्यात खूरासान प्रांताचा रहिवाशी असलेल्या अबु हमीद गजालीने फार मोठे योगदान दिले आहे. बगदादच्या निजामिया विद्यापीठात त्यांनी अद्यापनाचे काम केले. इस्लाम धर्मावर अनेक महत्त्वपूर्ण ग्रंथांचे लेखन केले. १०९५ मध्ये सूफी पंथ स्विकारला. धर्माचा सखोल अभ्यास व चिंतन केले. त्यामुळे त्यांना साक्षात्कारी संत म्हणून ओळखले जाऊ लागले.

**सूफी संप्रदायाचा उदय :**

सूफी संप्रदायाचा भारतातील उदयाबाबत इतिहासकारांमध्ये विविध मते आहेत. मध्ययुगीन भारतात ज्याप्रमाणे हिंदू धर्मात भक्ती चळवळीस सुरुवात झाली तशीच चळवळ मुस्लीम धर्मात प्रेमभक्तीच्या आधारावर सूफी संप्रदायाचा उदय झाला.

**१) युसूफ हूसेन :** ''सूफी संप्रदाय हा इस्लामच्या मुळातून जन्मलेला आहे. परदेशी संकल्पना किंवा कृती यांचा त्यांच्यावर कोणताही प्रभाव नाही.''

**२) डॉ. ए. एम. श्रीवास्तव :** ''सूफी संप्रदायावर पूर्णपणे हिंदू विचार, श्रद्धा व कृतीचा प्रभाव आढळतो. परमेश्वरावरील श्रद्धेबाबत तीच संकल्पना, परमेश्वर व आत्मा यांच्यामधील संबंध हे दोन धागे सूफी संप्रदायाने हिंदू धर्मापासून घेतले. एक विशिष्ठ विचारसरणी आणि अहिंसा हे तत्त्वज्ञान या बाबी भारतातील सूफी संप्रदायाने स्विकारल्या. ज्या हिंदू, बौद्ध व जैन या संप्रदायात मोठ्या प्रमाणात आढळतात. उपास आणि शरीराला यातना देणे या बाबीही या संप्रदायातील रितीरिवाजाकडून घेतल्या.''

**३) प्रा. हुमायु कबीर :** ''सूफी पंथाला (विचाराला) कुराणात आधार होता. परंतु भारतीय विचारधारांचा त्यावर फार मोठा प्रभाव आहे.''

कुराणापासून सूफी संप्रदायाचा उदय झाल्याचे दिसते. मक्का, मदिना येथील सुरा अध्यात्मिक भावनेने व त्यागाच्या कल्पनेने भारून गेलेल्या असत. त्याग आणि आत्मसमर्पण यांनी या सुरा भरलेल्या आहेत. १० शतकात अरबपासून सूफी संप्रदायाचा उदय झाला असे मानले जाते.

**सूफी संप्रदायाचे तत्त्वज्ञान :**

मुहम्मद पैगंबरापासून ते अनेक थोर सूफी संत यांच्या विचारसरणीतून सूफी संप्रदायाचे तत्त्वज्ञान निर्माण झाले. परमेश्वरावर उत्कट प्रेम व भक्ती हा सूफी तत्त्वज्ञानाचा मूळ गाभा असल्याचे दिसून येते.

१) अल्ला (परमेश्वर) एकच असून तो सर्व व्यापी व सर्वस्पर्शी आहे.

२) तो विश्वनिर्माता असून विश्वातील सर्व वस्तुमानात तो आहे.

३) सर्व दृश्य व अदृश्य वस्तुमान आणि जीवमात्र त्याच्यापासून तयार होतात.

४) अल्लाहवर प्रत्येकाची अढळ श्रद्धा व विश्वास असला पाहिजे.

५) जिक्र (जप), नामस्मरण, एकांतातील चिंतन, वैराग्य या मार्गाने सत्याप्रत जाता येते. जिक्र करता करता सूफी अशा अवस्थेत पोहोचतो की त्याला अल्लाशिवाय कशाचेही भान राहात नाही.

६) सूफींनी संगीताची उपासना करावी.

७) ईश्वर प्राप्तीसाठी गुरूंची आवश्यकता आहे. गुरूला शेख व पीर असे संबोधतात. शिष्याने गुरूच्या आज्ञेत राहावे व त्याची भक्ती करावी.

८) सूफींनी आपले जीवन साधेपणाने व संयमाने जगावे व भौतिक सुखाचा त्याग करावा.

९) सूफींनी नमाज (प्रार्थना) व कुरआन पठण नियमित करावे.

१०) प्रत्येकाने आपले अंत:करण शुद्ध ठेवावे.

सूफीनी सुन्नीपंथीयांच्या मुलतत्त्ववादाला आव्हान दिले. ध्यानधारणा, नामस्मरण प्रार्थना, प्राणायाम यासंबंधीच्या गोष्टींना महत्त्व दिले. यात ध्यान, खुदाशी, सामीण्य, चिंतन, प्रेम, मैत्री, शांती, औत्सुक्य, निश्चय, भय, आशा इ. चा समावेश होतो. अनेक संतांनी स्वत:ला पीर बनविले व आपला सर्व वेळ भक्ती व प्रार्थना यात व्यतित केला. शिष्याला मुरीद म्हटले जाऊ लागले.

उलेमा इस्लाम धर्माचा पवित्र ग्रंथ कुराण. याचा अर्थ बरोबर लावत नाहीत आणि कुराणातील बंधुत्वाचे तत्त्व आचरणात आणत नाहीत. असा दावा सूफीनी केला. त्यामुळे सूफी आणि प्रस्थापित उलेमा एकमेकांचे विरोधक बनले. उलेमानी सूफीच्या उदारमतवादावर प्रखर टीका केली. उलेमा हे संधीसाधू आहेत. कारण ते सुलतानाला लेच करून त्याला विरोध करणे टाळतात. असे सूफीचे मत बनले. याबाबत सूफीनी बंड केले नाही. चांगले दिवस येतील यावर त्यांचा विश्वास होता. सूफी संत म्हणजे 'पीर' यांना हिंदू धर्मियाकडून फार मोठा आदर प्राप्त झाला.

सूफीनी अद्यात्मात प्रगती साध्य केली पाहिजे. या प्रगतीचे सात मार्ग सांगण्यात आले आहेत.

१) पश्चाताप, २) संयम, ३) खुदावर विश्वास, ४) संतोष, ५) धैर्य, ६) विराग संन्यास, ७) दैन्य.

ज्याप्रमाणे ख्रिश्चन मिशनरी त्यांच्या धर्मप्रसारासाठी आपल्या तत्त्वज्ञानाच्या प्रसारासाठी जगभर गेले. १३ व्या शतकात सूफी भारतात आले.

**सूफी पंथाची तात्त्विक भूमिका / विचारप्रवाह :**

सूफी पंथीयावर नव्या प्लेटोवादामुळे परिणाम होऊन त्यांच्यात त्यागभावना वाढीस लागली. परमेश्वरी अस्तित्वावरील श्रद्धेत वाढ झाली. हिंदू धर्मियांशी आलेल्या संपर्कामुळे त्यांचा शक्ती देणारा राजयोग सूफीनी स्विकारला. सूफी पंथाची तात्त्विक भूमिका विशद करणारे पाच विचारप्रवाह पुढीलप्रमाणे -

**१) सूफी संत हुसेन-बिन-मन्सूर :** याने आत्मा व परमात्मा यांच्या एकात्मतेवर भाष्य केले. आपली भूमिका विशद करताना ते म्हणतात, 'अमल हक, अनल हक' (मी तो आहे, मी तो आहे.) परमेश्वर एकात्त्वात सामावला असून यामधून अनेकत्त्वाची निर्मिती झाली आहे. उत्कट प्रेम करणाऱ्या भक्तांवर ईश्वरी कृपा होते. मनुष्य भक्तीने परमेश्वराशी एकरूप होतो. दोन आत्मे एक होतात. अशा भक्तास ईश्वरी साक्षात्कार होतो.

**२) इब्नसीना :** 'ईश्वर अलौकिक व विश्वव्यापक आहे' असा निष्कर्ष काढून दूसरा प्रवाह मांडला. सर्व काही परमेश्वर आहे आणि परमेश्वर सर्वठायी आहे. एकरूपता म्हणजे सत्य होय. अंतिम सत्य हेच ज्ञान होय. ते निर्गुण व एकच आहे.

**३) सुऱ्हावर्दी :** ईश्वरामध्ये विलीन होणे हे आपले अंतिम ध्येय आहे. ते साध्य होईपर्यंत आत्मा पुन्हा-पुन्हा जन्म घेत राहतो. जेव्हा आत्मा परमात्म्यात विलिन होतो तेव्हा तो अंतिम ध्येय गाठतो.

**४) इब्न-अल-अरबी :** ईश्वराने प्रतिबिंब मानव व निसर्गठायी आहे. श्रद्धा व अखंड चिंतन याद्वारे ज्ञानाची प्राप्ती होते. ज्ञानप्राप्तीसाठी धर्म, जात, वर्ण ते अडसर ठरत नाहीत. मानवास भावनाशुन्य अवस्थेत जाण्यासाठी ज्ञानमार्ग स्विकारावा लागतो.

**५) अब्दुल करीम अलजीली :** 'संपूर्ण विश्व हे परमात्म्याचे रूप आहे. त्या स्वरूपाच्या दिशेने मानवाचा प्रवास सुरू होतो. मानवाची परिपूर्ण अवस्था म्हणजे परमेश्वराची प्रतिकृती समजण्यात येते.' यानुसार सर्व विचार हे ईश्वराबद्दलचे विचार आहेत. सर्व प्रकारच्या पूजा, प्रार्थना परमेश्वराचे रूप प्रकट करतात. सूफी संप्रदाय येथे अंतिम स्थितीपर्यंत पोहोचल्याचे दिसते. आत्मा परमात्मा संयोग पावतो. परमेश्वराशी एकरूप होतो. या प्रक्रियेला 'गुढवादी' हकीकत असे महटले जाते.

**सूफी तत्त्वज्ञानाचे स्वरूप :**

सूफीनी साक्षात्कार हे ध्येय मानल्यामुळे योगशास्त्रीय सिद्धांत विकसित झाले. यौगिक अनुभवाचे अन्वयार्थ लावून त्याचे प्रणालीकरण करण्यात आले. वैराग्य, जप, एकांतवास, ईश्वराशी तादात्मय व विविध प्रकारच्या अतिदिव्य अनुभूती याची मिमांसा सूफी संप्रदायात आढळते.

**१) परमेश्वराचे स्वरूप :** सूफी संप्रदाय एकेश्वरवादी आहे. जात (सत्ता), सिफत (गुण) आणि कर्म याबाबती परमात्मा अद्वितीय आहे. तो अगोचर व अपरिमित आहे. परमात्मा हा परमसुंदर, परमशिवस्वरूप आहे. तो परमसत्य आहे. माणसाचा आत्मा हा परमात्म्याचा अंश आहे. अहंकार व आसक्ती यामुळे परमात्म्याचा विसर पडतो. अज्ञान हे दु:खाचे मूळ कारण आहे. 'मोक्ष' म्हणजे अज्ञानाचा निरास, अहंकार, आसक्ती याचा निरास परमेश्वर कृपेनेच होतो. परमेश्वरामुळेच सर्वश्रेष्ठ ज्ञान व शाश्वत आनंद प्राप्त होतो. अशी सूफींची श्रद्धा आहे.

**२) अध्यात्म मार्गातील टप्पे :** आध्यात्म जीवनातील प्रगतीला सूफी पंथात 'मार्ग' म्हणतात. त्यावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशाला 'सालिक' म्हणतात. या सालिकला परमेश्वराचे ज्ञान म्हणजे 'मारिफत' संपादन करण्यासाठी योग्य शिक्षण आवश्यक असून ते खालील टप्प्यानुसार दिले जाते.

**(अ) अबुदियात (सेवा) –** म्हणजे आत्म्याचा आळस जाऊन आपल्या हातून घडलेल्या गोष्टीसंबंधी जाणीव व पश्चात्ताप होऊ लागतो.

**(ब) इश्क (प्रेम) –** परमेश्वरी कृपेने आत्म्याला परमात्म्याविषयी ओढ लागते.

**(क) जोहद (त्याग) –** परमेश्वर सोडून सर्व गोष्टींचा त्याग अभिप्रेत आहे.

**(ड) मारिफत (ज्ञानप्राप्ती) –** भक्त परमेश्वराच्या रूपाचे ध्यान करू लागतो. सर्व गोष्टीतून लक्ष काढून घेऊन ते एका परमेश्वरात लावल्यास परमेश्वराच्या रूपाचे ज्ञान भक्ताला होतो.

**(इ) वजद (उन्मनावस्था) –** परमेश्वराच्या ध्यानाने उन्माद अवस्था प्राप्त होते. अशी अवस्था प्राप्त करण्यासाठी हा ध्यानधारणा करतो.

**(ग) हकीकत –** परमेश्वर स्वरूपाचा पूर्ण प्रकाश पडल्यावर भक्ताच्या भावना 'तवकल' म्हणजे परमेश्वराबद्दल पूर्ण शरणागतीची भावना तयार होते. यात परमेश्वरास शरण जाणे म्हणतात व तोच एकमेव सत्य आहे हे जाणणे याला 'तौहिद' म्हणतात.

**(म) वसल (मिलन) –** भक्ताला परमेश्वराचा साक्षात्कार होतो.

**(भ) फना (आत्मविस्मृती) –** परमेश्वरास जीवन कंठणे याचा अनुभव येतो.

**(न) बुरवा (विलीन) –** भक्ताचे हृदय समाधानाने परिपूर्ण होतो हे समाधान म्हणजे परमेश्वराच्या इच्छेवर पूर्ण निष्ठा व त्यांचे सहर्ष स्वागत हे परमेश्वराचे दोन पैलू आहेत.

**३) आत्मास्थितीचे टप्पे :** माणसाच्या आत्मस्थितीचे सात शुद्ध टप्पे सांगितलेले आहेत. (१) तबात- पश्चात्ताप, (२) इनाबत - मतांतर, (३) जुहूद - त्याग, (४) तवकुल - शरणागती, (५) सबु - संतोष, (६) शुकर - ईश्वराची कृतज्ञता, (७) रजा - ईश्वराची इच्छा हिच आपली इच्छा होय.

या टप्प्याला सद्‌गुण असेही म्हटले आहे. या सद्‌गुणाच्या जोपासणेतून भक्त परमज्ञानाचा अधिकारी होतो.

**४) सूफीचे आचारशास्त्र :** निर्गुण, निराकार परमात्मा खाली उतरून मनुष्यातून प्रकट होतो. या खाली उतरण्याच्या क्रियेला (स्वर्गातून पृथ्वीवर येणाऱ्या क्रियेला) 'सफरूल हक' असे म्हणतात. 'सफरूल हक' म्हणजे परमात्म्याचा प्रवास. आत्म्याच्या प्रवासाला (की जो पृथ्वीकडून स्वर्गाकडे होतो) 'सफरूल अबद' म्हणतात. पहिला प्रवास निर्गुणाकडून सगुणाकडे होतो तर दुसरा प्रवास सगुणाकडून निर्गुणाकडे मार्गक्रमीत होतो. यासाठी म्हणजेच आत्मोद्धारासाठी चार आचार मार्ग प्रति पावन केले आहेत ते पुढीलप्रमाणे -

**(अ) शरीयत –** शरीयत म्हणजे धर्माचाराचे पालन मनुष्याने कसे करायचे हे सांगणारे नियम. धर्माचाराचे पालन मनुष्यासाठी आवश्यक आहेत.

**(ब) मलकूत –** मलकूत म्हणजे दैवी संपत्ती. यात सूफी पंथ अत् तरीकच्या तत्त्वाने चालणे जरूरी आहे.

**(क) जबरूत -** याचा अर्थ सिद्धीची प्राप्ती. यात 'मारिकत' म्हणजे ज्ञान संपादने हे आवश्यक आहे.

**(ड) लाहुत -** म्हणजे परमेश्वरात (हकीकत) विलीनीकरण होय.

शरीयतच्या आचारधर्मात खालील गोष्टी समाविष्ठ होतो.

१) तिलावत म्हणजे कुराणाचे पठण.
२) रोज पाच वेळा नमाज पढणे.
३) जिक्र म्हणजे परमेश्वराचे स्मरण करणे.
४) फिक्र म्हणजे ईश्वराच्या गुणाचे चिंतन करणे.
५) समा म्हणजे ईश्वरी नावाचे संकीर्तन करणे.
६) मुजाहद म्हणजे सर्व इंद्रिये व चित्तवृत्ती यांचा विरोध करणे.

**५) सूफींचा जिप्रवास :** काही सूफी संतांच्या मते, मनुष्याच्या आत्मोद्धाराचे तीन मार्ग आहेत. (१) सयरील्ला- परमेश्वरापर्यंत प्रवास. यात भक्त परमेश्वराच्या आज्ञेने निर्माण झालेल्या जगापर्यंत प्रवास करतो. (२) सैरफिल्ला - भक्त परमेश्वर रूपात प्रकट होतो. (३) सॅर अनिल्ला - परमेश्वराकडून किंवा परमेश्वरापासून प्रवास. यात आत्मा परमात्म्यापासून अलग होऊन 'जीव' धारण करण्यासाठी विश्वाकडे प्रवास करतो.

**६) आत्म्याचे स्वरूप - सूफीची धारणा :** सूफीच्या मताने आत्मा दोन स्वरूपाचा असतो. (१) रूह - रूह हे आत्म्याचे पवित्र स्वरूप असून तो श्रेष्ठ आहे. (२) 'नफस' हे आत्म्याचे कामक्रोधादी मुक्त स्वरूप होय. या नफसला आटोक्यात आणणे हे भक्ताचे काम होय. त्यासाठी सूफी हे उपासतापास, मौन, एकांत इ. मार्गाचा अवलंब करतात. नफसचा नाश करणे हा त्यांचा हेतू नसतो. तर नफसमधून विकार काढून टाकणे हा असतो.

**७) तेजल्ली म्हणजे प्रकाश :** परमेश्वर तेजाच्या तीन पायऱ्या - (१) तजल्ली अफाल - परमेश्वर कृतीची तेजाद्वारे जाणीव. (२) तजल्ली ए शहुदी - परमेश्वराची नावे प्रकाशमान करणे किंवा जाहीर करणे. (३) तजल्ली ए सिफाती - परमेश्वरी गुणांचा प्रकाश पडणे. म्हणजे परमात्मरूपाचा प्रकाश पडणे. परमात्म स्वरूपाचा प्रकाश पडल्यावर त्या व्यक्तीला 'अल फरदूल कामिल' म्हणजे पुरूषोत्तम किंवा सिद्ध पुरुष म्हणतात. या सिद्ध पुरुषाला 'गौसूल जामी' म्हणजेच जगदाधारी म्हणतात. अशा संताच्या परमेश्वर सृष्टीला मदत करतो. त्याच्या कृतीत परमेश्वरी प्रेरणा असते व परमेश्वर त्यांना योग्य मार्गदर्शन करतो. अशा संताला 'अलमहदी' म्हणतात.

**८) फना (नष्ट होणे) :** फना ही बका नवजीवनाच्या पूर्वीची अवस्था होय. 'फना' म्हणजे ममत्त्वाचा नाश तर 'बफा' म्हणजे परमेश्वर स्वरूपाच्या चिंतनात मग्न राहणे होय. फनाच्या द्वारे भक्ताचा गुण व स्वरूप ही परमेश्वराच्या स्वरूप, गुण आणि कृती यात बदल होतात. फनाचे तीन प्रकार आहेत.

**(अ) कुर्वे फरायत -** यात सूफी परमेश्वराच्या हातातील बाहुले बनून त्याच्याद्वारे काम करतो.

**(ब) कुर्वे-न-वासिल -** यात सूफी परमेश्वराच्या मध्यस्थी म्हणून काम करतो.

**(क) जमाबयनुल कुरबैन -** यात सूफी परमेश्वराशी एकरूप होतो.

**९) गुरूभक्ती :** सूफी पंथात गुरूभक्तीला अतिशय महत्त्व आहे. परमेश्वराच्या मार्गात प्रगती करण्यासाठी गुरू असणे आवश्यक आहे. सूफी गुरूला शेख, पीर, मुरशिद म्हणतात. तर शिष्याला 'मुरीद' म्हणतात. जो गुरूकडून उपदेश घेतो त्याला 'बैत' म्हणतात. तर शिष्यामध्ये अध्यात्माची जाणीव उत्पन्न करून देतो. आपली आध्यात्मिक शक्ती शिष्याकडे दिली जावी. म्हणून 'पीर' किंवा 'गुरू' ध्यानाचा जो प्रकार उपयोगात आणतो त्यास 'तवज्जु' असे म्हणतात. अशा प्रकारचे ध्यान शिष्याने गुरूची आध्यात्मिक शक्ती आपणासही लाभावी म्हणून करावयाची असते. गुरूभक्तीमध्ये गुरूने जे सांगेल ते करण्याची तयारी शिष्याने ठेवली पाहिजे. गुरू शिष्याला हात धरून आध्यात्मिक पायरीवर चढवितो. प्रथम त्याला पीराचा म्हणजे आपल्या विशिष्ट सूफी पंथाचा संस्थापक याचा व नंतर महम्मद पैगंबराचा व शेवटी परमात्म स्वरूपाचा साक्षात्कार घडवितो. गुरू हा मार्गदर्शक असल्यामुळे गुरूभक्तीला सूफी पंथात महत्त्व आहे.

पीर म्हणजे सूफी संत किंवा गुरू यांच्या समाधीची जागा म्हणजे दर्गा. दर्ग्याची यात्रा म्हणजे 'जिरायत' पिराची किंवा गुरूची पुण्यतिथी निमित्ताने यात्रा भरते त्यास उरूस म्हणतात. भारतातील राजस्थानात अजमेर येथे 'ख्वाजा मुईनुद्दीन चिश्ती' यांचा दर्गा जगप्रसिद्ध आहे. असे अनेक दर्गे भारतात विविध ठिकाणी आढळतात. हिंदू व मुस्लीम या दोन्ही धर्मातील लोकांचे ते एक आदराचे ठिकाण होय.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - १ :**

**(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) सूफीचे मूळ तत्त्वज्ञान कोणत्या धर्मसंस्थापकाच्या विचारसरणीतून निर्माण झाले?

२) सूफी संप्रदाय कोणत्या धर्मातून उदयास आला?

३) सूफीझमचा मुख्य आधार कोणता धर्मग्रंथ आहे?

४) सूफीमध्ये गुरूला कोणकोणत्या नावानी ओळखले जाते?

५) ख्वाजा मोईनुद्दीन चिश्ती यांचा सुप्रसिद्ध दर्गा कोणत्या ठिकाणी आहे?

**(ब) योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

१) इमाम गजाली हे ............ या विद्यापीठात अध्यापनाचे काम करत.

अ) ऑक्सफर्ड    ब) फ्रान्स    क) लंडन    ड) निजामिया

२) मुस्लीम धर्माची स्थापना ........... यांनी केली.

अ)येशू ख्रिस्त    ब) महम्मद पैगंबर    क) कबीर    ड) गुरुनानक

३) सूफी संताच्या समाधीस्थळाला ............ म्हणतात.

अ) दर्गा    ब) थडगे    क) कबर    ड) समाधी

४) भारतात सूफी संप्रदाय ............ राष्ट्रातून आला.

अ) ग्रीक    ब) अरब    क) इराण    ड) इंग्लंड

५) सूफी संप्रदायाचे मूळ श्रद्धास्थान ............ आहे.

अ) अल्ला ब) कृष्ण क) शिव ड) विष्णू

## २.२.२ सूफी संप्रदायातील उपसंप्रदाय व सूफी संत :

भारतातील सूफी संप्रदायात अनेक उपसंप्रदाय निर्माण झाले. अनेक सूफी संतांनी भारतातील विविध भागात या सूफी उपसंप्रदायाच्या तत्त्वांचा प्रसार केला. समाजातील लोकांच्या जीवनाशी समरस होऊन आपल्या संप्रदायाच्या तत्त्वांचे पालन केले. सूफी संप्रदायाचे एकूण १२ उपसंप्रदाय भारतात असून चिश्ती व सुहारवर्दी (सुऱ्हावर्दी) हे उपसंप्रदाय अधिक लोकप्रिय झाले. भारतातील काही उपसंप्रदायाची माहिती पुढीलप्रमाणे -

### १) चिश्ती संप्रदाय :

इ. स. १२ व्या शतकात ख्वाजा अबु इशाक शामी चिश्ती यांनी या संप्रदायाची स्थापना केली. इशाक हे हिरातजवळील चिश्ती या ठिकाणी वास्तव्यास होते. या गावाच्या नावावरून या संप्रदायाला चिश्ती हे नाव मिळाले. भारतात चिश्ती संप्रदायाचा प्रसार ख्वाजा मोईनुद्दीन चिश्ती यांनी केला. हे मोहम्मद घोरीच्या समकालीन असून ११९२ च्या दरम्यान ते मोहम्मद घोरीच्या सैन्याबरोबर भारतात आले. ते मूळचे सिस्तानचे राहणारे होते. प्रथम लाहोर, दिल्ली आणि मृत्युपर्यंत अजमेर येथे त्यांनी वास्तव्य केले. येथूनच त्यांनी संपूर्ण भारतभर चिश्ती संप्रदायाचा प्रसार केला. त्यांची राहणी अत्यंत साधी असून कुरआन पठणावर त्यांचा भर होता. हिंदू व मुस्लीमांमध्ये ते लोकप्रिय ठरले.

वहदतल वजुद (सत्ताशास्त्रीय एकत्त्ववाद) हे चिश्ती संप्रदायाचे प्रमुख तत्त्व होते. हा संप्रदाय संगीताला त्याज्य मानीत नाही. चिश्ती संप्रदायाच्या प्रसारासाठी मोईनुद्दीन चिश्ती यांनी दोन ग्रंथ लिहिले इस्लामेतरांनाही आपल्या संप्रदायात प्रवेश करण्यास चालना दिली. आई, वडील, गुरू यांची सेवा करावी. आपली राहणी साधी असावी. आयुष्यात एकदा तरी मक्केची यात्रा करावी. अध्यात्मिक साधनामध्ये श्वासनिरोधन, केंद्रित बैठक आणि एकांतातील प्रार्थनेला महत्त्व दिले. या संप्रदायाची तत्त्वे अंगिकारण्यास सुलभ असल्यामुळे या पंथाचा प्रसार होण्यास मोठ्या प्रमाणात मदत झाली. ख्वाजा मोईनुद्दीन यांनी दिल्ली ते अजमेर या आपल्या प्रवासात जवळजवळ ७०० हिंदूंना मुस्लीम धर्मात घेतल्याचे मानले जाते. ख्वाजा मोईनुद्दीन चिश्ती यांची अजमेर येथे समाधी असून ते एक केवळ भारतातीलच नव्हे, तर संपूर्ण जगातील महत्त्वाचे तिर्थक्षेत्र बनले आहे. दरवर्षी मोठ्या संख्येने अनेक धर्मातील लोक एकत्र येतात.

या चिश्ती संप्रदायात अनेक थोर संत होऊन गेले. त्यांनी या संप्रदायाच्या प्रसाराचे कार्य केले.

(१) बख्तियार काकी, (२) शेख हमीदुद्धीन नागोरी, (३) शेख फरिदुद्धीन, (४) शेख निजामुद्धीन अवलिया, (५) शेख सिराजुद्धीन, (६) बुऱ्हाणुद्धीन, (७) शेख अब्दुलहक, (८) शेख मोहम्मद तुर्क, (९) शेख फक्रुद्धीन मसुह, (१०) शेख शासीरुद्धीन मोहम्मद, (११) हजरत गेसूदराज, (१२) हजरत अशरफ जहांगीर, (१३) शेख मन्ता, (१४) शेख वहीद, (१५) शेख मसून, (१६) शेख अली, (१७) गैजेशकर, (१८) अमीर खुश्रो इ.

या संतांनी राजनिती व राज्यकर्त्यापासून दूर राहून चिश्ती संप्रदायाचा प्रसार केला.

### २) सुराहवर्दी (सुऱ्हावर्दी) संप्रदाय :

१२ व्या शतकात इराकमध्ये नजीबुद्धीन यांनी इराकमध्ये या संप्रदायाची स्थापना केली. त्यांचे शिष्य बहाउद्धीन झकेरिया यांनी १३ व्या शतकात हा संप्रदाय भारतात आणला. या संप्रदायाने इस्लामेतर अनेक गोष्टींचा स्वीकार केला. पंजाब व मुलतान ही त्यांची प्रमुख केंद्रे होती. बंगाल व गुजरातमध्येही या संप्रदायाचा प्रसार केला. सुराहवर्दीचे राहणीमान डामडौलाचे असून सुलतानाशी त्यांचे सख्य होते. इस्लामतत्त्वाचे ते कट्टर पुरस्कर्ते होते. त्या तत्त्वांचे ते काटेकोर पालन करत. बहाउद्धीन झकेरिया यांनी 'अलासुल मुरोद्धीन' हा ग्रंथ लिहिला. त्यात काटेकोर आचरणाची माहिती दिली आहे. अल्तमशने बहाउद्धीन झकेरिया यांना 'शेख उल इस्लाल' (इस्लामचा नेता) ही पदवी दिली. या संप्रदायातील संतांनी राज्यकर्त्याशी सहकार्याचे व सलोख्याचे संबंध प्रस्थापित करून अनुदानाच्या रूपात संपत्ती व जमिनी मिळविल्या. प्रामुख्याने वरिष्ठ वर्गाला आपल्याकडे आकर्षित करून घेण्यात ते यशस्वी ठरले.

या संप्रदायात मखदूमी, इस्माईलशाही, मीरानशाही सारख्या शाखा आहेत. यातील काही शाखांनी मादक पदार्थांच्या सेवनास मान्यताही दिली आहे.

सिंधमधील सैय्यद जलालुद्धीन सुर्खपोश, शेख जलालुद्धीन तरबेझी, जलालुद्धीन सुर्खबुखारी, बद्रुद्धीन आरिफ, फिरदौसिया, शेख हरफुद्धीन यासारखे प्रमुख संत या संप्रदायात होऊन गेले.

या संप्रदायाने राजसत्तेवर आपला प्रभाव वाढविण्याचा प्रयत्न केला, पण सुलतानशाहीच्या काळात तैमुरलंगने भारतावर स्वारी केली. त्याचा या पंथावर विपरित परिणाम होऊन त्याच्या ऱ्हासास सुरुवात केली.

### ३) कादिरीया संप्रदाय :

अब्दुल कादिर-अल जीलानी यांनी बगदाद येथे या संप्रदायाची स्थापना केली. इ. स. १०७७ ते ११६६ हा त्याचा कालखंड मानला जातो. महम्मद गौस यांनी १५ व्या शतकात हा संप्रदाय भारतात आणला. भारतात या संप्रदायाचे अनेक मठ आहेत. महम्मद मीर यांनी मुघल कालखंडात या पंथाचा प्रसार केला. त्यांना समाजात मानाचे स्थान मिळाले. दारा शिकोह व जहानआरा हे त्यांचे शिष्य होते. शाह जलाल व मखदुम शाह यांनी या पंथाचा प्रसार बंगाल व बिहार येथे केला. भारतात आजही लाखो अनुयायी या पंथाचे आहेत.

या पंथाचेही तत्त्वज्ञान 'सत्ताशास्त्रीय एकत्ववाद' हे होते. इतर धर्मासाठी त्यांनी गैरमार्गाचा अवलंब केला नाही. धर्मसहिष्णुता हे त्यांचे महत्त्वाचे धोरण होते. अब्दुल कादिर गिलानी यांनी अनेक प्रवचने देऊन या संप्रदायाचे तत्त्वज्ञान मांडले.

औरंगजेबाच्या कारकिर्दीत या संप्रदायाला ओहोटी लागली. कारण औरंगजेबाचे धोरण धार्मिकदृष्ट्या अहिष्णुतेचे होते. या संप्रदायातून कुमेशिया, मुकीमशाही, बहलुलशाही, हुसेनशाही यासारखे उपसंप्रदाय असून त्यांनी अध्यात्मिक उन्नती साधण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते.

### ४) नक्शबंदी संप्रदाय :

अहमद-अहा-यश्वी यांनी १२ व्या शतकात मध्य आशियात या संप्रदायाची स्थापना केली. महम्मद-बाकी-

चिला यांनी अकबराच्या काळात हा संप्रदाय भारतात आणण्याचे कार्य केले. तुर्की-मंगोल विरूद्ध इराणी धार्मिक कल्पना व संस्कृती यातील संघर्ष म्हणजे हा संप्रदाय होता.

या संप्रदायाचे 'वस्तुकल्पात्मक एकत्त्ववाद' म्हणजेच 'साक्षीतादात्म' हे तत्त्व होते. 'सर्व काही परमेश्वर नाही तर परमेश्वरापासून सर्व काही आहे' यावर यांचा विश्वास होता. शेख अहमद सरहिंदी यांनी वस्तुकल्पात्मक एकात्मवादाला महत्त्व दिले.

अलहल्लात, अल्लाउद्धीला सिननानी इ. संतानी या संप्रदायाच्या प्रसाराचे कार्य केले. या संप्रदायाने धार्मिक सहिष्णु धोरणाचा अवलंब केला. इस्लाममधील कट्टरतेला फाटा दिला. गुढवादाचे ज्ञान व आकलन झालेले गुरूचे नेतृत्त्व या संप्रदायाला लाभले. भक्ताच्या हृदयात परमेश्वर असतो हे या संप्रदायाचे मुख्य आध्यात्मिक तत्त्व होते. बुद्धीवादी दृष्टिकोन स्विकारलेल्या नक्शबंदी अनुयायांना खालील नियमांचे पालन करावे लागे.

१) सतत ईश्वराचे नामस्मरण करावे. 'ला-इलाह' असे ईश्वरनामस्मरण असावे.

२) प्रत्येकाने 'अल्ला' हे अक्षर आपल्या हृदयावर कोरलेले आहे असे समजून ध्यान करावे.

३) नामस्मरण किती वेळा झाले याचे ध्यान करावे.

४) भूलोकाच्या ईश्वराच्या दिशेने आपला प्रवास सुरू आहे हे ध्यानी ठेवावे.

५) मनात कुविचार ठेवू नये.

६) अधूनमधून आत्मविश्लेषण करावे.

७) सभेमध्ये एकांत अनुभवण्याची कला आत्मसात करावी.

८) चालताना सूफीची नजर पायाकडे असावी.

९) सूफीने आपल्या ध्येयाचा विसर पडू देऊ नये.

१०) प्रत्येकाने आपल्या हृदयावर संयम ठेवावा.

मुहम्मद बाकी बिला, शेख अहम्मद सरहिंदी, अलहल्लात, ज्ञान-इ-जनान, अला उदीला सिननानी यासारखे या संप्रदायात होऊन गेले. जान-इ-जनानच्या काळात हा संप्रदाय हिंदुच्या बाबतीत अधिक उदार व सहिष्णु झाल्यामुळे हळूहळू या संप्रदायाच्या ऱ्हासाला सुरुवात झाली.

### ५) फिर्दोसिया संप्रदाय :

मध्य आशियात सैफुद्धीन बाखर्झी यांनी या संप्रदायाची स्थापना केली. हा संप्रदाय भारतात आणण्याचे कार्य बद्रुद्धीन समर्कदी यांनी केले. या संप्रदायाचा जास्तीत जास्त प्रभाव बिहारमध्ये पडला. इमाम गजाली व अहमद-इब्न-याघ्या मानेरी हे या पंथाचे गुढवादी तत्त्ववेत्ते होऊन गेले. त्यांना भक्तीचे कर्मकांड व ढोंगीपणा मान्य नव्हता. नीतिमत्ता महत्त्वाची आहे, असे त्यांचे विचार होते. इस्लामचा गाढा अभ्यासक अबु हमीद महफदुल यांच्या तत्त्वज्ञानाचा फिर्दोसिया संप्रदायावर प्रभाव होता. तुघलक कालखंडात या संप्रदायाने आपला ठसा उमटविला.

**६) सतारिया संप्रदाय (शत्तारी) :**

अबु-यझीद-अल-विस्तानी यांनी १५ व्या शतकात या संप्रदायाची स्थापना केली. अब्दअला यांनी हा संप्रदाय भारतात आणला. या संप्रदायाच्या तत्त्वावर हिंदु धर्मातील भक्तीसाधना व तत्त्वज्ञानाचा प्रभाव होता. मुघल सत्ताधीश बाबर, हुमायुन, अकबर यांचा या संप्रदायाशी निकटचा संबंध होता.

वरील अनेक संप्रदायानी कर्मकांडाचा त्याग करून धर्माच्या माध्यमातून इस्लाम धर्माला तात्त्विक बैठक प्राप्त करून दिली.

सूफी संत महम्मद पैगंबरांनी सांगितलेल्या आध्यात्मिक जीवनाप्रमाणे जीवन व्यतीत करणाऱ्या व सूफी तत्त्वज्ञानाचा प्रसार करणाऱ्या व्यक्तीना सूफी संत म्हटले जाई. त्यांनी भारतीय तत्त्वज्ञानाला भारतीय परंपरांना दिलेले योगदान अनन्यसाधारण असे आहे. सूफी संतांनी उदार दृष्टिकोन स्विकारला. भारतीयामध्ये भिनलेल्या सांस्कृतिक मुल्यांचा त्यांनी आदर ठेवला. सूफी संताचा सामाजिक आशय महत्त्वाचा आहे. समाजात समन्वय राहावा हा आशय पुनरूज्जीवित करण्याचे कार्य या संतांनी केले. त्यांचे आचरण इतरांपेक्षा वेगळे असे. अर्थात विविध संप्रदायातील सूफींच्या आचरणात थोड्या फार प्रमाणात तफावत असल्याचे दिसून येते. अल्लाची प्रार्थना, कमी व साधे अन्न, कमी निद्रा, वासनेपासून दूर, संपत्तीचा त्याग, एकांतवास, हिंसा, चोरी व अनीतिपासून दूर असे त्यांचे आचरण असे. भारतात सूफी संत पुढीलप्रमाणे होऊन गेले.

**१) शेख ईस्माईल :** भारतातील मुस्लीम सूफी संताचा इतिहास पाहिला तर शेख ईस्माईलची नोंद सर्वात जुनी असल्याचे म्हटले जाते. ते मुळचे बुखाऱ्याचे इ. स. १००५ मध्ये ते लाहोरला आले. त्यांच्या धर्मनिरपेक्ष वृत्तीबद्दल ते सुपरिचित होते.

**२) ख्वाजा मोईनुद्धीन चिश्ती :** अजमेरमधील ख्वाजा मोईनुद्धीन चिश्ती यांचे नाव केवळ भारतातच नव्हे तर संपूर्ण मुस्लीम जगतात प्रसिद्ध आहे. त्यांचा जन्म ११४२ मध्ये मध्य आशियातील सिस्तान येथे झाला. लहानपणापासूनच ते विरक्त वृत्तीचे होते. परमेश्वर भक्तीकडे त्यांचा ओढा होता. महम्मद घोरीबरोबर ते भारतात आले. ते काही काळ पंजाबमध्ये राहिले. दिल्लीचाही त्यांनी प्रवास केला. नंतर ते अजमेरला आले. तेव्हा तेथील राजगुरू जयपाल जोगी यांना त्यांनी इस्लामची दीक्षा दिली. चिश्ती संप्रदायाचे ते मुख्य प्रवर्तक मानले जातात. सूफी संप्रदायाच्या तत्त्वज्ञान प्रसारासाठी त्यांनी दोन ग्रंथ लिहिले. एका ग्रंथात त्यांची व दुसऱ्या ग्रंथात गुरू उस्मान हारूणची बोधवचने दिली आहेत. सर्वधर्माचा आदर करा. सर्वांशी परोपकाराने वागा अशी शिकवण त्यांनी लोकांना दिली. त्यांना हजारो हिंदू-मुस्लीम शिष्य मिळाले. भारतातील सूफी संप्रदायातील चिश्ती संप्रदाय सर्वात मोठा संप्रदाय बनला. कारण साधी राहणी व सर्वांना पेलतील अशी धर्म कर्तव्ये होती. इ. स. १२३६ मध्ये त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या निधनानंतर अजमेर येथे त्यांचे दफन करण्यात आले व तेथे दर्गा बांधला. ते ठिकाण भारतातील एक प्रसिद्ध तिर्थक्षेत्र बनले. दरवर्षी तेथे भाविक हजारोंच्या संख्येने येतात. सम्राट अकबराने १० वेळा या दर्ग्यालाभेट दिली होती.

**३) बाबा फरीवुद्धीन (गंजेशकर) :** बाबा फरीवुद्धीन गंजेशकर यांचा जन्म ११७३ मध्ये काबूल राजघराण्यात

झाला. कौटुंबिक जीवनात त्यांना रस राहिला नाही. ईश्वरभक्तीकडे त्यांचा ओढा होता. त्यांनी आपले घरदार, संपत्ती सोडून वैराग्य धारण केले. काबुल सोडून मुलतान येथे वास्तव्यास आले. सूफी संप्रदायाच्या प्रसारासाठी त्यांनी आपले आयुष्य खर्ची घातले. अनेक इस्लाम देशांचा प्रवास केला. बगदाद येथील सूफी संताकडून 'धर्मशास्त्र व तत्त्वज्ञान' या विषयाचा अभ्यास केला. त्यांचे अनेक हिंदू अध्यात्मवादी लोकांशी स्नेहाचे संबंध होते. त्यांनी अरबी, फारशी, पंजाबी, हिंदी भाषेत साहित्य रचना केल्या. त्यांचे श्लोक व शबद पाचवे शीख गुरू अर्जुनसिंग यांनी पवित्र गुरू ग्रंथसाहेब मध्ये समाविष्ठ केले आहेत. बाबा फरीवुद्धीन यांनी आपला वारसा निजामुद्धीन अवलिया यांच्याकडे सोपविला. मुलतान ते दिल्ली या रस्त्यावर सतलज नदीच्या शांत काठावर एक झोपडी बांधून ते राहात होते. हिंदु व मुस्लीम या दोन्ही धर्मातील लोकांना त्यांनी परोपकाराबद्दल शिकवण दिली. आपल्या शिष्यांना अंगमेहनतीची कामे करण्याची शिकवण दिली. समाजात उदात्त तत्त्वांची रूजवणूक व्हावी, समाजात बंधुभाव वाढीस लागावा म्हणून त्यांनी अव्याहत कार्य केले. १२६५ मध्ये त्यांच निधन झाले.

**४) शेख निजामुद्धीन अवलिया :** हजरत निजामुद्धीन अवलिया सुलतानजी उर्फ महबुब-ए-इलाई यांचा जन्म १२३८ मध्ये बदामूँ येथे झाला. लहानपणी त्यांचे वडील मृत्यू पावल्यामुळे त्यांच्या आईनेच त्यांचे सर्व पालनपोषण केले. त्यांच्या वयाच्या १२ व्या वर्षीच बाबा फरीवुद्धीन यांनी आपला वारसा त्यांच्याकडे सोपविला. त्यांचा जास्तीत जास्त काळ हा दिल्लीतच गेला होता. इतर सूफी संताप्रमाणेच ते संगीत, नृत्य, भजन (कव्वाली) इ. साधनाद्वारे ईश्वराची उपासना करत. मानवसेवा हिच ईश्वरसेवा समजून त्यांनी कार्य केले. समाजप्रबोधन, उदात्त तत्त्वाची रूजवणूक व इस्लामच्या प्रसारासाठी त्यांनी आपले आयुष्य खर्ची घातले. अवलिया आपला शिष्य बनविताना साधकाला आपली संपत्ती विकायला भाग पाडत आलेला पैसा गरीबांमध्ये वाटायला लावत. थोडे कपडे, जपमाळ, नमाजासाठी चटईचा तुकडा, दोन-चार भांडी याखेरीज कोणतीही वस्तू बाळगण्याची परवानगी साधकाला देत नसत. त्यांनी हिंदू व मुस्लीम यांच्यात ऐक्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला. अवलिया यांना महम्मद तुघलक गुरू मानत असत. अवलिया व गियासुद्धीन तुघलक यांच्यात मतभेद झाले होते. पण या सुफी संताने आपली मान सुलतानपुढे झुकविली नाही. मुस्लिमेतर लोकांच्या श्रद्धेबद्दल त्यांनी अतिशय उदार दृष्टिकोन स्विकारला. त्यांची प्रवचने 'फवैदल फुआद' 'राहतुल फुआद' व 'सियारूल अवलिया' या ग्रंथात नमूद केली आहेत. मानवतेच्या प्रेमाने ती ओथंबिली आहेत. आपल्या धार्मिक विचारांशी एकनिष्ठ असणाऱ्या या सूफी संतांचे १३२५ मध्ये निधन झाले. जुनी दिल्ली येथे त्यांचा मकबरा आहे. दरवर्षी उरसाच्या निमित्ताने भक्ताचा तेथे मेळावा भरतो.

**५) अमिर खुश्रो :** सूफी संतपरंपरेतील अमिर खुश्रो यांचे योगदान महत्त्वाचे आहे. निजामुद्धीन अवलिया यांचे ते शिष्य असून त्यांचे कार्य नजरेत भरण्यासारखे आहे. हिंदी भाषेविषयी त्यांना अतिशय प्रेम होते. त्यांना हिंदी साहित्यात प्रतिष्ठा लाभलेली आहे. भारतीय प्रतिकांचा व बोली भाषेचा त्यांनी मोठ्या खूबीने वापर केला आहे. त्यांचे साहित्य अभ्यासल्यास त्यातील रचनेच्या शब्दाशब्दात आणि आशयाच्या कणांकणांत त्यांचे भारतीयत्त्व व्यक्त होते. त्यांनी वापरलेली रूपके आणि प्रतिमा मोहवून टाकणाऱ्या आहेत. यासंबंधीची असंख्य उदाहरणे देता येण्यासारखी आहेत. खुश्रोच्या येथील मातीसंबंधीची आपुलकी जबरदस्त आहे. अर्थात ही आपुलकी मानवजातीच्या प्रेमातून निर्माण झाली आहे. शेती व्यवसायाशी व ग्रामीण जीवनाशी संबंधित अनेक उखाणी रचून त्यांनी भारतीय

ग्रामवासियांच्या थेट मनाला स्पर्श केला आहे. त्या काळात संगीत हे लोकसंपर्काचे एक उत्तम साधन होते. खुश्रोनी संगीतास अपूर्व असे योगदान दिले आहे. त्यांनी सतारीचा शोध लावला. नवीन राग व चीजा रचल्या. त्यांची गेय काव्यरचना लोकांच्या ओठी खेळू लागली. लोकभाषेत व संगीताद्वारे मानवी व ईश्वरी प्रेमाचा संदेश त्यांनी लोकांपर्यंत पोहचविला. भारतीय संगीतप्रेमी समाजात खुश्रोना चांगला शिष्यवर्ग मिळाला.

**६) ख्वाजा बंदेनवाज उर्फ गेसुदराज :** ख्वाजा बंदे नवाज त्यांचा जन्म इ. स. १३२१ मध्ये दिल्ली येथे झाला. ज्ञानार्जनासाठी त्यांनी उत्तर, दक्षिण भारत असा प्रवास केला. ज्ञानप्राप्तीसाठी व ईश्वर प्राप्तीसाठी त्यांनी ध्यान धारणा केला. देशातील अनेक मकबऱ्यांना भेटी दिल्या. फिरोजशहा बहामनीच्या आग्रहास्तव कर्नाटकातील गुलबर्गा येथे ते वास्तव्य करू लागले. त्यामुळे द. भारतातील एक प्रसिद्ध सूफी संत म्हणून त्यांचे नाव झाले. त्यांनी तत्त्वज्ञानासाठी जवळजवळ १०५ पुस्तके लिहिली. जनतेस त्यांनी बंधुभावाने वागण्याचा संदेश दिला. अंतिम मुक्कामाच्या ठिकाणापर्यंत जाण्याचा धर्म हा एकच रस्ता असून सर्व मानवजात एकच आहे. हा संदेश त्यांनी दिला. इ. स.१४२२ मध्ये त्यांचे निधन झाले. गुलबर्गा येथे त्यांचा दर्गा असून दरवर्षी येथे उरूस साजरा होतो. हिंदू व मुस्लीम धर्मीय मोठ्या संख्येने यात सहभागी होतात.

**७) दावलमलिक :** १५ व्या शतकात दावलमलिक हे सूफी संत होऊन गेले. त्यांचे मूळ नाव अब्दुल लतिफ असे होते. दावल-उल-मुल्क ही पदवी त्यांना मिळाली होती. सूफी पंथाच्या प्रसारासाठी त्यांनी स्वत:ला वाहून घेतले. संत एकनाथ व संत रामदास यांच्या साहित्यात दावलमलिकचा उल्लेख आढळतो. इ. स. १४८८ मध्ये त्यांची हत्या झाली. सौराष्ट्रात त्यांची कबर आहे. पैठणजवळ पिंपळवाडी येथे त्यांचा दर्गा आहे. दरवर्षी येथे उरूस भरतो.

**८) हजरत दातागंज :** हजरत दातागंज यांचे मूळ नाव अब्दुल हसन हर्जबरी असे होते. 'Kashful Mahjub' हे त्यांचे अत्यंत प्रसिद्ध पुस्तक आहे. गझनी ही त्यांची मातृभूमी होती. एक कैदी या नात्याने ते भारतात आले. सध्या लाहोरजवळ असणारे त्यांचे समाधी स्थळ इतर सूफींनी भेटण्याचे स्थळ म्हणून ते त्यावेळी प्रसिद्ध होते. ते आयुष्यभर अविवाहित राहिले. सूफी पंथ म्हणजे इस्लाम धर्माचे सार आहे, अस ते मानीत.

**९) हमीवुद्धीन नागौरी :** उदारमतवादी सूफी संत हमीवुद्धीन नागोरी हे ख्वाजा मुईनुद्धीनचे शिष्य होते. त्यांचे जीवन अत्यंत सरळ, साधे व उदार होते. त्यांच्या प्रभावी धार्मिकतेमुळेच जनता त्यांना 'सुलतान तारीकीत' (संन्यासाचा सुलतान) म्हणत. ते उदारमतवादी असून इतर धर्मियांच्या चांगल्या गुणांची कदर करत असत.

**१०) बाबा फक्रुद्धीन :** द. भारतातील 'पेनुकोंडा' येथे त्यांचे वास्तव्य होते. द. भारतातील जनतेला त्यांनी सूफी संप्रदायाचे तत्त्वज्ञान आपल्या प्रवचनातून दिले. इ. स. १२२५ मध्ये त्यांचे निधन झाले.

**११) सादिक अली सरमस्त :** सादिक अली हे सूफी संत मुळचे मदिना येथील होते. कादिरीया पंथाच्या प्रचारासाठी ते भारतात आले. 'सत्ताशास्त्रीय एकत्त्ववाद' हे कादिरीया पंथाचे मुख्य तत्त्वज्ञान होते. त्याचा प्रसार त्यांनी केला. त्यांनी दौलताबाद येथे काही काळ वास्तव्य केले. त्यानंतर नाशिकच्या मठात येऊन तेथे वास्तव्य केले. त्यांच्या बाबतीत एक आख्यायिका सांगितली जाते की त्यांनी मठातील मूर्तींना मठातून जाण्याची आज्ञा

केली. दुसऱ्याची धार्मिक स्थळे ताब्यात घेण्याच्या घटना मध्ययुगीन भारताच्या इतिहासात दिसून येतात. सादिक अली सरमस्त यांचा मृत्यू १६४५ मध्ये झाला. त्यांचा दर्गा गोसाव्याच्या मठामध्येच आहे.

याशिवायही अनेक सूफी संत भारतात होऊन गेले. भारतातील सूफी संताचा इतिहास पाहिला तर शेख इस्माईल यांची नोंद सर्वांत जुनी असल्याचे म्हटले जाते. ते मुळचे बुखाऱ्याचे. इ. स. १००५ मध्ये ते लाहोरला आले. त्यांच्या धर्मनिरपेक्ष वृत्तीबद्दल ते सुपरिचित होते. इ. स. १०६७ मध्ये यमनच्या अब्दुल्ला यांनी गुजरात ही आपली कर्मभूमी निवडली. बोहरी समाजात ते जास्त लोकप्रिय होते. खोजा इस्माईल पंथाचे धर्मगुरू नुरुद्धीन (पर्शिया) यांनी गुजरातमध्ये कणबी, खारवा आणि कोरी समाजात कार्य केले. या जमाती मागासलेल्या होत्या. या जातीच्या अनेक लोकांनी इस्लाम धर्म स्विकारला. सैय्यद जलालुद्धीन हे मूळचे बुखाऱ्याचे होते. सिंधमधील 'उच' या गावी त्यांनी धर्मप्रसार केला. त्यांचे अनेक अनुयायीही संत झाले. सद्रुद्धीन आणि त्यांचे सुपुत्र कबीरुद्धीन यांनीही 'उच' मध्ये धर्मप्रसार केला. पंजाबमधील आदिवासी जनतेत सूफींनी कार्य केले. पर्शियन इराकमधील बू अली कलंदर यांनी पानिपतला धर्मप्रसार केला. शेख जलालुद्धीन तबिजी यांनी बंगाल, इमानशाह व दावलशाह यांनी गुजरात, मदिनेचे रहिवाशी खूनमीर हुसेनी यांनी नाशिक तर बख्तियार काफी यांनी अल्मतशला उपदेश केला.

वरीलप्रमाणे भारतात अनेक सूफी संत होवून गेले. त्यांचा सामाजिक आशय महत्त्वाचा ठरला. समाजात समन्वय रहावा म्हणून सामाजिक आशयाचे पुनरूज्जीवन करण्याचे कार्य त्यांनी केले. अनेक सूफी संतांनी विलासी जीवनाचा त्याग करून संन्यस्त जीवन स्वीकारले. कायदा व धर्मशास्त्र यात आपले विशेष स्थान निर्माण केले. अंतिम अनुभूमीच्या कक्षेत ठेवले. आपल्या परोपकारी वृत्तीने लोकांची मने जिंकून घेतली. परोपकार व सद्वर्तन हा त्यांचा स्थायीभाव होता. थोडक्यात, भारताच्या धार्मिक व सामाजिक चळवळीत सूफी संताचे योगदान फार मोठे आहे असे म्हणावे लागेल.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - २ :**

**(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) मोईनुद्धीन चिश्ती कोणाच्या सैन्याबरोबर भारतात आले?

२) चिश्ती संप्रदायात कोणत्या यात्रेला जास्त महत्त्व आहे?

३) दाराशूकोह व जहानआरा हे कोणाचे शिष्य होते?

४) अमिर खुश्रोचे गुरू कोण होते?

५) कादिरीया संप्रदाय भारतात कोणी आणला?

**(ब) योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

१) बहाउद्धीन झकेरियाला शेख उल इस्लाम (इस्लामचा नेता) ही पदवी ............ या सत्ताधिशाने दिली.

अ) महम्मद गौरी  ब) अल्तमश  क) शेरशहा  ड) बाबर

२) ............ यांनी 'अलासुक्त मुरोद्धीन' हा ग्रंथ लिहिला.

अ) बहाउद्धीन झकेरिया ब) असाईम क) अमीर खुश्रो ड) बाबा फक्रुद्धीन

३) सतारवादनाचा शोध ............ यांनी लावला.

अ) अमीर खुश्रो ब) हमीवुद्धीन नागौरी क) दावलमलिक ड) गेसुदराज

४) बाबा फरीवुद्धीन यांचा मकबरा ............ येथे आहे.

अ) दिल्ली ब) मुलतान क) विजापूर ड) गुलबर्गा

५) हजरत दातागंज याची मातृभूमी ............ ही होती.

अ) लाहोर ब) मुलतान क) गझनी ड) सिस्तान

## २.२.३ सूफी संप्रदायाचा वारसा / योगदान :

मध्ययुगीन भारताच्या इतिहासावर भक्ती संप्रदाय व सूफी संप्रदायाचे मौल्यवान असे योगदान आहे. भारतीय समाजावर त्यांचा आजही मोठा प्रभाव असल्याचे दिसून येते. सूफी संप्रदायातील संतांनी इस्लामचा नवा दृष्टिकोन निर्माण केला. बुद्धीला पटणारा दृष्टिकोन स्विकारण्याचे आवाहन त्यांनी भारतीय समाजाला केले. सूफी संप्रदायाचे योगदान पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**१) राजकीय प्रभाव :** सूफी पंथाचा उगम पश्चिम आशियात झाला असला तरी अरबांच्या भारतावरील आक्रमणाबरोबर सूफीचे भारतात आगमण झाले. १३ व्या शतकात भारतात इस्लामी राजवट सुरू झाली. त्यामुळे सूफींच्या धर्मप्रसारासाठी राजकीय पाठबळ मिळाले. परिणामी, मुस्लीम राजसत्ता दृढ करण्याचे कार्य त्यांनी केले. शेरशहा, अकबर, शहाजहान यासारख्या बादशहांनी सूफीबाबत उदार व उदात्त दृष्टिकोन स्विकारला. औरंगजेब बादशहाचा मात्र त्यांच्याबाबत अनुदारता असल्याचे दिसून येते.

**२) सामाजिक प्रभाव :** या संप्रदायाने मध्ययुगीन भारतीय समाजाचे चरित्र घडविण्यासाठी प्रयत्न केले. शांतता व अहिंसा या तत्त्वांचा पुरस्कार केला. मुस्लीम धर्मात प्रवेश करणाऱ्यांना प्रोत्साहन दिले. हिंदू धर्मीय व मुस्लीम धर्मियांना जवळ आणण्याचे कार्य केले. दोन्ही धर्मातील संतांनी एकमेकांच्या विचारांचा सम्मान केला. परिणामी, धर्मावर आधारित संघर्ष कमी होऊन दोन्ही संस्कृतीचा समन्वय साधण्याचा सूफीचा प्रयत्न यशस्वी झाला.

**३) संतांची परंपरा :** दिल्ली येथील नासिरूद्धीन चिराग, अवलिया, फत्तेहपूर, सिक्री येथील शेख सलिम चिश्ती, अजमेर येथील मोईनुद्धीन चिश्ती, ख्वाजा कुतबुद्धीन, शेख नुरूद्धीन, महात्मा गेसुदराज, बहाउद्धीन झकारिया इ. सूफी संतांची परंपरा निर्माण झाली.

**४) सूफी केंद्रे :** सूफींनी संपूर्ण भारतभर सूफी तत्त्वज्ञान प्रसारासाठी प्रचार केंद्रे स्थापन केली. तेथून मानवतावाद, वैराग्य, तपश्चर्या यांची जोपासणा करीत गाढ व गूढ भक्तीचा महिमा सांगण्याचे कार्य केले. दिल्ली, बंगाल, पंजाब, अजमेर, पैठण, फत्तेहपूर सिक्री, गुलबर्गा, विजापूर, बिदर, पुणे, लातूर यासारख्या ठिकाणी ही केंद्रे स्थापन झाली. आजही मोठ्या भक्तिभावाने भाविक या ठिकाणांना भेटी देतात.

**५) सांस्कृतिक प्रभाव :** सांस्कृतिक क्षेत्रातही सूफी संप्रदायाने बहुमोल असे योगदान दिले आहे. संगीत, नृत्य, वाद्य, कव्वाली, शायरी, गझल यांचा वारसा मिळाला. सूफीचे धार्मिक गीत आणि संगीत यांचा अतूट हिस्सा आहे. भक्त स्वत:ला विसरून भक्तिभावात बुडून जातो. संपूर्ण भारतीयांना सूपरिचित असलेने 'दमा दम मस्त कलंदर' हे गीत महानायक सुऱ्हावर्दी संप्रदायाचे हजरत सखी लाल शहाबाज कलंदर हे होते. अमिर खुश्रोनी तर संगीताला फार मोठे योगदान दिले आहे. काव्याबरोबरच त्यांनी सतारीचाही शोध लावला.

**६) नैतिक प्रभाव :** सूफी संप्रदायाचे तत्त्वज्ञानच ही नैतिक अवस्था आहे. जगाची अपूर्णता लक्षात घेऊन जे परमात्म्याचे चिंतन करतात ते आपली मानसिक शक्ती नियंत्रणात ठेवतात. जे हातात आहे ते देऊन टाकणे, जे काही डोक्यात आहे ते काढून टाकणे आणि परमात्म्याला कळेल अशा पद्धतीने कार्य करणे ही सूफी संप्रदायाच्या नैतिक आणि मानसिक अवस्थेची लक्षणे आहेत.

**७) विविध उपसंप्रदायाची निर्मिती :** सूफी संप्रदायाची भारतात विविध उपसंप्रदायात रूपांतरे झाली. भारतात कादिरी, चिश्ती, सुऱ्हावर्दी, शतारी इ. सारखे उपसंप्रदाय निर्माण होऊन संपूर्ण भारतभर त्यांचा प्रभाव निर्माण झाला. भारतातील धार्मिक जीवनावर सूफी संप्रदायाचे विलक्षण परिणाम होऊन संत कबीर, गुरूनानक, अर्जुनदेव यांच्यावर त्याचा प्रभाव पडला.

**८) लेखन साहित्याची निर्मिती :** सूफी संप्रदायाचा प्रसार करण्यासाठी संतांनी विपुल साहित्याची निर्मिती केली. सूफी तत्त्वज्ञान काव्य, गझला, शायरी, कव्वाली यांच्या माध्यमातून देण्यासाठी प्रचंड लेखन केले. फारशी, हिंदी, बंगाली, अरबी, पंजाबी अशा स्थानिक भाषेतून लिखाणास सुरुवात केली. सय्यद गेसुदराज हे दक्षिणेतील हिंदीचे पहिले लेखक होते. अमीर खुश्रो तर स्वत:ला भारतीय म्हणून घेण्यात भाग्यवान समजत होता. भारतीय इतिहास व संस्कृती याबद्दल त्याला अभिमान होता. हिंदी भाषेत त्याने काव्यनिर्मिती केली. संत कबीरसारख्या थोर व्यक्तींनी त्यांचा उपयोग करून घेतल्याचे दिसून येते.

**सूफी संत काव्यरचना :**

१) असाईत - इ. स. १३७० मध्ये राजस्थानी भाषेत हंसावली प्रेमाख्यान रचना असाईत यांनी केली.

२) मुल्ला दाऊद - इ. स. १३७९ मध्ये चंदायन नावाचे प्रेमाख्यान मुल्ला दाऊद यांनी लिहिले.

३) दामोदर कवी यांनी लखमसेन पद्मावली कथा इ. स. १४५९ राजस्थानी हिंदी भाषेत लिहिले.

४) कल्लोल कवि यांनी इ. स. १४४३ मध्ये 'ढोला मारू रा दुहा' हे लिहिले.

५) ईश्वरदास यांनी इ. स. १५०१ मध्ये सत्यवती कथा लिहिली.

६) कुतूबन यांनी इ. स. १५०३ मध्ये मृगावती हे काव्य लिहिले.

७) गणपती यांनी इ. स. १५२७ मध्ये मधावानल कामकंदलाचे लिखान केले.

८) मलिक महम्मद जायली यांनी एकूण ४२ ग्रंथांची निर्मिती केली.

९) अमीर खुश्रो यांनी इ. स. १२५३ ते इ. स. १३२५ या काळात फारशी व हिंदी भाषेत काव्यरचना केल्या.

१०) नारायणदास यांनी इ. स. १५९० मध्ये इतिहास व कल्पनेवर आधारित साहित्यनिर्मिती केली.

११) उसमान यांनी इ. स. १६१३ मध्ये चितावलीचे लेखन केले.

१२) जान कवि यांनी सर्वाधिक प्रेमाख्याने इ. स. १६१२ ते इ. स. १६६४ या काळात लिहिली.

थोडक्यात प्रचंड साहित्य निर्मितीचे योगदान सूफींनी केले.

अशा प्रकारे परधर्मसहिष्णुता, सामाजिक समन्वय, ऐक्य, शांतता निर्माण करण्याचे कार्य सूफींनी केले.

सेतुमाधवराव पगडी सूफींच्या योगदानाबद्दल 'सूफी संप्रदाय - तत्त्वज्ञान व कार्य' या ग्रंथात म्हणतात की, ''सूफी संतांनी तत्कालिन मुस्लीम राज्यकर्त्याशी घनिष्ठ संबंध राखले. राजकारणात सक्रीय भाग घेतला. मुस्लीम राज्यकर्त्यांच्या दरबारातून पसरलेल्या धर्मबाह्य आचारांचा विरोध केला आणि प्रसंगी राज्यकर्त्यांचा विरोधही पत्करला. स्वत: ग्रंथ लिहिले आणि 'उत्तम शिष्य' तयार केले. अशा रीतीने हिंदुस्थानातील इस्लामी वर्चस्वाला स्थैर्य प्राप्त करून दिले. माईमुद्धीनच्या प्रयत्नाने अजमेर प्रांतात फिरोदउद्धीनच्या प्रयत्नाने पश्चिम पंजाबात बू अली कलंदरच्या प्रयत्नाने पूर्व पंजाबात, सिराजउद्धीनच्या प्रयत्नाने बंगालमध्ये मुतजबुद्धीन आणि बुऱ्हाणोद्धीनच्या प्रयत्नाने दक्षिणेमध्ये हजारो हिंदूंना इस्लामी धर्माची दीक्षा देण्यात आली.''

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - ३ :**

### (अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) कोणते सूफी दक्षिणेतील हिंदीचे पहिले लेखक म्हणून ओळखले जातात?

२) भारतात सूफी केंद्रे कोणकोणती आहेत?

३) कोणत्याही दोन सूफी संप्रदायाची नावे सांगा.

४) कोणता सूफी संत स्वत:ला भाग्यवान भारतीय म्हणवून घेण्यात धन्यता मानत असे?

५) 'हंसावली'चे लेखक कोण?

### (ब) योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.

१) ............ यांच्या भारतावरील आक्रमणाबरोबर सूफीचे भारतात आगमन झाले.

अ) इराणी ब) ग्रीक क) अफगाणी ड) अरब

२) 'सूफी संप्रदाय - तत्त्वज्ञान व कार्य' हा ग्रंथ ............ यांनी लिहिला.

अ) म. गो. रानडे ब) डॉ. बाळकृष्ण क) सेतुमाधवराव पगडी ड) ग. ह. खरे

३) शेख सलीम चिश्ती यांचा दर्गा ............ येथे आहे.

अ) दिल्ली ब) विजापूर क) फत्तेहपूर सिक्री ड) गुलबर्गा

४) सूफी संगीतात खालीलपैकी ............ यांचा समोवश नव्हता.

अ) गझल ब) लावणी क) शायरी ड) कव्वाली

५) ........... या बादशहाचा सूफीकडे पाहण्याचा अनुदार दृष्टिकोन होता.

अ) बाबर ब) अकबर क) जहांगीर ड) औरंगजेब

## २.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :

**१) अल्ला =** ईश्वर

**२) उलेमा =** मुस्लीम धर्मगुरू

**३) पीर =** गुरू

**४) मुरीद =** शिष्य

**५) दर्गा =** सूफी संतांचे समाधीस्थळ

**६) उरूस =** यात्रा

**७) खानकाह =** गुरूकुल, मठ

**८) नमाज =** अल्लाची प्रार्थना

## २.४ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - १ :**

**(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) सूफीचे मूळ तत्त्वज्ञान महम्मद पैगंबर या धर्मसंस्थापकाच्या विचारसरणीतून निर्माण झाले.

२) सूफी संप्रदाय मुस्लीम धर्मातून उदयास आला.

३) सूफीझमचा मुख्य आधार कुराण हा धर्मगुरू आहे.

४) सूफीमध्ये गुरूला शेख, पीर, मुरशिद म्हणतात.

५) ख्वाजा मोईनुद्दीन चिश्ती यांचा सुप्रसिद्ध दर्गा अजमेर येथे आहे.

**(ब) योग्य पर्याय निवडून विधान पुन्हा लिहा.**

उत्तरे : १) (ड) निजामिया २) (ब) महम्मद पैगंबर ३) (अ) दर्गा

४) (ब) अरब ५) (अ) अल्ला

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - २ :**

**(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) मोईनुद्धीन चिश्ती हे महम्मद घोरीच्या सैन्याबरोबर भारतात आले.

२) चिश्ती संप्रदायात मक्का यात्रेला जास्त महत्त्व आहे.

३) दारा शुकोह व जहानआरा हे महम्मद मीर यांचे शिष्य होते.

४) शेख निजामुद्धीन अवलिया हे अमीर खुश्रोचे शिष्य होते.

५) महमम्द गौस यांनी कादिरीया संप्रदाय भारतात आणला.

**(ब) योग्य पर्याय निवडून विधान पुन्हा लिहा.**

उत्तरे : १) (ब) अल्तमश　　२) (अ) बहाउद्धीन　　३) (अ) अमीर खुश्रो

४) (अ) दिल्ली　　५) (क) गझनी

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - ३ :**

**(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) सय्यद गेसुदराज हे दक्षिणेतील हिंदीचे पहिले लेखक होत.

२) भारतातील दिल्ली, पंजाब, पैठण, बंगाल, अजमेर, फत्तेहपूर, सिक्री इ. ठिकाणी सूफी केंद्रे आहेत.

३) चिश्ती, सुऱ्हावर्दी हे सूफी संप्रदाय आहेत.

४) अमीर खुश्रो हा सूफी संत स्वत:ला भाग्यवान भारतीय म्हणवून घेण्यात धन्यता मानत असे.

५) असाईत हे हंसावलीचे लेखक आहेत.

**(ब) योग्य पर्याय निवडून विधान पुन्हा लिहा.**

उत्तरे : १) (ड) अरब　　२) (क) सेतुमाधवराव पगडी　　३) (क) फत्तेहपूर सिक्री

४) (ब) लावणी　　५) (ड) औरंगजेब

## २.५ सारांश :

मध्ययुगीन भारतात सूफी चळवळीला फार महत्त्व असल्याचे दिसते. सूफी संतांनी आपल्या तत्त्वज्ञानातून अहिंसा, ईश्वर प्रेम, सामाजिक समानता, शांतता, गुढ ज्ञान इ. विषयीचा संदेश दिला. सूफी संप्रदायात अनेक उपसंप्रदाय उदयास येऊन त्यांनी परधर्मसहिष्णुता वाढविण्याचे कार्य केले. त्यामुळे हिंदू-मुस्लीम धर्म संघर्ष कमी होऊन संस्कृती समन्वय घडून आला.

## २.६ सरावासाठी स्वाध्याय :

**(अ) दीर्घोत्तरी प्रश्न.**

१) सूफीची व्याख्या सांगून सूफीचे तत्त्वज्ञान सांगा.

२) सूफी संप्रदायाचे स्वरूप व रचना स्पष्ट करा.

३) भारतातील सूफी संप्रदायातील विविध उपसंप्रदायाविषयी माहिती द्या.

४) भारतातील सूफी संतांचे कार्य सांगा.

५) भारतातील सूफी तत्त्वज्ञानाचे योगदान स्पष्ट करा.

**(ब) टीपा लिहा.**

१) सूफीचा अर्थ

२) सूफी संप्रदायाचा उदय

३) सूफी तत्त्वज्ञान
४) चिश्ती संप्रदाय
५) अमिर खुश्रो

## २.७ अधिक वाचनासाठी पुस्तके :


| | | |
|---|---|---|
| १) इरफान हबीब | : | मध्यकालीन भारत, ९, राजकमल प्रकाशन, नवी दिल्ली, प्रथमावृत्ती २०१४. |
| २) अलीम वकील | : | सूफी संप्रदायाचे अंतरंग, प्रतिमा प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती मार्च २००० |
| ३) डॉ. जोशी | : | विश्वकोश |
| ४) सेतुमाधवराव पगडी | : | सूफी संप्रदाय - तत्त्वज्ञान व कार्य, (मराठी) परचुरे प्रकाशन, मुंबई, प्रकाशन १९९३ द्वितीय आवृत्ती |
| ५) डॉ. कृ. अ. आचार्य, डॉ. आ. कृ. आपटे | : | मध्ययुगीन भारत १९६९ |
| ६) प्रा. पी. के. कुलकर्णी | : | भारतातील धर्म, विद्याभारती प्रकाशन, ६ मे १९९८ |
| ७) डॉ. पी. एन. शिंदे, प्रा. विश्वनाथ पवार | : | मुघलकालीन भारतचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर. प्रथमावृत्ती ऑक्टोबर २००५. |


❑❑❑

## घटक ३

# वारकरी संप्रदाय


३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

- ३.२.१ वारकरी संप्रदाय
- ३.२.२ वारकरी शब्दाचा अर्थ
- ३.२.३ वारकरी संप्रदायाचा उगम
- ३.२.४ पंढरपूर व श्री विठ्ठल
- ३.२.५ वारकरी संप्रदायाचा आचार
- ३.२.६ संत ज्ञानेश्वर व संत नामदेव
- ३.२.७ संत एकनाथ व संत तुकाराम
- ३.२.८ वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान व वारसा

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

३.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ संदर्भ ग्रंथ

## ३.० उद्दिष्ट्ये :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला,

- वारकरी संप्रदायाचा उगम व इतिहास समजेल.
- वारकरी संप्रदायाची सुरुवातीची पार्श्वभूमी समजेल.
- पंढरपूर व श्री विठ्ठल याविषयी माहिती मिळेल.
- वारकरी संप्रदायाचा आचार व तत्त्वज्ञान समजेल.
- संत ज्ञानेश्वर व संत नामदेव कालीन समाज व्यवस्थेची माहिती मिळेल.
- संत ज्ञानेश्वर व संत नामदेव यांचे कार्य व साहित्य याविषयी माहिती मिळेल.
- संत एकनाथ व संत तुकाराम कालीन समाज जीवन समजू शकेल.
- संत एकनाथ व संत तुकाराम यांचे कार्य व त्यांचे साहित्य यांची माहिती मिळेल.
- वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान व वारसा समजू शकेल.

## ३.१ प्रास्ताविक :

महाराष्ट्र ही संताची भूमी आहे. ज्ञानेश्वरांपासून संत तुकारामापर्यंत संतांची समृद्ध परंपरा महाराष्ट्राला लाभली आहे. या परंपरेने मराठी वाङ्मयालाही समृद्ध केले आहे. 'ज्ञानदेवे रचिला पाया... तुका झालेसे कळस' अशा शब्दात संत बहिणाबाईंनी ही परंपरा मांडली आहे. भारतभूमीही निर्मळ भावनेची आणि श्रद्धेची आहे. निर्मळ भाव आणि अभंग निष्ठा यांच्या समन्वयातून भारताच्या भूमीत अनेक सात्त्विक प्रवाह निर्माण झाले. या सात्त्विक प्रवाहांनी भक्तिपंथानी भारताचे सांस्कृतिक जीवन समृद्ध केले आहे. नाथ, दत्त, शैव, वैष्णव, वारकरी, रामदासी, वीरशैव इत्यादी अनेक संप्रदायांनी भक्तीची, सदाचाराची, सहिष्णूतेची एक प्रचंड लाट या भूमीत निर्माण केली. भारताच्या सांस्कृतिक परंपरेत ज्यांचे महान योगदान झाले आहे त्यात महाराष्ट्रातील पंथांची कामगिरी पारमार्थिकदृष्ट्या फारच विलक्षण आणि ऐतिहासिकदृष्ट्या श्रेष्ठ आहे. महाराष्ट्रातील सर्व संप्रदायामध्ये वारकरी संप्रदाय हा संख्येने नि:संशय मोठा आणि अधिक लोकप्रिय असा संप्रदाय आहे.

वारकरी संप्रदायाचे भाग्य असे की, ज्ञानेश्वरांसारख्या विभूतिमत्त्वाने याच भागवत धर्माला शिरोधार्थ केले. नामदेव महाराजांनी वारकरी संप्रदायाची ध्वजा गंगा सिंधूच्या खोऱ्यात नाचविली. एकनाथ महाराजांसारख्या क्रांतदर्श या संप्रदायाला लाभला. समाजातील जातीभेद नाहिसे व्हावेत म्हणून नाथांनी जी क्रांती केली त्याला तोड नाही. आपल्या अभ्यासाने व चिकाटीने, श्रद्धेने नराचा नारायण होता येते, हे तुकाराम महाराजांनी देहूसारख्या लहान गावात राहूनही सिद्ध केले. मराठा कालखंडात शेवटी जातीव्यवस्था खूपच कडक झाली व जातीवरील बंधने वाढली. परिणामी, समाजात एकजिनसीपणा राहिला नाही व समाज विविध गटात दुभंगला गेला. यादव कालखंडात महाराष्ट्रावर मुस्लिमांचे आक्रमण झाले व मुस्लीम धर्मांतराची लाट निर्माण झाली. त्यामुळे हिंदू धर्म आणि संस्कृती संकलन सापडल्याची भावना निर्माण झाली. तत्कालिन सत्ताधिशांनी हिंदू धर्माच्या रक्षणासाठी जातीसंस्थेला पाठिंबा देण्यास

सुरुवात केली. त्याचवेळी समाजातील जातीभेद कमी करणे, आपल्या धर्मातील दोष काढून टाकणे व मुस्लीम धर्माच्या आक्रमणाला विरोध करणे यासाठी समाजातील अध्यात्मिक व धार्मिक वृत्तीच्या संत मंडळींनी मोठे कार्य केले. मराठा कालखंडातील सामाजिक परिस्थितीची माहिती घेतल्यानंतर एक गोष्ट स्पष्टपणे जाणवते व ती म्हणजे या काळातील समाजावर धर्माचा मोठा प्रभाव होता. धर्मग्रंथातील शब्द म्हणजे जणू काही ईश्वराचा शब्द आहे, अशी लोकांची श्रद्धा होती. त्यामुळे धर्मग्रंथात सांगितलेल्या सर्व गोष्टी आचरणात आणल्या जात होत्या. समाजात स्त्रियांची स्थिती अतिशय वाईट होती. स्त्रियांवर अनेक निर्बंध लादून जीवन जगणे कठीण केले होते. बालविवाह, विधवाविवाह, केशवपन, सती पद्धती, बहुपत्नीत्त्व इत्यादी समाजातील रूढी, परंपरा या स्त्रियांचा दर्जा किती खालावला होता हे दर्शवित होता. स्त्रियांना सार्वजनिक जीवनामध्ये मुक्तपणे वावरण्यास वाव नव्हता. अशा स्थितीत समाजाला अधोगतीपासून वाचवण्याचे, समाजात सामाजिक समता स्थापण्याने भेदाभेद नष्ट करून एकजिनसी समाज निर्माण करण्याचे काम वारकरी संप्रदायातील थोर संत मंडळींनी केले. त्यामुळे या संतांची कामगिरी पाहणे महत्त्वाचे ठरते.

## ३.२ विषय-विवेचन :

### ३.२.१ वारकरी संप्रदाय :

वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्रातील अत्यंत महत्त्वाचा भक्तिसंप्रदाय होय. महाराष्ट्राच्या समाजजीवनावर, धार्मिक जीवनावर व संस्कृतीवर या संप्रदायाचा फार मोठा प्रभाव आहे. महाराष्ट्रातील सर्व स्तरातील व सर्व विभागातील लोकांच्या मनावर वर्चस्व प्रस्थापित करणारा हा संप्रदाय आहे. महाराष्ट्राच्या बाहेरील प्रदेशातसुद्धा याचा प्रसार झाला आहे. सर्व जातींची, धर्माची, भेदभावाची व वंशवादाच्या परंपरेने चालत आलेल्या भिंती तोडून अखिल मानव जातीविषयीचा कळवळा व करूणा या विषयाची आस्था या संप्रदायाच्या विचारधारेत आहे. हा संप्रदाय, वारकरी, माळकरी, भागवत अशा नावांनीही ओळखला जातो. वारकरी पंथ हा महाराष्ट्रातील फार महत्त्वाचा भक्तिसंप्रदाय आहे. महाराष्ट्राच्या सुशिक्षित, अशिक्षित, ब्राह्मण व हरिजन स्त्री, पुरुष, बाल व वृद्ध, खेडेगावातील व शहरातील लोक इत्यादींचा पंथ आहे.

वारकरी संप्रदायाला फार उत्तुंग कर्तृत्वाचे संत परंपरेने लाभले. परिणामी, वारकरी संप्रदायाची लोकप्रियता शिगेस पोहोचली. या संप्रदायाने मात्र गृहस्थाश्रमी माणसाला आत्मोद्धाराचा अत्यंत सुलभ मार्ग दाखविला. देहदंड न देता कोणतीही कठोर उपासना न करता परमेश्वराला आत्मसात करण्याचा मध्यम मार्ग वारकरी संप्रदायाने दाखविला. वारकरी संप्रदायाची प्रकृती समन्वयात्मक असल्यामुळे वारकरी संप्रदाय रुजला, वाढला आणि लोकप्रियतेच्या कळसास जाऊन पोहचला. हा संप्रदाय महाराष्ट्रातील असला तरी त्याचे स्वरूप विश्वात्मक स्वरूपाचे आहे.

### ३.२.२ वारकरी शब्दाचा अर्थ :

पंढरपूरची वारी करणारा तो वारकरी. प्रतिवर्षी अथवा प्रत्येक महिन्यात नियमितपणे पांडुरंगाच्या भेटीसाठी पंढरपुरास जाणारा, पंढरपूरचा फेरा पूर्ण करणारा तो 'वारकरी' होय. पंढरपूरची वारी म्हणजे पंढरपूरला विठ्ठलाच्या दर्शनास जाणारा लोकांचा समुदाय किंवा संघ होय. आषाढी, कार्तिकी, चैत्री व माघी महिन्यातील शुद्ध एकादशी या पंढरपूरच्या मुख्य वाऱ्या होय. प्रतिवर्षी नियमाने पंढरपुरला जे जातात त्यांना 'वारकरी' म्हणतात. या वारकऱ्यांचा

जो पंथ किंवा संप्रदाय तो 'वारकरी संप्रदाय' होय. या संप्रदायास 'माळकरी' सुद्धा म्हणतात. विठ्ठलाला प्रिय असणारी तुळशीची माळ हे वारकरी गळ्यात धारण करतात म्हणून 'माळकरी' या माळकऱ्यावरून 'माळकरी संप्रदाय'. आपल्या देहावर तुळशीपत्र ठेवून आपले सर्वस्व विठ्ठलाला अर्पण करणारा भक्त म्हणजे 'भागवत'. या भागवतांनी (भक्तांनी) स्वीकारलेला संप्रदाय म्हणजे 'भागवत संप्रदाय' होय. वारकरी हा शब्द म्हणजे 'वारी करी' याचा अपभ्रंश आहे असे दिसते. ज्ञानेश्वरांनी स्वत:ला व अन्य भक्तांनाही 'वारीकर' म्हटले आहे. काया, वाचा, मने, जीवे सर्वस्वे उदार, बापरखुमादेवीवरू, विठ्ठलाचा वारीकर। अर्थात मूळ शब्द वारीकर असाच असावा. त्याचा वारकरी असा अपभ्रंश झालेला दिसतो. वैशिष्ट्य असे की महाराष्ट्रातील अन्य तीर्थक्षेत्रांची नित्यनियमाने वारी करणारे लोक महाराष्ट्रात आहेत. परंतु त्यांना वारकरी म्हणत नाहीत. पंढरीला ज्या व्यापक प्रमाणात भक्त येतात त्या संख्येने अन्य तीर्थक्षेत्री जात नाहीत, त्यामुळे पंढरीच्या क्षेत्री समुदायाने येणारा तो वारकरी असे म्हटले जात असावे.

### ३.२.३ वारकरी संप्रदायाचा उगम :

पद्मपुराण, स्कंदपुराण श्रीकरभाष्य आदि शंकराचार्यांची स्रोत्रे इत्यादी ग्रंथामधून पंढरीच्या पांढुरंगाचा उल्लेख मिळतो. पद्मपुराणामध्ये पुंडलिकाने विठ्ठलाला पुंडलिकपुरात म्हणजे पंढरीत राहण्याची प्रार्थना केलेली आढळते. स्कंदपुराणाताही भगवंताच्या आणि पुंडलिकांच्या भेटीची कथा आली आहे. पंढरपुरला लाभलेला एक जुना ताम्रपट इ. स. ५१६ चा आहे. त्यावरून सहाव्या शतकाच्या प्रारंभी पंढरी आणि पंढरीश या दोघांची ख्याती दक्षिण भारतात तरी दुमदुमलेली होती, असे लक्षात येते. कृष्ण हे विष्णूचे रूप आणि विठ्ठल म्हणजे बाळकृष्ण अशी संतांची श्रद्धा असल्याने विठ्ठलाचा आणि वारकरी संप्रदायाचा उगम इतिहासात पुष्कळ मागे नेता येतो. ज्ञानेश्वरांच्या काळात वारकरी संप्रदाय अत्यंत लोकप्रिय होतो, हे अनेक वाङ्मयीन उल्लेखावरून सहज ध्यानात येते. तुळशीची माळ गळ्यात धारण करणे, मुद्रा लावणे, भगवी पताका धारण करणे इत्यादी वारकऱ्यांची बाह्य चिन्हे सांगितली जातात. बाराव्या शतकापासून सतराव्या शतकापर्यंत महाराष्ट्रात निर्माण झालेल्या भक्तीसंप्रदायाची पाच वैशिष्ट्ये दिसून येतात. बुद्धिवादी, लोकहितवादी, समन्वयवादी, व्यक्तीवादी व क्रियावादी इत्यादी. त्यांचे प्रतिनिधित्व ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम व रामदास या संतांनी केले आहे.

वारकरी संप्रदायाचा प्रारंभ भक्त पुंडलिकापासून झाल्याचे मानले जाते. पुंडलिक पंढरपूर येथे आपल्या आई वडीलांची सेवा करत असताना त्या ठिकाणी भगवान श्रीकृष्ण आपली पत्नी रुक्मिणीचा शोध घेत दिंडीरवनात आले असता आई-वडिलांच्या सेवेत मग्न असलेल्या पुंडलिकास पाहिले. त्याच्या त्या सेवेने ते प्रसन्न झाले. ते पुंडलिकाजवळ येऊ लागले. पण सेवेत खंड पडेल म्हणून पुंडलिकाने एक वीट त्यास उभे राहण्यासाठी फेकली. त्या भक्तीसाठी भगवंत श्रीकृष्ण त्या वीटेवरी उभे राहिले. अशी कथा सांगितली जाते. वीटेवरी उभे राहिले म्हणून विठ्ठल, विठोबा. हा विठ्ठलाच वारकरी संप्रदायाचे आराध्य दैवत आहे. पंढरपूरचे हे दैवत म्हणून त्यास 'पांडुरंग' या नावाने ओळखले जाते.

### ३.२.४ पंढरपूर व श्री विठ्ठल :

वारकऱ्यांचे आराध्य दैवत ज्या क्षेत्रात उभे आहे ते पंढरपूर म्हणजे वारकऱ्यांच्या दृष्टीने साक्षात भूवैकुंठच आहे. भीमा नदीच्या तीरावर वसलेले पंढरपूर सर्व वारकऱ्यांचे श्रद्धास्थान आहे. पंढरीत असलेली भीमा नदी चंद्रकोर

असल्याने त्या नदीला चंद्रभागा असे म्हणतात. हेच नाव महाराष्ट्रात इतके लोकप्रिय आहे की त्या नदीचे मूळ नाव भीमा हेच अनेकजण विसरून गेले आहेत. 'भिमा आणि चंद्रभागा। तुझे चरणीच्या गंगा।' असे जनाबाईंनी म्हटले आहे. चंद्रभागेचे वा भीमेचे स्नान वारकऱ्यांना मोक्षाइतके आनंददायी आहे. 'चंद्रभागे करिता स्नान। तुझे दोष पळती रानोरान।' असे नामदेव महाराजांनी म्हटले आहे. पंढरपूरालाच पूर्वी पुंडलिकपूर, लोहदंड क्षेत्र, पंढरी, पांडरंगपल्ली इत्यादी नावाने ओळखले जात होते. पुंडलिकाच्या नावावरून पुंडलिकपूर आणि पांडुरंगाच्या नावावरून पांडरंगपल्ली ही नावे सार्थ ठरतात. तथापि, उत्तरकाळात नावांचे अपभ्रंश होत शेवटी पंढरपूर किंवा पंढरी हे नाव संप्रदायात जनमानसात स्थिरावले. पंढरीचा इतिहास पंधरा शतकांचा तरी असावा. भीमेच्या काठावर असलेल्या एका छोट्या उंचवट्यावर पांडुरंगाचे मंदिर उभारले गेले आणि त्यानंतर त्याचा हळूहळू विस्तार होत गेला. महाराष्ट्र व दक्षिण भारत दोन्हीकडे पंढरीची ख्याती आहे. जावळीच्या सुभा विजयनगरच्या साम्राज्यात असल्याचे इतिहास आपल्याला सांगतो. मंदिराची वाढ क्रमाने होत गेली. मंदिराला पुढे राजाश्रय सुद्धा लाभला.

पंधराव्या शतकात विजयनगरला पंढरीची मूर्ती नेली होती ती संत भानुदास महाराजांनी पंढरीत पुन्हा परत आणली. पुरंदरदास, कनकदास इत्यादी दाक्षिणात्य संतांना पंढरीविषयी आत्मियता होती. अफजलखानाच्या स्वारीवेळी पुजाऱ्यांनी विठ्ठलाची मूर्ती मंदिरातून हालविली. १७ व्या शतकात औरंगजेब दक्षिणेत आल्यावरही पंढरपूर सुरक्षित नव्हते. नंतर मात्र मराठा साम्राज्य विस्तारल्यावर पंढरपूर अधिक विकसित झाले. मराठा सरदार, तासगाव, सांगलीचे पटवर्धन, स्वत: छ. शाहू महाराज यांना पंढरीविषयी प्रेम आणि आस्था होती. त्यामुळे उत्तर कालखंडात पंढरीचा विकासही झाला. वारकरी संप्रदायही स्थिरावला, विस्तारला. पुंडलिकाच्या भावार्थासाठी भगवान श्रीकृष्ण प्रत्यक्ष गोकूळातून पुंढरीला आले होते असे ज्ञानेश्वरांनी म्हटले होते. अर्थात, पंढरीश म्हणजे बाळकृष्णाचेच रूप होय अशी सर्व संतांची निरंतर श्रद्धा आहे. या दैवताला विठ्ठल आणि पांडुरंग या दोन्ही नावाने सर्व वारकरी अत्यंत प्रेमाने आणि जिव्हाळ्याने संबोधतात. श्री विठ्ठलाच्या कमरेवर ठेवलेल्या दोन्ही हातात शंख आणि चक्र अशी युद्ध चिन्हे आहेत. त्याच्या मस्तकावर असलेली टोपी म्हणजे ही द्विभूज आहे. विठ्ठल म्हणजे साक्षात अद्वैताच प्रतिक होय. शिवाय विठ्ठल नावात विद् म्हणजे जाणणे, एकात्म ज्ञानाची अनुभूती होणे असाही एक अर्थ आहे. त्यामुळे श्री विठ्ठल नामाला अत्यंत व्यापक अर्थ प्राप्त होतो.

### ३.२.५ वारकरी संप्रदायाचा आचार :

वारकरी संप्रदायाचा मूलमंत्र 'रामकृष्णहरी' असा आहे. राम आणि कृष्ण या दोन अवतारांमध्ये भारतीय संस्कृतीचे अवघे सार सामावले आहे. पांडुरंगानेच सर्व अवतार धारण केले अशी वारकरी संतांची श्रद्धा आहे. त्याचे विविध उल्लेख आहेत. 'विठ्ठल' असा तीन अक्षरांचा मंत्रही अनेक संतांनी आपल्या भक्तांना दिला होता असे ऐतिहासिक पुरावे मिळतात. 'ज्ञानेश्वर माऊली तुकाराम' असाही गजर वारकरी नेहमी सानंद करतात. 'जय जय पांडुरंग हरि' किंवा 'जय विठोबा रखुमाई' असाही गजर संकीर्तनामध्ये नेहमी चालतो. परंतु मूलमंत्र म्हणून अर्थातच 'रामकृष्ण हरी' हाच वारकऱ्यांना शिरोधार्थ आहे. वारकऱ्यांची मुख्य खूण म्हणजे त्याच्या गळ्यात असलेली तुळशीची माळ. स्वत: विठ्ठलाला ही माळ अत्यंत प्रिय असल्यामुळेच एकनिष्ठ व एकविध भावाचे प्रतिक म्हणून वारकरी ही माळ धारण करतो. वारकरी कपाळाला नेहमी गोपीचंदनाची मुद्रा, टीळा व बुक्का लावतो. वारीमध्ये

त्याच्या खांद्यावर भगवी ध्वजा असते. तुळशीची माळ त्याला निष्ठा, सदाचाराची आठवण करून देते. दारामध्ये तुळशीवृंदावन असणे, गळ्यात तुळशीची माळ धारण करणे, गोपीचंदनाची उटी लावणे ही वारकऱ्याची प्रमुख लक्षणे संतांनी सांगितली आहेत. पंढरपूर व आळंदी या दोन्ही क्षेत्रस्थानाची वारी ही वारकऱ्यांच्या आचाराची अविभाज्य अंगे आहेत. पंढरी म्हणजे सर्व तीर्थांचे माहेर होय. प्रत्येक वारकऱ्याने माळ धारण करताना सदाचाराची शपथ घ्यावयाची असते आणि दैनंदिन व्यवहार तसा करावयाचा असतो. परस्त्रीला रुक्मिणी मातेसमान मानणे, नेहमी सत्य बोलणे, एकादशीचे व्रत करून पंढरी व आळंदीच्या वारीला नित्य जाणे, ज्ञानेश्वरीच्या ओव्यांचे नियमित वाचन, शाकाहारी असणे इत्यादी सदाचारयुक्त मार्ग वारकऱ्यांना शिरोधार्थ आहे. वारकरी संप्रदायात खरा गोडवा भजन, प्रवचन आणि विशेष करून निरुपणातून म्हणजेच संप्रदायिक कीर्तनातून प्रगट होतो. आपल्या कर्मातूनच परमेश्वराची पूजा बांधायची असे सर्व संतांनी मानवाला शिकविले आहे. वारकरी संप्रदाय हा खऱ्या अर्थाने सात्त्विक पंथ आहे.

### ३.२.६ संत ज्ञानेश्वर व संत नामदेव :

**संत ज्ञानेश्वर :**

ज्ञानेश्वर व नामदेवांचा कालखंड म्हणजे १३ व्या शतकाच्या शेवटच्या व चौदाव्या शतकाच्या प्रारंभीचा कालखंड होय. संत ज्ञानेश्वरांनी खऱ्या अर्थाने 'वारकरी संप्रदायाचा' पाया घातला. ज्ञानदेव, नामदेव काळ म्हणजे वारकरी संप्रदायाच्या इतिहासातील वैभवशाली काळ होय. ज्ञानेश्वरांचे जेष्ठ बंधू आध्यात्मिक गुरू निवृत्तीनाथ हे नाथपंथी होते. त्यांनी ज्ञानेश्वरांना नाथपंथाचीच दीक्षा दिली. ज्ञानदेवांना नाथपरंपरेतून योगाचा वारसा मिळाला. पण हा योगाचा मार्ग त्यांनी भक्तिमार्गात परिणीत केला. नाथपंथाच्या मुळाशी नुसता योग नसून भक्तीचाही पाझर आहे, हे त्यांनी आपल्या कृती व उक्तीतून सिद्ध केले.

संत ज्ञानेश्वरांच्या काळात शास्त्रप्रामाण्य चातुवर्ण्यधीष्ठित जाती व्यवस्था, कर्मकांड, अंधश्रद्धा, रूढी-परंपरा यामुळे समाजातील शुद्रातिशूद्र कनिष्ठ वर्गावर धार्मिक मानसिक गुलामगिरी लादण्यात आली होती. त्यांना पारमार्थिक मुक्तीसाठी कोणताही मार्ग नव्हता. अशा काळात जनतेची सुटका करण्यासाठी पंढरपूर चळवळ पुढे आली. परमेश्वर व भक्त यांच्यात संत भेद मानत नव्हते. परमात्मा हा सर्व प्राणीमात्रांमध्ये आहे. म्हणून मनुष्यमात्रांसह सर्व प्राणीमात्रांची सेवा करणे म्हणजे त्यांच्यातील परमेश्वराची सेवा करणे ही खरी भक्ती होय. ही भावना संत ज्ञानेश्वरांप्रमाणे इतर संतांमध्येही होती.

वारकरी संप्रदायाला घरोघरी पोहचविण्याचे काम ज्ञानेश्वरांनी केले. आयुष्यभर ज्यांची समाजाने केवळ हेटाळणी केली. संन्यासाशी मुले म्हणून वाळीत टाकले त्याच समाजासाठी ज्ञानेश्वरांनी विश्वात्मक देवाजवळ पसायदान मागितले होते. म्हणून ज्ञानेश्वरांनी भागवत धर्माचा पाया रचिला असे म्हणतात. वारकरी संप्रदायाचा पाया रचण्याची ज्ञानदेवांची कामगिरी ही चतुर्विध स्वरूपाची आहे ती म्हणजे, १) सुसंगत व तर्कशुद्ध तत्त्वज्ञान, २) सूक्ष्म नीतिमीमांसा, ३) धार्मिक अनुभवांचे मूल्यमापन, ४) लोकजागृती करून केलेली प्रवाही व अकृत्रिम संघटना या स्वरूपाची होय. ज्ञानेश्वरांचा जन्म इ. स. १२७५ चा तर इ. स. १२९६ मध्ये त्यांनी समाधी घेतली. एवढ्या कमी आयुष्याच्या कालखंडात त्यांनी अलौकिक असे कार्य केले. ज्ञानेश्वरांचे वडील विठ्ठलपंत यांनी पंढरीची वारी-आषाढी व

कार्तिकी केल्याचा उल्लेख संत नामदेवांनी केला आहे. महाराष्ट्रातील एक थोर योगी, तत्त्वज्ञानी आणि संतकवी म्हणून ज्ञानेश्वरांचा उल्लेख होतो. त्यांचा जन्म आपेगाव येथे विठ्ठलपंत व रूक्मिणीबाई यांच्या पोटी झाला होता. गोविंदपंत मीराबाई हे त्यांचे आजोबा-आजी होत. थोरले बंधू निवृत्तीनाथ तसेच सोपान व मुक्ताई ही त्यांची भावंडे होत. ज्ञानेश्वरांचे वडील विठ्ठलपंत हे मुळात विरक्त संन्यासी होते. विवाहित असताना त्यांनी संन्यास घेतला व ते काशीला गेले. गुरूंना ते विवाहित असल्याचे समजल्यावर गुरूंनी त्यांना परत पाठवले. त्यांच्या आज्ञेनुसार पुन्हा गृहस्थाश्रमात प्रवेश केल्यानंतर विठ्ठलपंतांना चार अपत्ये झाली होती. तीर्थयात्रा करीत ते आळंदी मुक्कामी येऊन स्थायिक झाले. त्या काळी संन्यासाची मुले म्हणून सर्व समाज या चौघा भावंडांची हेटाळणी करीत असे. गावाने त्यांना व त्यांच्या कुटुंबाला वाळीत टाकले. परित्यक्त ब्राह्मण म्हणून त्यांना काळ कंठावा लागला. ज्ञानेश्वर व त्यांच्या भावंडांची मुंज करण्याचेही आळंदीच्या ब्राह्मणांनी नाकारले. विठ्ठलपंतांना धर्मशास्त्रींनी देहदंडाची शिक्षा सांगितल्याने विठ्ठलपंतांनी पत्नीसह आत्महत्या करून देहांत प्रायश्चित्त घेतले. आई-वडिलांच्या मृत्यूनंतर ज्ञानेश्वर व त्यांच्या भावंडांना लोकांकडून फार त्रास दिला गेला. पुढे ही मुले पैठणला गेली व ज्ञानेश्वरांनी आपली विद्वत्ता सिद्ध केली.

संत ज्ञानेश्वरांनी अत्यंत रसाळ भाषेत शब्दरचना केली. वारकरी संप्रदायाचा प्रसार केला. संत ज्ञानेश्वर व त्यांच्या भावंडांचा मराठी संस्कृतीवर असलेला प्रभाव आजही अबाधित आहे. निवृत्तीनाथ हे त्यांचे गुरू होते. गुरूंच्या कृपाशीर्वादाने गीतेवर त्यांनी प्रख्यात टीका लिहली. या ग्रंथास ज्ञानेश्वरी किंवा भावार्थदीपिका असे म्हणतात. ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून संस्कृत भाषेतील ज्ञान त्यांनी प्राकृत भाषेत आणले. 'माझा मराठाचि बोलू कौतुके। परि अमृतातेहि पैजासी जिंके।' असे म्हणत त्यांनी मराठी भाषेविषयीचा अभिमान मराठीची महती व्यक्त केली आहे. कर्मयोग, ज्ञानयोग व भक्तियोग सांगणाऱ्या ज्ञानेश्वरीत सुमारे ९००० ओव्या आहेत. हा ग्रंथ इ. स. १२९० मध्ये लिहिला गेल्याचे मानले जाते. हा ग्रंथ वारकरी संप्रदायाचा प्राण आहे, आत्मा आहे. सर्व वारकऱ्यांनी ज्ञानेश्वरीला आपली 'आई' मानलेली आहे. तिच्या आधारावर त्यांचे पारमार्थिक जीवन सर्वस्वी अवलंबून आहे. वारकऱ्यांच्या घरोघरी ज्ञानेश्वरीचे वाचन चालत आलेले आढळते आणि ज्ञानदेवांचा 'ज्ञानेश्वर माऊली' असा जघोषही आजही करण्याइतके आणि जन्मोजन्मी कृतज्ञ राहण्याइतके अमोल विचारधन आणि भावधन ज्ञानदेवांनी महाराष्ट्राला दिले. ज्ञानेश्वरी म्हणजे महाराष्ट्रीय शारदेच्या गळ्यातील 'देशीकार लेणेच' म्हटले पाहिजे. २१ वर्षाच्या आयुष्यात त्यांनी जे साहित्य विषयक आणि सांस्कृतिक कार्य केले ते अविस्मरणीय आहे.

१३ व्या शतकात महाराष्ट्रातील धार्मिक व सामाजिक जीवन अध:पतन होत चालले होते. वैदिक धर्माचा उज्ज्वल परंपरेस कर्मठता व पठिक पांडित्य यांनी काळीमा फासला होता. वेदाध्ययन करणारे वैदिक पंडित यज्ञयागाचे अवडंबर माजवीत होते. मनन, चिंतनांचा लोप झाला होता. वैचारिक शिकवण नष्ट होऊन धर्मश्रद्धा बिनबुडाची झाली होती. अशा व्यवस्थेचे चित्र तेराव्या अध्यायातील 'अज्ञानवर्णनात' रेखाटून ज्ञानदेवांनी त्यातील उथळपणा स्पष्ट केला आहे. थोडक्यात, धार्मिक क्षेत्रात अज्ञान, स्वार्थ आणि अंधश्रद्धा यांचे राज्य चालू होते. त्यामुळे लोकांच्या मनात उच्च विचारांची बैठकच निर्माण झाली नाही. अज्ञान, भीती, क्षणिक सुखे आणि स्वार्थापोटी जाखाई, मंगळाई, म्हसोबा, बहिरोबा यासारख्या क्षुद्र देवतांची भक्ती करण्यात लोक धन्यता मानू लागले होते. सारी माणसे जादुटोणा,

भूत, भविरच, जारण मारण, तंत्र यात रस घेत होती. अशा या समाजाला मार्ग दाखवून त्याचा उद्धार करण्याची जबाबदारी ज्या शास्त्रीपंडितावर होती, ते मात्र माणुसकीला पारखे झाले होते व आपल्या उदरनिर्वाहात मग्न होते. हे सर्व ज्ञानदेवांनी पाहिले होते. अशा स्थितीत या अज्ञानी लोकांना मार्गदर्शन करायचे असेल, वैदिक धर्माची ओहोटी थांबवायची असेल तर या भोळ्या भाबड्यांच्या धर्मभावनेला अध्यात्म विचारांची ठाम बैठक मिळवून देण्याशिवाय गत्यंतर नाही, अशी ज्ञानदेवांची खात्री पटली. दलितोद्धाराच्या प्रेरणेने त्यांनी धर्मजागृतीचे कार्य हाती घेतले व आपला विचार सर्व सामान्यांपर्यंत पोहचण्यासाठीच आबालसुबोध अशा मराठी भाषेत 'ज्ञानेश्वरीची' रचना केली होती. त्यांचे हे कार्य साहित्यिक दृष्ट्या फार मोलाचे आहे. म्हणून तेराव्या शतकातील महाराष्ट्रीय सांस्कृतिक जीवनाचे व साऱ्या मराठी साहित्यिकाचे ते आद्य प्रवर्तक ठरतात.

यादवकालीन समाजाला नवविचारांचे दान करणारे थोर तत्त्वज्ञ म्हणून ज्ञानदेव जितके ज्ञात आहेत तितकेच किंबहुना अधिक ते कवी म्हणून अमर आहेत. प्रवचने करीत आळंदीस परत येत असताना त्यांनी नेवाशास मुक्काम केला व तेथेच त्यांना ग्रंथनिर्मितीची प्रेरणा झाली. कीर्तन-प्रवचनांद्वारे जो नवविवचार ते समाजाला सांगत होते, त्याला त्यांच्या मनात यावेळी निश्चित स्वरूप प्राप्त झाले असावे त्यालाच त्यांनी ज्ञानेश्वरीच्याद्वारे ग्रंथ निर्विष्ट केले. वास्तविक नवीन विचार देणारे हे ग्रंथलेखन म्हणजे त्या काळाच्या संदर्भात मोठे धाडस होते. काव्य आणि तत्त्वज्ञान ही दोन टोके आपल्या असामान्य प्रतिभेमुळे त्यांनी एकत्र आणली. वास्तविक ज्ञानेश्वरी आणि अमृतानुभव हे काव्यग्रंथ असले तरी आशयाच्या दृष्टीने ते तत्त्वज्ञानाचेच ग्रंथ ठरतात. वैयक्तिक आणि सामाजिक नीतीचा आदर्श घालून देणारे बोधग्रंथ असेच त्यांचे वर्णन करावे लागेल. क्रांतदर्शी तत्त्वज्ञ, प्रतिभासंपन्न साहित्यिक व प्रभावी नीतीशिक्षक अशा तीनही भूमिका ज्ञानदेवांच्या ठायी एकवटल्या आहेत. ज्ञानदेवांच्या तत्त्वज्ञानातील मुख्य सिद्धांत अद्वैताचाच आहे. आत्माच सर्वत्र भरलेला आहे. ज्ञानदेवांचे सर्व विचार तत्कालीन परिस्थितीच्या दृष्टीने फार महत्त्वाचे व उपयुक्त होते आणि आजही आहेत. या विचारांच्या आधारेच लोकांच्या धर्म, नीतीसंबंधीच्या कल्पनांत त्यांनी बदल घडवून आणला. 'गृहस्थाश्रम न सांडिता। कर्मरेखा नोलांडिता। हा भक्तिमार्ग आचारिता येतो' असे त्यांनी ज्ञानेश्वरीच्याद्वारे समाजाला सांगितले आहे. त्यामुळे समाजापुढे काही आदर्श ठेवून ज्ञानदेवांना सामाजिक नीती शिकविता आली. भोवतालच्या समाजाची नीतिमत्ता कशी उंचावेल आणि लोकांचे सांसारिक जीवनही निकोप नि निरागस कसे होईल या कळवळीने ते बोलत होते. ज्ञानेश्वरांची भूमिका आध्यात्मिक असली तरी कार्य सामाजिक, नैतिक आहे, हे विसरता येत नाही. वैयक्तिक मोक्षाच्या हेतूने त्यांनी ग्रंथलेखन केले नाही. मराठीविषयीचा अभिमान हा तर त्यांच्या आवडीचा विषय. 'माझ्या मराठाचि बोलु कौतिके। परि अमृतातेहि पैजा जिंके। ऐसी अक्षरे रसिके। मेळवीन।' हे त्यांचे उद्‌गार सुप्रसिद्ध आहेत. गीताभाष्य करताना ज्ञानदेवांसमोर जसा पंडितवर्ग होता तसे स्त्री शूद्रादी जनसामान्यही होते. या जनसामान्यांना आपला भावार्थ कळावा ही त्यांची उत्कट इच्छा होती. पंढरीच्या संतमेळ्याशी संबंध आल्यावर त्यांच्यासाठी ज्ञानदेवांनी अभंगरचना केली असावी. त्यांच्या उपलब्ध अभंगाची संख्या ७६५ आहे. बहुतेक अभंग सांप्रदायिक विषयांवर लिहिलेले असून आपली जीवनदृष्टी आणि तत्त्वबोध सर्वसामान्यांपर्यंत पोहचावा हा त्यामागील त्यांचा हेतू स्पष्ट दिसतो.

वारकरी संप्रदायात हरिपाठाचे अभंगांना फार महत्त्वाचे स्थान आहे. संप्रदायाचे सारे रहस्य सांगणारे हे हरिपाठाचे

अभंग म्हणजे वारकरी सांप्रदायिकांची 'संध्या'च होय. अत्यंत साध्या, सहज आणि उत्कट शब्दांत हे अभंग लिहिले असल्यामुळे आजही सामान्य माणसांना ते आवडल्याशिवाय राहणार नाहीत. हरिपाठाचे अभंग हा ज्ञानदेवांच्या अभंगवाणीतील स्वतंत्र विभागच होय. गावकरी आणि परिसरातील शेकडो लोक ज्ञानेश्वरांच्या कीर्तनास उपस्थित राहत असत. लोकभाषेत अर्थ सोपा करून ज्ञानेश्वर गीतेचे अवघड ज्ञान सांगत असत. मराठी भाषेचा मुकुटमणी शोभावा असा 'ज्ञानेश्वरी' ग्रंथ त्यांनी इ. स. १२९० मध्ये लिहिला. आतापर्यंत जे आध्यात्माचे ज्ञान संस्कृत भाषेत आधार घेऊन सामान्य जनांपासून दूर ठेवण्यात आले होते ते ज्ञान मराठी लोकभाषेत आणून ज्ञानेश्वरांनी फार मोठे सामाजिक कार्य केले आहे. ज्ञानेश्वरांना समाधीस्थ होऊन ७०० वर्षांचा कालावधी लोटला असला तरी आठ कोटीच्या महाराष्ट्रात अजूनही ज्ञानेश्वरीचे पारायण शेकडो ठिकाणी होत आहे. कार्तिकी आणि आषाढी एकादशीला 'ज्ञानेश्वरी' घेऊन आजही संतमंडळी पंढरीची वारी करीत असतात. अद्वैत तत्त्वज्ञानाची अतिशय सुंदर आणि रसाळ भाषेत सामान्य माणसांना ओळख करून देणारा अन्य ग्रंथ मराठी भाषेत नाही. भाषा शांत, प्रभावी, रसाळ, मन, बुद्धी आणि हृदय यावर परिणाम करणारी. भाषेचे असे मनोहारी दृश्य अन्यत्र कोठे सापडणे कठीणच. सगुण-निर्गुण याबद्दल सखोल विचार ज्ञानेश्वरीत मांडले आहेत. सर्वसामान्य भक्तजनांसाठी सगुण भक्ती सांगितलेली असली तरी जाणिवेच्या कक्षा जशा रुंदावत जातात तसे ती व्यक्ती सगुणाकडून निर्गुणाकडे जाते. ज्ञानेश्वरीत भक्ती, ज्ञान, वैराग्य यांचाही पुरस्कार दिसतो. ईश्वरप्राप्तीच्या मार्गावर ही तत्त्वे दीपस्तंभासारखी मार्गदर्शन करतात असे सर्वांनी मान्य केले आहे. शेकडो वर्षांची आध्यात्मिक भूक भागविण्यासाठी लोक ज्ञानेश्वरीचे पठण करू लागले. भगवद्गीतेतील विचार तत्त्वज्ञान सामान्यांना कळावेत म्हणून 'भावार्थ दीपिका म्हणजे ज्ञानेश्वरी' ग्रंथ लिहिला होता. तत्कालिन समाजाने त्यांचा अतिशय छळ करूनही त्या दुःखाचे दर्शन त्यांनी आपल्या लेखनात कुठेच घडविले नाही, हे त्याचे मोठेपण होय.

ज्ञानेश्वरांचा महत्त्वाचा दुसरा ग्रंथ म्हणजे 'अमृतानुभव' होय. हा विशुद्ध तत्त्वज्ञानाचा जीव-ब्रह्म ऐक्याचा ग्रंथ आहे. सुमारे ८०० ओव्या या ग्रंथात आहेत. तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने हा श्रेष्ठ ग्रंथ आहे. 'चांगदेव पासष्टी' या ग्रंथाद्वारे त्यांनी चांगदेवांचे गर्वहरण करून त्यांना उपदेश केला. चांगदेव हे महान योगी. त्यांचा अहंकार नष्ट करण्यासाठी संत ज्ञानेश्वरांनी उपदेशपर लिहिलेले ६५ ओव्यांचे पत्र म्हणजे चांगदेव पासष्टी हा गंथ होय. अमृतानुभव या ग्रंथाच्या लेखनानंतर संत ज्ञानेश्वरांनी तीर्थयात्रा केली. संत नामदेव महाराजांच्या 'तीर्थावली'मध्ये या तीर्थयात्रेचा उल्लेख आढळतो. या यात्रेनंतर माऊलींनी समाधी घेण्याचा निर्णय घेतला. वयाच्या २१ व्या वर्षी आळंदी येथे इंद्रायणी नदीच्या काठी संजीवन समाधी घेतली. (कार्तिक वद्य त्रयोदशी, शके १२१८, इ. स. १२९६, गुरुवार) हा ज्ञानसूर्य मावळल्यानंतर अवघ्या वर्षभरात निवृत्ती, सोपान व मुक्ताबाई या त्यांच्या भावंडांनी आपली इहलोकीची यात्रा संपवली. समाजातील श्रेष्ठांपासून कनिष्ठापर्यंत, पंडितांपासून अज्ञानी लोकांपर्यंत सारा समाज भक्तीच्या एकसूत्रात त्यांनी बांधला. भक्तीची सोपी वाट त्यांनी दाखविली. त्यामुळे सामान्य माणसाला आत्मविकासाचा मार्ग सापडला.

**संत नामदेव :**

भारतीय संत मंडळात नामदेवांचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. महाराष्ट्रातील हे एक संत. त्या काळामध्ये ज्यावेळी दळणवळणाची साधने नव्हती अशा काळात थेट उत्तरेत पंजाबपर्यंत जाऊन तिथल्या जनतेला त्यांनी प्रभावित केले,

ही मोठी गोष्ट आहे. नामदेव हे मराठीतील पहिले चरित्रकार व आत्मचरित्रकार आणि किर्तनाच्या माध्यमातून भागवत धर्म पंजाबपर्यंत नेणारे आद्य प्रचारक होय. भक्तशिरोमणी संत नामदेव हे ज्ञानेश्वरांच्या कालखंडात होऊन गेले. आपल्या किर्तनामुळे प्रत्यक्ष पांडुरंगाला डोलायला लावणारा अशी त्यांची किर्ती होती. संत नामदेव प्रत्यक्ष श्रीविठ्ठलाच्या निकटवर्ती असलेला सखा होता, असे मानले जाते. संत नामदेव हे वारकरी संप्रदायाचे महान प्रचारक असून भारतभर त्यांनी त्या बाबतीत भावनिक एकात्मता साधली. भागवत धर्माची पताका पंजाबपर्यंत घेऊन जाण्याचे कार्य त्यांनी स्वकर्तृत्वाने केले. नामदेवांचे कुटूंब मोठे होते. आई, वडील, बहिण, पत्नी स्वत: नामदेव असे १५ जणांचे कुटुंब. दामाशेटी हे त्यांचे वडील व गोणाई ही माता होती. दामाशेटींचा व्यवसाय हा कपडे शिवण्याचा होता. सध्याच्या हिंगोली जिल्ह्यातील नरसी बामणी हे नामदेवांचे जन्मगाव. त्यांचा जन्म शके ११९२ (इ. स. १२७०) मध्ये कार्तिक शुद्ध एकादशीस, रविवारी झाला. त्यांना ८० वर्षांचे आयुष्य लाभले. त्यांचे बालपण पंढरपूर येथे गेले. त्यांनी लहानपणापासून श्रीविठ्ठलाची अनन्यसाधारण भक्ती केली. सगुण भक्तीत रमून समाजाला मानवतेची उपासना शिकवून भागवत धर्माची पताका पंढरीपासून पंजाबपर्यंत नेणाऱ्या नामदेवांचे व्यक्तिमत्त्व भाववेडे होते. आपल्या अभंगवाणीच्या रूपाने त्यांनी वाचकांशी सख्यत्व जोडले. त्यांची अभंगवाणी म्हणजे त्यांच्या भाववेड्या, उदात्त, प्रसन्न, सोज्वळ आणि नि:ष्पाप अशा व्यक्तिमत्त्वाचाच आविष्कार होय. अखिल भारतभर मानवता धर्माची पताका उंच फडकविणारे नामदेव हे एक संतश्रेष्ठ होत. गुजरात, मध्यप्रदेश, पंजाब, हरियाना, उत्तर प्रदेश अशा ठिकाणी संत नामदेवांची स्मृतिमंदिरे उभी आहेत. ती भारतीय एकतेची साक्ष देणारी आहेत. भारतीय एकतेचा सांस्कृतिक इतिहास घडविण्यात संत नामदेवांचा मोठा वाटा आहे.

नामदेवांना सर्व संतांच्या मानाने जास्त काळ आयुष्य लाभले. ८० वर्ष ते जगले. या काळात त्यांनी जे कर्तृत्व दाखविले त्याची सीमा केवळ महाराष्ट्रापुरती मर्यादित नव्हती. 'ज्या ज्या देशी जाती तीर्था। तेथे तैसीच करिती कविता।' असे नामदेवांचे वर्णन संतचरित्रकार महिपतींनी केले आहे. नर्मदेच्या उत्तरेकडे भक्तिमार्गाचा प्रसार करणारा अखिल भारतीय पहिला संत जर कोणी असेल, तर ते संत नामदेव हे आहेत. नामदेवांचे व्यक्तिमत्त्व पहिल्यापासून अशा रीतीने घडत गेले की त्यांना उत्तम प्रकारचा स्नेह लाभला आणि आपली आत्मपरिक्षा करीत करीत त्यातूनच आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करून घेण्याची ओढ त्यांना लागलेली होती. या ओढीतूनच त्यांचे व्यक्तिमत्त्व विकसित झाले. नामदेव हे असे संत आहेत की, ज्यांचे कवित्व आणि व्यक्तिमत्त्व हे एकमेकांशी अत्यंत समरूप झालेले आहेत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास सामान्याकडून असामान्याकडे जाणारा असा आहे. जनसामान्यांना ज्ञानदेवाबद्दल आदर वाटतो तर नामदेवाबद्दल जिव्हाळा वाटतो. त्या काळातील निद्रिस्थ, बेचैन, त्रस्त झालेल्या समाजाला नामदेवांनी भावभक्तीच्या मंत्राने दिलासा दिला. सामान्यांच्या अंत:करणाला स्पर्श करील अशा सुबोध आणि सरस भाषेत त्यांनी भागवत संप्रदायाच्या तत्त्वांचा प्रसार केला. परधर्मसहिष्णूता व सर्वसमावेशकता या वैशिष्ट्यांमुळे त्यांच्या कार्याचा विस्तार व लोकप्रियता खूपच वाढली आहे. भागवत धर्माची ही पताका आणि नामभक्तीचा मंत्र त्यांनी पंढरीपासून पंजाबपर्यंत नेऊन पोहचविला. संस्कृत ग्रंथाचा अभ्यास ते करू शकले नसले तरी नामाचे प्रबंध पाठ करावयास विसरले नाहीत. 'नाम हेचि कर्म, नाम हेचि ब्रह्म' त्यांनी मानले.

प्रत्यक्ष ईश्वरापेक्षाही नामदेवांना ईश्वरप्राप्ती अधिक प्रिय होती. त्यांच्या कविमनाचे हे वैशिष्ट होय. नामदेवांमुळेच

मराठी कवितेला अभंगाचा लाभ झाला. हे अभंग सामान्यांच्या भाषेतून गायिले गेले. अठरापगड जातीतील संतांना त्यामुळे अभंगलेखनाची प्रेरणा मिळाली. आपल्या विचारांच्या प्रसारासाठी किर्तन हा सर्वांत चांगला मार्ग नामदेवांनी चोखाळला. 'नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी।' ही त्यांची महत्त्वकांक्षा कीर्तनाद्वारे साकार होऊ शकली. नामदेव हे किर्तन परंपरेचे आद्यप्रवर्तक ठरतात. आपल्या काव्यनिर्मितीच्या व आचरणाच्याद्वारे नामदेवांने समाजाला मानवता, शांती, भूतदया, प्रेमभाव, संतमहात्म्यातून आदर्श व्यक्ती आणि भक्त यांची महती शिकविली. निरागसता, कोमलता, मनाचे औदार्य आणि विशालता हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या स्थायीभाव होता. नामसंकीर्तन आणि विठ्ठलप्रेम हे त्यांचे खरे मार्ग होते. त्यामुळे उच्च, कनिष्ठ जातीतील भक्त एकत्र आले. त्यात स्त्रियाही आल्या. समाजातील अठरापगड जातीतील संत एकत्र आले आणि त्यांनी अभंग रचना केली. मराठीतील पहिले भाव कवी, पद्य चरित्रकार, आत्मचरित्रकार, आख्यान कवी, भागवत धर्माचे संघटक आणि प्रचारक, कीर्तन परंपरेचे प्रवर्तक, आपल्या शिष्याची समाधी बांधणारे गुरू अशा अनेक दृष्टीने नामदेवांचे व्यक्तिमत्त्व संपन्न आहे.

नामदेवांनी महाराष्ट्रातील सांस्कृतिक जीवनाला आकार दिला. नामदेवांच्या संदर्भात हे. वि. इनामदार म्हणतात, ''नामदेव हे भाटे भक्त होते तसेच ते कुशल संघटकही होते. वारकरी संप्रदायाच्या संघटनेचे कार्य त्यांनी ज्ञानेश्वरांच्या हयातीत तर केलेच, पण ज्ञानेश्वरांनी समाधी घेतल्यानंतरही पन्नास वर्ष महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर नामदेवांनी विठ्ठलभक्तीचा ध्वज फडकविला.'' विविध प्रदेशात जाऊन नामदेवांनी तेथील लोकभाषेत रचना केली. अठरापगड जातींना विठ्ठल प्रेमाने भारून जातिनिरपेक्ष अशा आध्यात्माविचारांची मुहुर्तूमेढ रोवली. नामसंकिर्तनाची नवी परंपरा सुरू केली आणि वारकरी संप्रदाय हा अतिशय प्रभावशाली बनविला. संतांचे अभंगवाणी ही उत्कृष्ट भावकविता आहे, याची पहिली प्रचिती नामदेवांच्या अभंगवाणीतून येते. आपला मनोभाव प्रकट करताना साधी भाषा वापरली. 'देह जावो अथवा राहो' या दृढ निश्चयाने त्यांनी पांडुरंगाचे चरणी स्वत:चे विचार समर्पित केले. आपल्या कीर्तन-वक्तव्यामुळे लक्षावधी मराठी जनतेला भारावून टाकले. नामदेव हे भागवत धर्माचे उत्कृष्ट प्रसारक होते. संत महात्म्य आणि संत समागम यांना भागवत धर्मात महत्त्वाचे स्थान आहे. नामदेवांना जनसामान्यांपर्यंत भक्तीचे महात्म्य पोहचवायचे होते आणि नाम हा तर त्यांचा आत्माच होता. नाममहात्म्य सांगणे व भक्तिमहिमा विशद करणे हा नामदेवांचा आख्यानक काव्यरचनेमागील हेतू होता. आपल्या उत्कट भक्तीने ईश्वरास प्रिय झालेल्या अनेक संताचे आदर्श नामदेवांनी आपल्या अभंगवाणीतून उभे केले. गोरा कुंभार, जनाबाई, चोखामेळा यांची नामदेवलिखित चरित्रेही सुंदर आहेत. अर्थात, ती जरी संपूर्ण चरित्रे नसली तरी त्या त्या संतांच्या जीवनातील एखाद दुसऱ्या नाट्यपूर्ण व चमत्कृतिपूर्ण प्रसंगावर आधारलेली ती छोटी आख्यानेच आहेत. कीर्तनातून नामभक्तीचा प्रसार करताना अशी आख्याने उपयुक्त ठरतात. पौराणिक धाटणी व रसाळ निवेदन यामुळे ही संतचरित्रे आकर्षक झाली आहेत. याच भूमिकेतून संत नामदेवांनी दशावतार वर्णन, हरिश्चंद्राख्यान, श्रियाळाख्यान, ध्रुवाख्यान अशी काही सरस आख्यानेही लिहिली आहेत. येथे मात्र नामदेवांनी माध्यम म्हणून अभंगाऐवजी ओवीचा वापर केला आहे.

अंतर्मुखता, आत्मपरता आणि जिव्हाळा ही नामदेवांच्या कवितेचा गाभा आहे. यातून निर्माण झालेले त्यांचे अभंग अधिक परिणामकारक बनले आहेत. नामदेवांनी काही रूपकात्मक अभंगही लिहिले आहेत. शेत, धेनू,

घोंगडे, पांगुळ, जाते अशी रूपके घेऊन ते भक्तिभावनेचे निवेदन करतात. याशिवाय आरत्या, भूपाळी अशी ही नामदेवांची रचना आहे. 'युगे अठ्ठावीस विटेवरी उभा। वामांगी रखुमाई दिसे दिव्य शोभा।' ही त्यांची आरती सर्वतोमुखी आहे. ज्ञानदेवांची नामदेवलिखित आरती म्हणजे त्यांचे एक छोटेसे चरित्रच म्हटले पाहिजे. नामदेवांची वाणी अशी विविधात्मक आहे तिने मराठी भाषेला जिवंतपणा आणि अमृतमधुर रूप दिले. मराठीतील पहिले भावकवी, आख्यानकवी, पद्यचरित्रकार असेच त्यांचे वर्णन करावयास हवे. पारदर्शीपणा हे त्यांच्या कवितेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य होय. मराठीतील पहिले चरित्रकार म्हणून म्हाइंभट्टाचा उल्लेख होतो, पण त्यांनी लिहिलेली चरित्रे गद्यात आहेत. काव्याच्या माध्यमातून पहिले चरित्र लिहिण्याचा मान नामदेवांकडे जातो. आदि, समाधी आणि तीर्थावळी अशा तीन प्रकरणांतून त्यांनी आपल्या परमप्रिय ज्ञानेश्वरांचे चरित्र लिहिले असून त्यात एकूण अभंगरचना सुमारे साडेतीनशे आहे. तीर्थावळी व समाधी या प्रकरणात ज्ञानदेवांचे चरित्र सांगता सांगता नामदेवांचे आत्मचरित्रही अगदी सहजपणे उतरले आहे. नामदेव ज्ञानदेवांशी किती समरस झाले होते, याची ही साक्षच म्हटली पाहिजे. नामदेवांना ज्ञानदेवांविषयी वाटणारा आदर व प्रीती या अभंगातून व्यक्त होतो.

संत ज्ञानेश्वरांच्या भेटीनंतर (इ. स. १२९१) संत नामदेवांचे आयुष्य पालटले. अनेक संतांबरोबर त्यांनी भारतावर तीर्थयात्रा केल्या. त्यांच्या कीर्तनात अनेक सद्ग्रंथांचा उल्लेख असे. यावरून ते बहुश्रुत व अभ्यासू असल्याचे लक्षात येते. 'नामदेव कीर्तन करी, पुढे देव नाचे पांडुरंग' अशी त्यांची योग्यता होती. भागवत धर्माचे आद्य प्रचारक संत नामदेवांनी संत ज्ञानेश्वरांच्या संजीवन समाधीनंतर सुमारे ५० वर्षे भागवतधर्माचा प्रचार केला. प्रतिकूल परिस्थितीमध्ये महाराष्ट्राची भावनिक एकात्मता जपण्याचे अवघड काम त्यांनी केले. पंजाबातील शीख बांधवांना ते आपले वाटतात. शीख बांधव 'नामदेव बाबा' म्हणून त्यांचे गुणगान गातात. पंजाबातील 'शब्दकीर्तन' व महाराष्ट्रातील 'वारकरी कीर्तन' यात विलक्षण साम्य आहे. पंजाबमध्ये संत नामदेवांनी चांगला दिग्विजय गाजविला. आपल्या संप्रदायाचा प्रसार महाराष्ट्राबाहेर करण्याचे श्रेय नामदेवांनाच आहे. ते पंजाबात १८ वर्षे राहिले. तिथे त्यांचा शिष्य परिवार पसरला होता. पंजाबात गुरुदासपूर जिल्ह्यात 'घुमन' येथे त्यांची समाधी बांधली आहे. त्यावरून पंजाबमध्ये त्यांना किती मान घेता, याची कल्पना येते. यावरून नामदेवांचे कार्य किती प्रभावी होते हे स्पष्ट होते. इतर प्रांतात जे भक्तिपंथाचे उठाव झाले. त्याला प्रेरणा देण्याचे काम नामदेवांनी केले. नामदेवांना मराठी संतमंडळाचा 'मुकुटमणी' म्हणणे सार्थ होईल. बहोरदास लद्धा, विष्णुस्वामी, केशव कलाधारी हे त्यांचे पंजाबी शिष्य होते. राजस्थानातील शीख बांधवांनीही त्यांचे मंदिर उभारले आहे. 'संत शिरोमणी' असे यथार्थ संबोधन त्यांच्याबद्दल वापरले जाते. त्यांनी पंजाबी भाषा शिकली होती. शिखांच्या पवित्र गुरू ग्रंथसाहेबात नामदेवांच्या ६२ रचनांचा समावेश असल्याचे पाहायला मिळते. संत नामदेव उत्तरेचा प्रवास करीत होते, तेव्हा यवनांच्या आक्रमणांचा दररोज धोका होता. त्यांच्यासाठी हा नवखा प्रांत होता. मात्र तरीही न डगमगता त्यांनी मार्गक्रमण केले व आपले ईप्सित कार्य संपल्यावर ते पुन्हा महाराष्ट्रातही आले. देवाचे देवपण हे मनुष्याच्या दुबळेपणात, त्याच्या व्याधींमध्ये आणि त्यांच्यावर कोसळणाऱ्या संकटांमुळे भयग्रस्त होणाऱ्या त्यांच्या मनात आहे, असा सिद्धांत नामदेवांनी मांडला. 'रोग व्याधि पीडा जनांसी नसती। तरि कोठा पुसती वैद्यालागी॥ नामा म्हणे विठो दैवे आलो घरा। नको लावू दारा आम्हांलागी॥'' या अभंगात नामदेवांनी हाच सिद्धांत मांडला आहे.

हातात एकतारी आणि चिपळ्या घेऊन फिरतानाचे नामदेवांचे चित्र आपण नेहमी पाहतो. त्यांनी वेद-विद्येचे पठण केले नाही, पण त्यांना समाजातील पीडितांची दु:खे ठाऊक होती. ईश्वरावर अंधश्रद्धा असणाऱ्यांची लुबाडणूक आणि फसवणूक पंढरपुरात काहीजण करतात हे त्यांनी पाहिले होते. अशा अंधश्रद्धेपासून जनतेला दूर करून त्यांना कर्मयोगाच्या मार्गाला लावण्याचे संत नामदेवांचा नेहमीच प्रयत्न होता. नामदेवांची थोरवी आणि वैचारिक प्रगल्भता त्यांच्या अभंगात दिसतेच.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न -१ :**

**(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) महाराष्ट्रातील सर्वात महत्त्वाचा भक्तिसंप्रदाय कोणता?

२) पंढरपूरची वारी करणाऱ्यास काय म्हणतात?

३) वारकरी संप्रदायाचे दुसरे नाव काय आहे?

४) तुळशीची माळ गळ्यात धारण करणाऱ्यास काय म्हणतात?

५) ज्ञानेश्वरांनी स्वत:ला व अन्य भक्तांना काय म्हटले आहे?

६) वारकरी संप्रदायाचा प्रारंभ कोणापासून झाला?

७) वारकरी संप्रदायाचे आराध्य दैवत कोणते?

८) पंढरपूर शहर कोणत्या नदीकाठी आहे?

९) वारकरी संप्रदायाचा मूलमंत्र कोणता?

१०) संत ज्ञानेश्वर व संत नामदेवांचा कालखंड कोणता?

**(ब) योग्य पर्याय निवडून खालील वाक्य पूर्ण करा.**

१) वारकरी संप्रदायाचा पाया खऱ्या अर्थाने .......... नी घातला.

(अ) संत ज्ञानेश्वर (ब) संत बहिणाबाई (क) संत चोखामेळा (ड) संत रामदास

२) ज्ञानेश्वरांनी गीतेवरील .......... हा ग्रंथ लिहिला.

(अ) रघुवंश (ब) ज्ञानेश्वरी (क) गाथासप्तशती (ड) गीतारहस्य

३) भागवत धर्माचा प्रसार पंजाबपर्यंत .......... यांनी नेला.

(अ) संत रामदास (ब) संत नामदेव (क) संत भानुदास (ड) संत एकनाथ

४) 'युगे अठ्ठावीस विटेवरी उभा' ही .......... या संताची रचना आहे.

(अ) संत भानुदास (ब) संत नामदेव (क) संत रामदास (ड) संत ज्ञानेश्वर

५) संत नामदेवांची पंजाबमध्ये .......... येथे समाधी आहे.

(अ) गुरुदासपूर (ब) अमृतसर (क) घुमन (ड) पतियाळा

### ३.२.७ संत एकनाथ व संत तुकाराम :

**संत एकनाथ :**

चौदाव्या-पंधराव्या शतकात महाराष्ट्रात, मराठी मुलखात मुसलमानांचे राज्य होते. हिंदू समाज मुसलमानी अंमलाखाली सर्व बाजूंनी भरडला जात होता. मुसलमानी छळांनी अन्याय, अत्याचारांनी मराठी समाज संकटात पडला होता. त्यांच्यापुढे सगळा अंधार होता. त्यातून काही मुक्तीचा मार्ग त्यांना दिसत नव्हता. याच काळात संत एकनाथांचे आपल्या वाङ्मयातून समाजात जागृती निर्माण करण्याचे कार्य चालू होते. हिंदू समाजाची झालेली अधोगती ते डोळ्यांनी पाहत होते. सर्व समाज मोडून पडल्यासारखा दिसत होता. वर्णाश्रमधर्म समाजात उच्च-नीच जातिभेद, उफाळलेले होते. उच्चवर्णीयांचे कर्मकांड चालू होते. स्पर्शास्पर्श अस्पृश्यता समाजात पदोपदी दिसत होती. त्यातच मुसलमानाचे अत्याचारी जुलमी राज्य. त्यामुळे मराठी समाज हतबल झालेला होता. हिंदू समाजाच्या प्रगतीचा, ऊर्जितावस्थेचा त्यांना मार्ग दिसत नव्हता. अशा अंधारमय अवस्थेत संत एकनाथ, संत तुकाराम यासारख्या संतश्रेष्ठींनी सामाजिक कार्य केलेले दिसते.

ज्ञानदेवांच्या काळाकडून एकनाथांच्या काळाकडे वळणे म्हणजे वैभवसंपन्नतेकडून दारिद्र्याकडे वळल्याप्रमाणे आहे. वैभवाचा मागमूसही एकनाथकालीन महाराष्ट्राच्या जीवनात नसून उलट दुःख आणि दारिद्र्य यांनी ते पिचून गेलेले दिसून येते. यवनी आक्रमणाच्या या सपाट्यात हिंदूंची शेकडो देवळे उद्ध्वस्त झाली. त्यांचे धर्मग्रंथ अग्निमुखी पडले, स्त्रियांची आब्रू गेली. मुसलमानांची अनिवार राज्यतृष्णा, त्यांचे धर्मवेड आणि आततायीपणा यांचा अत्यंत कटू अनुभव येऊन महाराष्ट्र आत-बाहेर पोळून निघाला. या काळात क्षत्रिय आपला क्षत्रिय धर्म विसरून हतबल झाले होते. ग्रामीण भागात राहणारी सामान्य जनताही हतबल झाली. समाजात बेबंदशाही माजली होती. दुःख, दारिद्र्य आणि अज्ञान नाथवगलीन समाजात बरेच वाढले होते. ज्ञानेश्वरकालीन महाराष्ट्राची समृद्धी व वैभव लोप पावले होते. मुसलमानी आक्रमणामुळे महाराष्ट्र संस्कृती आणि मराठी भाषा यांची गळचेपी सुरू होती. हिंदू देवळे नष्ट होऊन मशिदी बांधल्या जात होत्या. मराठी भाषेत शेकडा साठ टक्के फारशी शब्द शिरले होते. या परिस्थितीचा परकीय आक्रमण जसे कारणीभूत होते तशी हिंदू समाज व्यवस्थेतील विषमता मराठी अज्ञानही कारण होते. पोटासाठी वेदांची विक्री चालू होती. भोंदू गुरू खूप झाले होते. पैठण तर कर्मठपणाचे माहेरघर बनले होते. वर्णव्यवस्थेच्या कठीण बंधनामुळे बहुजन समाज व शुद्र यांना संस्कृत विद्येचा स्पर्श वर्ज्य होता. त्यामुळे त्यांना खरे ज्ञान कधीच प्राप्त झाले नाही. क्षुद्र देवतांच्या नवसपूजनाचे प्रस्थ वाढले होते. देवतांना प्राण्यांचे बळी देणे व मद्यमांस सेवन करणे हाच धर्म मानला गेला.

समाजाला ज्ञानेश्वरीतील तत्त्वज्ञानाचा पूर्णपणे विसर पडला होता. अशा बिकट आणि विस्कळीत परिस्थितीत शांतपणे मराठी जनता धर्म, संस्कृती संघटित करून मराठ्यांच्या भावी स्वराज्याला पोषक अशी मनोभूमिका तयार करण्याचे काम संत एकनाथांसारख्या श्रेष्ठींनी केले. मध्ययुगातील भ्रष्ट वातावरणातील अज्ञानी, अविवेकी, ढोंगी प्रवृत्तींच्या लोकांचे जवळून निरिक्षण करून त्यांची विदारक चित्रे एकनाथांनी आपल्या साहित्यात रेखाटली. एकनाथांचा कार्यकाळ म्हणजे सोळावे शतक त्यांचा जन्म इ. स. १५२८ मध्ये पुण्यपावन अशा घराण्यात पैठण येथे झाला. ज्यांनी विजयनगरहून श्रीविठ्ठलाची मूर्ती पंढरपुरास परत आणली. सुप्रसिद्ध संत भानुदासांचे एकनाथ हे पणतू होते.

संत ज्ञानेश्वर व त्यांच्या प्रभावळीतील संतांच्या नंतर भागवत संप्रदायास ओहोटी लागली. ती सावरण्याचे कार्य भानुदास यांनी केले. भानुदासांनी आपल्या समर्थ व्यक्तिमत्त्वाने पंढरपूरच्या वारीच्या परंपरेत जोश व उत्साह निर्माण केला. भगवद्‌भक्ती त्यांच्या घराण्यात पूर्वीपासून चालत आलेली. अशा पुण्यशील, समृद्ध परंपरेचा दुवा साधण्याचे भाग्य नाथांना लाभले होते. पैठण हे निजामशाहीच्या वर्चस्वाखाली होते. या काळात महाराष्ट्रात राजकीय व धार्मिक क्षेत्रात अवनती झाली होती. संत एकनाथांनी धर्माची झालेली अवनती संपवून त्यात चैतन्य निर्माण केले. लोकांच्यात धर्माभिमान जागृत केला. पैठण हे तत्कालीन महाराष्ट्राचे काशीक्षेत्र आणि संस्कृतच्या व धर्मग्रंथाच्या अभ्यासाचे पीठ समजले जात. अशा क्षेत्री एकनाथांचे कार्य होते.

तत्कालिन समाज मुस्लिमांच्या अत्याचारी राजवटीने भयभीत होऊन हतबल झालेली होती. मुसलमानी भयानक अत्याचारी सत्तेला विरोध करण्याचे कुणीच धाडस करत नव्हते. समाजाच्या याच पराभूत मनोवृत्तीत व पडत्या काळात थोर पुरुषांच्या मार्गदर्शनाची आवश्यकता असते. त्यात एकनाथांचा उदय झाला. त्यांच्या साहित्याचे, त्यातील त्यांच्या शिकवणुकीचे व उपदेशाचे तत्कालीन परिस्थितीत फारच मोठे महत्त्व आहे. धर्माच्या ग्लानीच्या काळातील औदासिन्य नाहीसे होऊन, आपला धर्म, भाषा, संस्कृती याबद्दल लोकांना आत्मीयता वाटू लागल्याचे दिसून येते. या सांस्कृतिक पुनरुज्जीवनाचे आद्यप्रवर्तक संत एकनाथ हेच होत. सोळाव्या शतकातील महाराष्ट्राचे वैचारिक व वाङ्‌मयीन वैभव हा एकनाथांच्या मूलग्राही व सर्वसंग्राहक दृष्टीचा परिपाक आहे. यात बिलकूल संशय नाही.

एकनाथांनी ज्ञानेश्वरांचे खंडित झालेले कार्य अधिक उठावदार व व्यापक स्वरूपात पुढे चालू केले. पैठणसारख्या सनातन्यांच्या बालेकिल्ल्यात त्यांनी भागवत धर्माची विजयपताका फडकाविली. कर्मठांच्या राजधानीत स्त्री शूद्रांचा कैवार होऊन त्यांनी देशभाषेचा आवर्जून पुरस्कार केला व महाराष्ट्राच्या विचारसंपदेत मौलीक भर घातली. एकनाथ हे महाराष्ट्रातील उदारमतवादाचे व नेमस्त संप्रदायाचे जनक होत. त्यांचा जीवनक्रम म्हणजे समन्वयवादाचा एक उत्कृष्ट आदर्श आहे. एकनाथांच्या काळी वर्णाश्रम धर्म होता. धर्मशास्त्रे पवित्र व पूज्य मानली जात होती. त्या वेळी समाजात श्रेष्ठ-कनिष्ठ, उच्च-नीच अशा जाती होत्या आणि या जातिभेदाच्या भिंतीही पक्क्या होत्या. अत्यंज-अतिशूद्रांचा स्पर्श झाल्याचा विटाळ मानला जात असे. आपल्या ग्रंथाच्या आधारे एकनाथांनी सर्व जातिभेदाचे, वर्णाश्रमव्यवस्थेचे विवेचन केले आहे. एकनाथी विचारांवर चातुर्वर्ण्याच्या उत्पत्ती विचारावर धर्मशास्त्रीय वेद-स्मृती-शास्त्रांच्या विचाराचा विशेष प्रभाव दिसतो. व्यवहारी जीवनात संत एकनाथांना भक्तिक्षेत्रात देवाच्या भक्तीच्या प्रांतात, देवाच्या भक्तीच्या मंदिरात समता समभाव पाहिला होता. भक्तीपंथांचा ज्ञानेश्वर महाराजांवर प्रभाव इतर संताप्रमाणेच एकनाथांवरही होता. सर्व संताप्रमाणेच एकनाथांनी भक्ती प्रांतात ज्ञानेश्वरांना मानले.

संत एकनाथांनी एकनाथी भागवतातून त्यांच्या इतर वाङ्‌मयातून म्हणजे भावार्थ रामायण, रुक्मिणी स्वयंवर इत्यादी वाङ्‌मयातून आपली स्वत:ची समतादृष्टी कशी आहे, हेही सांगितलेले आहे. त्यांच्या भक्तिमार्गी व्यवहारातील समतेच्या विचारावर ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीतील विचारांचा मोठा प्रभाव दिसतो. शिवाशिव, स्पृश्य-अस्पृश्यता पाळली जात होती. त्या समाजाच्या अधोगतीच्या काळात संत एकनाथांनी आपल्या वाङ्‌मयातून भक्तिमार्गी

समतावादाची दिशा दिली. तसा त्यांनी दैनंदिन व्यवहारात समतावादाचा प्रचार व प्रसारही केलेला होता. त्यांनी आपल्या वाङ्मयातून एकनाथी भागवतातून, भावार्थ रामायणातून वेदाविरुद्ध, वर्णाश्रमाविरुद्ध, ब्राह्मणविरोधी, जातीभेदाविरुद्ध, उच्च-नीचतेविरुद्ध, अस्पृश्यतेविरुद्ध विचार मांडलेले दिसतात. भक्तीच्या प्रांतात सर्व भक्त समसमान असतात, असे एकनाथांचे मत होते.

ज्ञानेश्वरांच्या तत्त्वज्ञानाची ज्ञानेश्वरी एकनाथांनी तीनशे वर्षानंतर अतिशय काळजीपूर्वक संपादित केली व जनसामान्यांसमोर ज्ञानेश्वरीतील तत्त्वज्ञान पुढे आणले. त्या ज्ञानदेवांच्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव एकनाथांच्या जीवनावर झाला. त्यामुळेच ज्ञानेश्वरीतील तत्त्वज्ञान आपोआप एकनाथांच्या वाङ्मयात उतरले. आपणावर ज्ञानदेवांचे ग्रंथरूपाने झालेले उपकार एकनाथांनी त्यांच्या समाधीचे आणि ज्ञानेश्वरीचे संशोधन करून फेडिले.

तीर्थाटनाची काही वर्ष सोडल्यास एकनाथांचे सर्व आयुष्य पैठणमध्ये गेले. १२ वर्ष जनार्दनस्वामींचे सानिध्य लाभले व गुरूसेवा त्यांनी केली. नाथांच्या बालपणाविषयी फारशी माहिती उपलब्ध नाही. केशवकृत नाथचरित्रात किंवा महिपतींच्या भक्तविजयातही नाथांच्या जन्माविषयी, बालपणाविषयी तपशील नाही. नाथांना कुणी समकालीन संत नाही. त्या काळातील समाजाचे सत्त्व राखून परंपरा टिकविण्याचे अत्यंत अवघड, अशक्यप्राय कार्य एकट्या नाथांना करावे लागले. आई-वडिलांच्या मृत्युनंतर त्यांचे संगोपन आजोबा व आजी- चक्रपाणी व सरस्वती यांनी केले होते. नाथांची बुद्धिमत्ता लोकविलक्षण होती. जनार्दनस्वामींची किर्ती ऐकून आत्मोद्धारासाठी ते देवगडला गेले. नाथांच्या सदाचार, चिकाटी, अभ्यासूवृत्ती, श्रद्धा इत्यादी गुणांची परीक्षा घेतल्यावरच त्यांना शिष्य म्हणून स्वामींनी स्वीकारले. सद्‌गुरुंची त्यांनी मनोभावे सेवा केली. सर्व शास्त्रांचे उत्तम अध्ययन केले. न्याय आणि मीमांसा ही शास्त्रे नाथांनी उत्तम अभ्यासली. वेद वाङ्मय अन्य संतवाङ्मयाचेही नाथांनी उत्तम अध्ययन केले. नाथांनी गुरुचरणी आपला भाव समर्पित केला. गुरूच्या आज्ञेनुसारच नाथांनी तीर्थयात्रा केली. गुरुच्या आज्ञेनुसार गृहस्थाश्रम स्वीकारला. पत्नीचे नाव गिरिजाबाई होते. त्यांना तीन अपत्ये होती गोदावरी, हरी, गंगा. नाथांच्या प्रपंच अत्यंत यशस्वी झाला. त्यांचे अवघे जीवन लोककल्याणासाठी समर्पित झाली होती. नाथांच्या प्रवचनाला आणि किर्तनाला असंख्य जनसमुदाय येत. नाथांच्या घराचे द्वार सर्वांना खुले होते. ज्ञानेश्वरांच्या तत्त्वज्ञानाचे ते प्रत्यक्ष आचरण करीत होते. नाथांची वाणी गोड होती. नाथांच्या कीर्तनामुळे भक्तीचे महात्म्य वाढलेले होते. सर्व आपली लेकरे आहेत, अशा ममतेने नाथ प्रवचन आणि किर्तन करीत.

नाथांच्या काळात संस्कृत भाषा देववाणी मानली जात. ती ब्राह्मणवर्गापुरतीच मर्यादित होती. नाथांनी ''संस्कृत वाणी देवे केली तरी प्राकृत काय चोरापासोनि जाली?'' असा खणखणीत प्रश्न विचारला. शिवाय देवाला भाषेचा अभिमान नाही. देवाला सर्व भाषा सारख्याच असतात. शब्दापेक्षा तो भावाचा भुकेला असतो हे सुद्धा नाथांनी स्पष्टपणे सांगितले होते. पैठणचे वैदक पंडित मात्र त्यांचा द्वेष करीत होते. कारण नाथांच्या उदयामुळे पंडितांची महती कमी झाली होती. शिवाय नाथ मराठीत प्रवचने करून सामान्यांना तत्त्वज्ञान उलगडून सांगतात, हे त्यांना मान्य नव्हते. नाथांनी शूद्राला वाड्यात येवू द्यावे, स्वत: महारवाड्यात जेवायला जावे, शूद्रांशी सलगी करावी हे त्यांना अजिबात मान्य नव्हते. जनसामान्यांना सुद्धा आत्मसाक्षात्कार होऊ शकतो हे भक्तीच्या माध्यमातून नाथांना दाखवायचे

होते. नागावलेला समाज, सत्त्व हरविलेली प्रजा, पराक्रम हरविलेले क्षत्रिय, भ्रष्ट झालेले ब्राह्मण, हेच त्यांना सर्वत्र दिसत होते. यवनी आक्रमणामुळे अवघा नि:सत्त्व समाज गुलामगिरीचे जिणे जगू लागला, या पूर्ण अध:पतित समाजाचे चित्रण नाथांनी त्यांच्या वाङ्मयात केले आहे. आपले कर्म सोडून वेदसुद्धा विकायला निघालेल्या ब्राह्मणांची त्यांनी चांगलीच हजेरी घेतली आहे. 'स्वमुखे ब्राह्मण न करती अध्ययन। होती भ्रष्ट जाण मद्यपी ते॥' अशा शब्दात नाथ ब्राह्मणांचे अध:पतन वर्णन करतात. तात्पर्य असे की, अवघा समाजच कर्तव्यच्युत झाला होता. कर्मकांडाचा कर्मठपणा आणि कर्मसंन्यासाचा पुरस्कार यात अवघा समाज गुंतला गेला होता. स्वधर्माविषयी कोणालाच आस्था राहिली नव्हती. अशा भयावह स्थितीत नाथांना समाजाचे सत्त्व राखावयाचे होते. बहिणाबाईंनी म्हटल्याप्रमाणे नाथ झाले नसते तर भागवत धर्माचे मंदिर केव्हाच कोसळले असते. 'जनार्दन एकनाथ खांब दिला भागवत.' आपल्या अध:पतित समाजाला पुन्हा एकदा सत्त्वशील करण्याची नाथांची प्रतिज्ञा होती. शून्यातून ब्रह्मांड निर्माण करण्याची मोठी अवघड कामगिरी नाथांना करावयाची होती. अवघ्या समाजाला आपल्या बरोबर नेल्याशिवाय हे घडणार नाही याची जाणीव असल्यामुळे नाथांनी आपल्या शिकवणूकीची दिशा सामान्यांकडे वळविली आणि सामान्य नाथांच्या भाषेतच उपदेश करण्यास प्रारंभ केला. मराठी भाषेत त्यांनी प्रवचने, किर्तने मांडली. भागवताचे अलौकिक तत्त्वज्ञान मराठी भाषेत आणले. विस्कटलेल्या समाजाला एक सूत्रात बांधण्यासाठी नाथांनी समाजाला उपेदश केला. नाथांचा मानवतावादी दृष्टिकोन स्पष्ट दिसतो. सत्त्व हरविलेल्या समाजाला आपणही कोणी आहोत, अशी जाणीव करून द्यावी लागते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत अशी जाणीव नाथांनी समाजाला करून दिली. यातच नाथांची थोरवी आहे, समाजातील ढोंगांवर आणि विषमतेवर नाथांनी कडक टिका केली. 'समाजाला तू रोगी आहेस' एवढे म्हणून भागत नाही तर रोगावरची औषध योजनाही करावी लागते आणि सर्वच संतांनी अशी सुंदर उपाययोजना केली आहे. नाथांनी गीता आणि भागवतातील उत्तमोत्तम गुणांचा आश्रय प्रत्येकाने करावा म्हणून आग्रह धरला. संतांची संगती, विनय, दया, मैत्री, श्रद्धा, शुचिता, तप, आर्जव, ब्रह्मचर्य, अहिंसा, समत्त्व इत्यादी अनेक गुण समाजाने आत्मसात करावे. अंत:करणात कृपालुता असावी, हृदय भक्तीने परिपूर्ण असावे असा उपदेश नाथांनी वारंवार केला आहे. अत्यंत दुराचारी लोक सुद्धा भक्तिमार्गाने उद्धरतात हा गीतेचा संदेश आहे. वेश्येचा उद्धार ही भक्तिमार्गाने होऊन शकतो हे नाथांची सुद्धा दाखविले आहे. थोडक्यात, समाजाचे स्वधर्माचरण करावे. परोपकारी आणि सदाचारी असावे याच गोष्टीवर नाथांनी भर दिला होता.

भागवत हेच मुळी भक्तिप्रधान आहे आणि भक्ती ही नेहमीच समाजाल बरोबर घेऊन जाणारी असते. नाथांनी हे निश्चितपणे ओळखलेले होते म्हणूनच भक्तीची शक्ती समाजाला सुद्धा उमगावी यासाठीच भक्ती, शक्ती आणि मुक्ती यांचा संगम आणि समन्वय घडविणाऱ्या भागवताचा उपदेश नाथांनी स्वत:च्या उदाहरणाने लोकांना आयुष्यभर केला आणि खऱ्या अर्थाने जनजागरण घडवून आणले. नाथ झाले म्हणूनच महाराष्ट्र संस्कृती जिवंत राहिली. ज्ञानेश्वरीचा नाथांनी बारकाईने अभ्यास केला होता. ज्ञानेश्वरीतील तत्त्वज्ञानाच्या अनेक खुणा नाथांच्या भागवतात स्पष्ट उमटलेल्या आहेत. शंकराचार्यांच्या आणि ज्ञानेश्वरांच्या तत्त्वज्ञानाचा सर्वाधिक प्रभाव नाथांच्या चरित्रावर आणि चारित्र्यावर पडलेला होता. नाथांचे वाङ्मय सर्वार्थांनी प्रचंड विस्ताराने आणि सागराप्रमाणे खोल आहे. मूळ भागवताचे एकूण स्कंध १२ आहेत. त्यापैकी ११ व्या म्हणजे एकादश स्कंधावर नाथांनी टीका लिहली. ती आज

एकनाथी भागवत म्हणून प्रख्यात आहे. उत्तमोत्तम ग्रंथांची त्यांनी निर्मिती केली. कीर्तन व प्रवचनाद्वारे समाजप्रबोधनही केले. मानवतावादी आचरण कसे करावे याचा वस्तुपाठ त्यांनी लोकांपुढे ठेवला आहे. शब्दातून आचार मोठा करता येतो हे आपल्या कृतीने त्यांनी दाखविले.

नाथांनी खरी सामाजिक समता कृतीद्वारे प्रस्थापित करण्याचा पराकोटीचा प्रयत्न केला. पैठणमधील राणू महाराने श्रद्धेपोटी नाथांना घरी बोलवले. सनातनी लोकांना हे पटणे शक्य नव्हते. पण नाथ राणू महाराकडे आनंदाने जेवले. नाथांनी एका वेश्येचासुद्धा उद्धार केला. नाथांच्या वाणीतून पिंगलेचे आख्यान ऐकल्यावर आपल्या व्यवसायाची तिला घृणा आली आणि तिने नाथांना उद्धाराचा मार्ग दाखविण्याची विनंती केली. नाथ तिच्या घरी गेले ही घटना अत्यंत क्रांतिकारी होती. नाथांच्या उपदेशाने तिचे अंतरंग पालटून गेले व ती सन्मार्गाला लागली. नाथांच्या क्रांतिकारकत्त्वाचा कळस म्हणजे त्यांनी गाढवाला दिलेले प्राणदान होय. तडफडणाऱ्या गाढवाला त्यांनी गंगेचे पाणी पाजले व त्याचा जीव वाचला. अवघे विश्व परमेश्वराचे स्वरूपच आहे या श्रुतिवचनाचे प्रत्यक्ष प्रमाण नाथांनी गाढवाला गंगा पाजून, जगाला दिले.

नाथांनी आपले विचार व्यक्त करण्यासाठी विविध पद्धतीची योजना केली. पंडित आणि विद्वानांसाठी चतु:श्लोकी भागवत व एकनाथनी भागवताचे लेखन केले. मध्यमवर्गीयांसाठी 'रुक्मिणी स्वयंवर' आणि 'भावार्थ रामायण'ची योजना केली. सर्वसामान्यांसाठी भारूडांची निर्मिती केली. तत्त्वज्ञान लोकभाषेत सांगून जनरंजन करता करता लोकशिक्षण देणारे नाथ हे श्रेष्ठ संत होय. ज्ञानेश्वरीचे संशोधन व ज्ञानदेवांच्या समाधीचा जिर्णोद्धार अशी दोन महत्त्वाची कार्ये नाथांनी केली. दत्त आणि वारकरी संप्रदाय, प्रपंच आणि परमार्थ, काव्य आणि तत्त्वज्ञान, संस्कृत आणि प्राकृत, पंडितश्रेष्ठ आणि जनसामान्य अशा दोन ध्रुवांचा समन्वय नाथांनी आपल्या जीवनात आणि कवितेत घातला. यामुळे 'समन्वयकार एकनाथ' अशा शब्दांत नाथांचे वर्णन करणे उचित ठरेल. हस्तामलक, स्वात्मसुख, शुकाष्टक, गीतासार, चिंरजीवपद, गीतामहीमा यासारखी बरीच स्फूट प्रकरणे नाथांनी लिहिली. या सर्व प्रकरणांमधील सुमारे ४००० ओव्यातून श्रोत्यांच्या मनाचा बोध केला आहे. ध्रुव, सुदामा, प्रल्हाद इत्यादी भक्त, नामदेव, गोरा कुंभार, सावता माळी इत्यादी संताची चरित्रे सांगून भक्तीचा बोध समाजास केला. जवळपास तीनशे भारूडांची रचना त्यांनी केली. तत्कालिन समाजात नित्य आढळणारी ज्योतिषी, कोल्हाटी, डोंबारी, भुत्या, गारुडी, वैदू, बाळसंतोष इत्यादी माणसे खेड्यात परिचयाची होती. लोकांचे आचारविचार, व्यवसाय, भाषा यांचा आधार घेऊन नाथांनी ही भारूडे रचली. ही भारूडे म्हणजे नाथकालीन लोकजीवनाचे व लोकसाहित्याचे प्रकट दर्शनच होय. त्यातून मनोरंजनाद्वारे परमार्थाची भाषा शिकविली आहे. त्यामुळे 'लोकसाहित्यकार' एकनाथ असे नाथांचे वर्णन करावे लागेल. शिवाय अनेक अभंग त्यांनी लिहिले. त्यातून विठ्ठलवर्णन, नाममहात्म्य, पंढरीमहात्म्य इत्यादी विषय आले आहेत. नाथांच्या व्यक्तिगत पारमार्थिक अनुभवांचे दर्शनही या अभंगातून घडले आहे.

'दत्त दत्त ऐसे लागले ध्यान। हारपले मन झाले उन्मन।' ही नाथकृत दत्तात्रेयाची आरती प्रख्यात आहे. कथा-श्रवण किंवा हरिकीर्तन ज्यांना शक्य नाही त्यांना नामस्मरणाचा सोपा मार्ग नाथांनी सांगितला आहे. नाथांची साहित्यसंपदा अष्टपैलू आहे. मराठीतील ग्रंथलेखनाला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली ती नाथांनीच. मराठीतील संशोधन क्षेत्राचा पाया घालणारे नाथ हे पहिले पुरुष होय. रा. द. रानडे म्हणतात, ''प्रपंच व परमार्थ यांची विलक्षण सांगड

घालून संसारामध्ये असतातच परमार्थ करावा हे त्यांनी जसे आपल्या उदाहरणाने सर्व लोकांस शिकविले. त्याप्रमाणे दुसऱ्या कोणत्याही संताने शिकविले नाही.''

**संत तुकाराम :**

तुकाराम हे महाराष्ट्रातील भागवत धर्माचे एक प्रभावी प्रवक्ते होते. वारकरी संप्रदायाचे ते एक निष्ठावंत विचाराग्रणी होते. बहुजन समाजाच्या धर्मश्रद्धेला तत्त्वचिंतनाची आणि चित्तशुद्धीची जोड देऊन मध्ययुगीन जीवनातील जडत्व नाहिसे करणे ही मराठी संतांच्या चळवळीची प्रेरणा होती. तुकारामांचे जीवितकार्यही या प्रेरणेतूनच अंकुरचे आणि आकारास आले. वारकरी संप्रदायाचा कळस ठरलेले संत तुकाराम हे मराठी सारस्वतातील एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व आहे. 'अभंग' म्हणताच तुकोबांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. त्यांच्या अभंगवाणीने महाराष्ट्रातील सामान्यांच्या हृदयात आपुलकीचे स्थान प्राप्त करून घेतले आहे. 'ज्ञानोबा तुकाराम', जयघोष आजही लाखो वारकऱ्यांच्या मुखात सदैव दुमदुमत असतो. कारण ते दोन्ही संत मराठी संस्कृतीचे प्राण आहेत. सामान्यांसारखा संसार करून एक साक्षात्कारी संत होण्याचे भाग्य तुकारामांना लाभले. एक संतश्रेष्ठ, कविश्रेष्ठ आणि श्रेष्ठ समाजसुधारक असणाऱ्या तुकोबांनी आपल्य आचार-विचारांतून अवघ्या समाजाला उन्नतीचा मार्ग दाखविला म्हणून ते जगद्‌गुरू ठरले. तुकोबांची अभंगवाणी हा तुकोबांच्या जीवनाचा आरसा आहे.

वारकरी संप्रदायाच्या संत मालिकतील तुकोबा हे अखेरचे महत्त्वाचे संत. त्यांनी आपल्या अभंगवाणीद्वारे जे कार्य केले त्यामुळेच 'तुका झालासे कळस' असे तुकोबांच्या कार्याचे वर्णन संत बहिणाबाईंनी केले आहे. ज्या प्रतिकूल परिस्थितीत तुकारामांनी आपले कार्य केले ती परिस्थिती लक्षात घेता तुकारामांच्या कार्याचे मोल अधिकच जाणवते. तुकोबांच्या जीवनकाळात संपूर्ण दक्षिण भारतात उलथापालथ चालू होती. आपले अस्तित्व दाखविण्याचे निकराचे प्रयत्न मराठ्यांनी याच काळात केले. मोगल व निजामशाही यांच्यातील सततच्या संघर्षामुळे तुकोबांच्या गावाच्या आसपासचा प्रदेश उजाड झाला होता. यवनी चालीरीती, संस्कृती, भाषा, रूढी व परंपरा यांचा खोलवर परिणाम मराठ्यांवर झाला होता. सातत्याने चाललेल्या संघर्षामुळे मराठी प्रदेशातील अर्थव्यवस्था ढासळून गेली होती. समाजात प्रचंड अव्यवस्था माजली होती. एकनाथांचा अपवाद वगळता या ३०० वर्षांत एकही महत्त्वपूर्ण लेखक निर्माण होऊ शकला नाही. विस्कटलेल्या समाजात बुवाबावजी, अनाचार, तंत्रविद्येला ऊत आला होता. धर्माच्या नावाखाली समाजाला लुबाडले जात होते. ढोंगी गुरूंची संख्या वाढली होती. अशा ढोंगी गुरूंचा समाचार घेताना तुकोबा म्हणतात,

''ऐसे केले जाते भोंदू। कर्म करोनि म्हणती साधु
अंगा लावुनिया राखा। डोळे झाकुनी करिती पाप
दावुनि वैराग्याची कळा। भोगी विषयाचा सोहळा
तुका म्हणे सांगो किती। जळो त्यांची संगती॥''

तुकोबांच्या काळात समाजाची दैन्यावस्था सर्वार्थाने झाली होती. लोक आचारभ्रष्ट झाले होते. अवघा समाज कुमार्गाला लागल्यामुळे सामान्य माणसे सात्त्विक देवतांना टाकून क्षुद्र देवतांना भजत होती. समाजाची फसवणूक चालू होती. तुकोबांनी समाजाचा प्रवाह सात्त्विकतेकडे वळविला. सर्वत्र फोफावत चाललेल्या दुष्ट सामाजिक

प्रवृत्तींचे उन्मूलन करणे हाच संतांच्या आंदोलनाचा प्रमुख उद्देश होता. सर्व वारकरी संतांनी हेच कार्य केले. तुकोबांचे वेगळेपण म्हणजे आपल्या अंत:प्रज्ञेच्या प्रकाशात त्यांनी आपले कार्य केले म्हणून तुकाराम जगद्‌गुरू ठरले.

इंद्रायणी काठच्या देहू क्षेत्रात पवित्र घराण्यात त्यांचा जन्म झाला. 'शुद्ध बीजापोटी, फळे रसाळ गोमटी' हे स्वत:चेच वचन त्यांनी सार्थ केले तुकोबांची कुळी मोरे व आडनाव आंबिले उर्फ आंबळे असे परंपरेने सापडते. आठ पिढ्या विठ्ठलाची उपासना त्यांच्या घराण्यात परंपरेने चालत आली होती. सावजी, तुकोबा, कानबा ही तीन अपत्ये बोल्होबा व कनकाई यांना होती. तुकारामांचे घराणे प्रतिष्ठित असून त्यांच्याकडे देहूची महाजनकी होती. तुकोबांच्या जन्मशकाबद्दल विविध मते आहेत. डॉ. शं. दा पेंडसे, डॉ. निर्मलकुमार फडकुले, डॉ. भालचंद्र नेमाडे इत्यादी अभ्यासकांनी तुकोबांचा जन्मशक १५३० मानला आहे. बालपण सुखात गेले. तुकोबांच्या पहिल्या पत्नी दमेकरी असल्याने दुसरा विवाह जिजाई उर्फ आवली हिच्याशी झाला. ते १७ वर्षाचे असताना आई-वडील वारले. सावजीच्या पत्नीच्या मृत्यूनंतर त्यांनी घराचा त्याग केल्यामुळे वडीलकीची जबाबदारी तुकोबांवर पडली. त्यातच दुष्काळामुळे शेती संपली. व्यवसायही बुडाला. पहिली पत्नी रखुमाबाई वारली. या संकटांमुळे त्यांची वृत्ती उदासीन झाली व प्रपंचाकडे पाठ फिरवली. नंतर त्यांच्या विचारांची दिशा बदलली.

त्यांनी 'विठ्ठल' नाम हेच आपले ध्येय मानले. 'तुहो हे मस्तक। फूटो हे शरीर, नामाचा गजर सोडू नये' असे ठरविले. या काळात ते कर्जबाजरी झाल्याने पती-पत्नीत कलह वाढले. संसारातील दु:ख जननिंदा यामुळे त्यांनी घर सोडले. देहूजवह भोंबगिरी डोंगरावर पारमार्थिक चिंतनासाठी गेले. गावोगावी भजन, किर्तन करू लागले. ग्रंथपठण, नामस्मरण यातून त्यांची आध्यात्मिक साधना सुरू झाली. त्यांच्या ठायी उपजत प्रतिभा होती. तिला अध्ययन, पारायण, दृढ प्रयत्नांचे बळ मिळाले. तुकोबांचा प्रभाव जनमानसावर होता. शिवाजी महाराजांना तुकोबांच्या भेटीची ओढ असल्याने त्यांना सन्मानित करण्यासाठी राजांनी घोडा व संपत्ती पाठविली. पण तुकोबांनी ती परत पाठवली. पण उत्तरादाखल जे चौदा अभंग लिहून पाठविले त्यातून तुकारामांची नि:स्पृहता निरिच्छता स्पष्ट उमटली आहे. एका अभंगात ते म्हणतात, 'तुम्हापाशी आम्ही येऊनिया काय वृक्षा सीठा आहे चालण्याचा। मागावे हे अन्न तरी भिक्षा थोर, वस्त्रासी हे भार चिंध्या बिदी निद्रेसी आसन उत्तम पाषाण, वरी आवरण आकाशाचे सांसारिक दु:खाने पोळलेला एक सर्वसामान्य माणूस संतत्त्वाचा पदवीस चढला, याचा आलेख पाहणे म्हणजे तुकोबांचे पारमार्थिक जीवन पाहणे. तुकारामांनी जीवनाचे कोणतेही क्षेत्र दुर्लक्षिले नाही. आपले व आपल्या भोवतालचे कौटुंबिक जीवन त्यांनी विशेष जिव्हाळ्याने चितारले आहे. अभंगस्पना हे तुकोबांच्या जीवननिष्ठेचा अविभाज्य अंग आहे. विठ्ठलभक्तीचे ते हुकमी साधन आहे तर त्यांच्या आत्माविष्काराचे ते प्रभवी माध्यम आहे. वा. ल. कुलकर्णी (मराठी कविता जुनी आणि नवी), निर्मलकुमार फडकुले (संतकवी तुकाराम एक चिंतन), शं. गो. तुळपुळे (पाच संतकवी) अशा अनेक समीक्षकांनी तुकारामांच्या कवितेचा विस्तृत आढावा घेतला आहे. त्या त्या वेळी त्यांच्या मनात ज्या ज्या वृत्ती उसळल्या त्या त्यांच्या अभंगात व्यक्त झाल्या आहेत. त्यामुळे त्यांचे अभंग म्हणजे उत्कृष्ट भावगीतेच आहेत. सुशिक्षित अशिक्षित, शहरी, ग्रामीण सर्वच लोकांना तुकोबांच्या वाणीचे आकर्षण आहे.

समाजातील दांभिकतेला विरोध करणारे तुकाराम निर्भिड टीकाकार होते. त्यांनी ढोंगी लोकांवर कठोर टीका केली आहे. जनतेला नाडणाऱ्या तथाकथित संतांचा बुरखा काढून टाकून त्यांचे खरे स्वरूप त्यांनी दाखविले.

समाजातील दोष घालविण्यासाठी तुकोबांनी आपल्या कवितेतून सामान्यांना आव्हान केले. दोषी माणसांवर शब्दांचे शस्त्र उचलताना ते कधी कचरले नाहीत. अंधश्रद्धेच्या आहारी जाणाऱ्या लोकांना त्यांनी रोखले. माणसांनी जगातील कुप्रवृत्तीपासून दूर रहावे आणि आपले मन शुद्ध ठेवावे असा पुन्हा पुन्हा उपदेश तुकारामांनी केला आहे. विषमता, अस्पृश्यता त्यांना मान्य नव्हती. त्यांनी आपल्या कवितेमधून कुटुंबकथा सांगून कुप्रवृत्तींचे वस्त्रहरण केले आहे. माणसाचा स्वार्थ त्याला पशू बनवतो, हे त्यांनी सांगितले. समाजातील अंधश्रद्धा, शुद्र देवता यावर टीका केली. प्रापंचिकांना उपदेश करून सामान्य सांसारी माणसांना सात्त्विकता व शुद्धता देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. 'साधी राहणी उच्च विचार' या तत्त्वाचा आग्रह धरून सामान्य माणसाला सतप्रवृत्त करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यासाठी त्यांनी आपली लेखणी झिजवली. तुकोबांचे अभंग वाचकाला ताजे व आजचे वाटतात. काळ बदलला तरी सामाजिक गुणावगुण फारसे बदलत नाहीत. अशा सामाजिक नीतिमत्तेच्या ऱ्हासकाळात तर त्यांची गरज प्रकर्षाने जाणवते. समाजातील दंभ, खोटारडेपणा, विघातक वृत्ती यांचा तुकोबांनी धिक्कार करून समकालीन संतत्त्व, साधुत्त्व यांचा गौरव केला आहे. विभिन्न मानवी व्यवहारांचे चिंतन करणे, त्यांचा अन्वयार्थ लावणे हा त्यांचा प्रकृतीधर्मच होता.

त्यांची अभंगवाणी म्हणजे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा मुक्त अविष्कार आहे. त्यांनी स्वत:विषयी, घराविषयी, कुटुंबाविषयी अभंग लिहिले. त्यातून त्यांचे आत्मचरित्र उलगडत जाते. सांसारिक लोकांना उपदेश करून त्यांनी समाजातील दोषांवर घाव घातला. व्यर्थ चालीरिती व त्यातील अज्ञानावर त्यांनी हल्ला केला. त्यांच्या अभंगवाणीत विविधता दिसते. त्यातील व्याप्ति लक्षणीय आहे. त्यांच्या अभंगवाणीने मराठीला श्रीमंत केले. त्यांनी आपल्या आचार-विचारांतून अवघ्या मनुष्य मात्राच्या सर्वांगीण उन्नतीचा मार्ग दाखविला. त्यामुळेच त्यांची अभंगवाणी अवघ्या महाराष्ट्राच्या हृदयात घर करून राहिली आहे. आपल्या अभंगातून मानवतावादी उदात्त मूल्यांची शिकवण त्यांनी दिली. तुकाराम महाराष्ट्रातील भागवत धर्माचे एक प्रभावी वक्ते होते. वारकरी संप्रदायाचे एक निष्ठावंत विचाराग्रणी होते. बहुजन समाजाच्या धर्मश्रद्धेला तत्त्वचिंतनाची आणि चित्तशुद्धीची जोड देऊन मध्ययुगीन जीवनातील जडत्व नाहिसे करणे ही मराठी संतांच्या चळवळीची प्रेरणा होती. तुकारामांचे जीवनकार्यही या प्रेरणेतूनच अंकुरले आणि आकारास आले. समाजधारणेला आवश्यक अशा नीतिमूल्यांचा पाठपुरावा त्यांनी तळमळेने केला आहे. 'नीति म्हणजेच भक्ती' अशी त्यांची श्रद्धा होती. त्यांनी माणसांच्या कुळ, जाती वर्ग यापेक्षा नीतिमत्तेला सर्वोच्च प्राधान्य दिले. त्यांच्या भावना, त्यांचे विचार, त्यांच्या आशा-आकांक्षा त्यांच्या अभंगातून व्यक्त होतात. किंबहुना तुकारामांचे कवित्व आणि व्यक्तित्त्व ही एकरूपच आहे.

तुकारामांच्या अभंगाची गाथा महाराष्ट्र सरकारने आणि शिवाय अनेक प्रकाशकांनी पुस्तकरूपाने प्रसिद्ध केली आहे. गाथेचे ते लघू लिप्यांतर (लेखक कर्णे राजेंद्र) आहे. तुकारामांच्या भगवद्‌गीतेवरील भाष्याचा 'गीतगाथा' ग्रंथ आहे. पोथीच्या आकारातील हा ग्रंथ भगवद्‌गीतेचे श्लोक आणि त्या श्लोकांचा अर्थ सांगणारे जे अभंग तुकारामांनी लिहिले, त्याविषयी आहे. इ. स. १९३६ मध्ये प्रभात फिल्म कंपनीच्या विष्णुपंत दामले आणि फत्तेलाल शेख यांनी मराठीत 'संत तुकाराम' नावे चित्रपट बनवला. या चित्रपटाला अपूर्व यश मिळाले होते. भारतातील अनेक भाषांमध्ये संत तुकाराम यांच्यावर चित्रपट काढण्यात आले. तुकोबांचे 'तुकाराम बाबांचे चरित्र' नावाचे मराठीतील

पहिले चरित्र कृष्णाजी अर्जुन केळूसकर यांनी इ. स. १८९६ साली लिहिले चमत्कारांवर भर न देता संत तुकारामांचे थोरपण या पुस्तकात सांगितले आहे.

विसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात हॉलंडमध्ये वास्तव्य असलेल्या चित्रकार, शिल्पकार व कवी भास्कर हांडे यांनी तुकारामांच्या गाथेतील अभंगावरून स्फुरलेल्या चित्रांची, शिल्पांची व मुद्रा चित्रांची मालिका तयार केली आहे. तिला 'तुझे रूप माझे देणे' असे नाव दिले आह. त्या चित्रांची कायमस्वरूपी मांडणी वैश्विक कला पर्यावरण औंध येथे केली आहे. गाथेतील अभंगावर चित्र काढण्याचा हा प्रयोग प्रथमच आहे.

तुकोबांच्या अभंगवाणीने मानवी मनाचा ठाव घेतला आहे. इ. स. १६५० मध्ये त्यांचे निर्वाण झाले. त्यांच्यानंतर त्यांच्या योग्यतेचा व उंचीचा संत भागवत संप्रदायास लाभला नाही. तुकाराम महाराजानंतर या संप्रदायाची धुरा संत निळोबारायांनी उचलली. त्यांनी तुकारामांना आपले गुरू मानून वारकरी संप्रदायाचे काम केले. एक श्रेष्ठ समाजसुधारक, कवी, लोकशिक्षक म्हणून तुकोबांचे कार्य श्रेष्ठ ठरते.

### ३.२.८ वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान आणि वारसा :

**तत्त्वज्ञान :**

भारतातील सर्व भक्तिसंप्रदायांनी हिंदू धर्म आणि हिंदू संस्कृती अभंग राहावी म्हणून फार मोठे सृजनशील योगदान दिले आहे. महाराष्ट्रातील संप्रदाय त्याला अपवाद नाहीत. विशेष करून वारकरी संप्रदायाची परंपरा लक्षणीय आहे. एक अत्यंत प्रतिकूल कालखंडात यवनी आक्रमणाचे जबरदस्त तडाखे या भूमीला बसत असताना वारकरी संप्रदायाने जी कामगिरी केली ती नि:संशयच लक्षणी आहे. अत्यंत प्रतिकूल काळात हिंदू समाजाचे सत्त्व, सांस्कृतिक परंपरा टिकविण्याचे फार मोठे श्रेय वारकरी संप्रदायाकडे जाते. उच्च-नीच हा परंपरागत रूढीवाद मोडून काढून अवघ्या भक्तांना एकाच व्यासपीठावर आणण्याचे अपूर्व कार्य ज्ञानेश्वरादी संतांनी केले. यवनी आक्रमणाच्या काळात मराठी भाषा, मराठी संस्कृती शुद्ध ठेवण्याचे महान कार्य वारकरी संप्रदायाने केले. मराठीचा गौरव वाढविला. भारताचे सांस्कृतिक व भावनिक जीवन उद्ध्वस्त होऊ नये म्हणून या संतांनी वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून शाश्वत जीवनमूल्ये सामान्य माणसातही संक्रमित केली. सामाजिक चौकटीला धक्का न देता प्रस्थापित समाजरचना उद्ध्वस्त न करता वारकरी संतांनी सामान्य माणसाच्या अंतरंगात क्रांती घडविली. वारकरी कोणत्याही जातीपातीचा असला तरी भीमेच्या वाळवंटामध्ये सात्त्विक भावाने नाचणारा हा वारकरी प्रत्यक्ष पांडुरंगलाही आपलेसे करू शकतो, ही वारकरी संप्रदायाची ग्वाही लोकविलक्षण आहे. गृहस्थाश्रम न टाकता, देहदंड न करता, कर्मकांड न आचरता, नामस्मरणाने व संकीर्तनाने पांडुरंगाला जिंकण्याचे सामर्थ्य वारकरी संप्रदायाने आपल्या अनुयायांच्या ठिकाणी निर्माण केले. संप्रदायाची ही कामगिरी अनुपम म्हणावी लागेल.

कोणताही धार्मिक संप्रदाय हा केवळ भावनेवर टिकून राहू शकत नाही तर त्या संप्रदायास शाश्वत, नैतिक, मूल्याधिष्ठित, वैचारिक पाठबळ असावे लागते. भागवत संप्रदायात वैचारिक किंवा तात्त्विक बळ हे ज्ञानेश्वरांनी दिले. ज्ञानेश्वरांपासून तुकाराम महाराजापर्यंतच्या या संप्रदायातील सर्व संतांनी गीता भागवतासारख्या भक्तिमार्गाचा पुरस्कार करणाऱ्या मतांचे, तत्त्वांचे व विचारांचे विवरण केले आहे. म्हणूनच ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी, एकनाथांचे

भागवत व तुकोबांची गाथा ही या संप्रदायाची तत्त्वत्रयी आहे. या संप्रदायाचे दिशादर्शक ग्रंथ आहेत. म्हणूनच सर्व संतांच्या विचारधारेत एकसुत्रता दिसते. भक्तीने नामसाधनेने आत्मा परमात्म्याशी एकरूप होतो, त्यात विलिन होतो. या संप्रदायात धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चार पुरुषार्थांबरोबर भक्तीस पाचवा पुरुषार्थ मानले आहे. ज्ञानदेवाप्रमाणे एकनाथ, तुकाराम यांनीही भक्तीस सर्वश्रेष्ठ स्थान दिले आहे.

संत एकनाथ म्हणतात, ''चहू पुरुषांचे माथा। भक्ती सर्वथा मज पढीयंती॥''

भक्तीसाठी संसाराचा त्याग करणे गरजेचे नाही. तर संसारात राहून भक्तीचा मार्ग स्विकारून परमपदास पोहोचता येते. हे या पंथाने समाजमनावर बिंबविले. या संप्रदायाने कुळधर्म, कुळाचारास व कुलदेवतेस मान्यता दिली. पण क्षुद्र देवदेवतांचा मात्र संतांनी निषेध केला आहे. हिंसा अमान्य करून अहिंसेला मान्यता दिली. स्वधर्मकर्म, समता, सत्य यांचा आग्रह धरला. संयम, दया, क्षमा, शांती, विवेक या गुणांचा पुरस्कार केला. जातिभेदास थारा दिला नाही.

**वारसा :**

'ज्ञानदेवे रचिला पाया' या ओळीचा अर्थ पाहिला तर ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायाचा पाया घातला. याचा अर्थ या संप्रदायाला अध्यात्मनिष्ठ मानवतावादाचे अधिष्ठान त्यांनी प्राप्त करून दिले. तसेच त्यांच्या रूपाने या संप्रदायाला चैतन्याचा एक महास्रोत येऊन मिळाला, असा घेता येईल. वारकरी संप्रदायाला प्रमाणभूत असलेला 'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ सर्वांसाठी मराठी भाषेत त्यांनी लिहिला. अध्यात्मविद्या ही काही मूठभरांची मक्तेदारी नसून सामान्यातला सामान्यही ती आत्मसात करू शकतो, असा आत्मविश्वास त्यांनी पारंपरिक समाजव्यवस्थेच्या तळाशी असलेल्या माणसातही निर्माण केला. ज्ञानेश्वरांची गुरुपरंपरा नाथपंथीय होती. अष्टांगयोग, दलितांच्या उद्धाराची प्रेरणा आणि देशी-मराठी भाषेचा पुरस्कार हा नाथपंथाचा प्रभावशाली वारसा होय. या संस्कारातून त्यांनी स्वत:चा स्वतंत्र जीवनाविषयक दृष्टिकोन निर्माण केला. त्यांचे समकालीन नामदेव हे वारकरी पंथाचे आद्य प्रचारक होते. त्यांनी प्रचारासाठी भारतभरभ्रमंती केल्याने महाराष्ट्राबाहेरही त्यांचा शिष्य परिवार निर्माण झाला. ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायाला तत्त्वज्ञानाचा भक्कम पाया मिळवून दिला. नामदेवांची भूमिका तत्त्वचिंतकाची नसली तरी लडिवाळ लेकराने मातेवर प्रेम करावे, तशी ईश्वरभक्ती करण्याचा आदर्श त्यांनी निर्माण केला. दोन्ही संतांनी बहुजन समाजाच्या आध्यात्मिक आकाक्षांना जागे केले. त्या समाजातील माणसांना आत्माविष्काराची वाट मोकळी करून दिली. विठ्ठलभक्तीने भारलेले विविध जातींचे लोक विठ्ठलभक्तीने भारावलेल्या रचना करू लागले. गोरा कुंभार (१२६७-१३१७), सावतामाळी (१२५०-१२९५) नरहरी सोनार, चोखामेळा, सेना न्हावी इ. संतांची एक मालिकाच उभी राहिली. वेगवेगळ्या व्यवसायातले हे संत होते आणि त्यांनी आपल्या अभंगरचनेसाठी आपआपल्या व्यवसायातील परिभाषा वापरली व आपापल्या व्यवसायांचे संदर्भ दिले.

वारकरी संतांनी चातुवर्ण्याच्या आणि जातिव्यवस्थेच्या चौकटहीविरुद्ध बंड उभारले नाही. तथापि, आध्यात्मिक समता निश्चितपणे प्रस्थापित केली. देवाला सर्व भक्त सारखे, हीच शिकवण दिली. 'विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म, भेदाभेद भ्रम अमंगळ।' या तुकोबांच्या उक्तीमध्ये ही अभेदभावाची भूमिकाच स्पष्ट झालेली आहे. धार्मिक क्षेत्रातील

भेदभाव नष्ट करण्याची भूमिका घेऊन बहुजनसमाजाच्या आध्यात्मिक विकासासाठी संतांनी काम केले. विठ्ठलभक्तीची पार्श्वभूमी पाठिशी असल्यामुळेच एकनाथांच्या हातून वारकरी संप्रदायाच्या संदर्भातही भरीव कामगिरी घडून आली. लोकाभिमुखता हे वारकरी संप्रदायाचे एक फार मोठे वैशिष्ट्य होय. कथा, कविता, भारूडे, अभंग इत्यादी रचनांद्वारे लोकशिक्षण देण्याचे काम संतांनी केले. अनन्य भक्ती व पारमार्थिक समता यांच्या मुशीत भागवत धर्माची परिपूर्ण सुवर्णमुर्ती म्हणजे संत तुकाराम होत, असे लक्ष्मणशास्त्री जोशींनी म्हटले आहे. उत्तम चारित्र्य, धर्मनिष्ण, सदाचार, नीती आणि भूतदया यांचाच वारकरी संप्रदायाच्या आधारधर्मात अंतर्भाव आहे. सर्वसामान्यांशी या पंथाने जिव्हाळ्याचे नाते जोडले. त्यामुळे पंथ लोकप्रिय झाला. या पंथाने तत्त्वचर्चेकडे पाठ फिरविली नाही आणि अंधश्रद्धेवर आघात केले. अज्ञानावर आधारलेल्या उपासनेचा त्यांनी निषेध केला. वारकरी संत श्रोत्यांशी समरस झाले त्यामुळे इतर पंथीयांच्या तुलनेत वारकरी संतसाहित्य लोकांपर्यंत अधिक प्रमाणात पोहचले.

या संप्रदायाच्या अलिकडच्या काळातील थोर सेवेकऱ्यांमध्ये नाना महाराज साखरे, सोनोपंत दांडेकर, भाऊसाहेब काटकर, विष्णुबुवा जोग, केशवराव देशमुख, बंकटस्वामी, बाबामहाराज सातारकर अशा अनेकांचा समावेश होतो. प्रवचने, कीर्तने, ग्रंथप्रकाशन अशा विविध मार्गांनी मोठा वारसा या संतमंडळींनी आपणास दिला आहे.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - २ :**

**(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) भावार्थ रामायण हा ग्रंथ कोणी लिहिला?

२) वेश्या स्त्रीस सदाचाराच्या मार्गास लावणारे संत कोण?

३) संत एकनाथांची कर्मभूमी कोणती?

४) 'रूक्मिणी स्वयंवर' हा ग्रंथ कोणी लिहिला?

५) संत तुकारामांच्या दुसऱ्या पत्नीचे नाव काय?

**(ब) योग्य पर्याय निवडून खालील वाक्य पूर्ण करा.**

१) संत तुकारामांना गुरू मानून कोणी .............. यांनी कार्य केले.
(अ) सावजी (ब) सावतामाळी (क) संत निळोबाराय (ड) संत ज्ञानेश्वर

२) संत तुकारामांचा जन्म .............. येथे झाला.
(अ) देहू (ब) पूणे (क) पंढरपूर (ड) अक्कलकोट

३) जगद्‌गुरू .............. म्हटले जाते.
(अ) चोखामेळा (ब) संत रामदास (क) संत तुकाराम (ड) संत बहिणाबाई

४) देहू .............. नदीकाठी आहे.
(अ) कृष्णा (ब) कोयना (क) वेण्णा (ड) इंद्रायणी

५) संत तुकारामांचे निधन.............. साली झाले.
(अ) इ. स. १६५० (ब) इ. स. १८५० (क) इ. स. १७६२ (ड) इ. स. १८००

## ३.३ सारांश :

वारकरी संप्रदायाला सार्वजनिक रूप देण्याचे कार्य महाराष्ट्रातील संतांनी केले. ही संतांची कामगिरी १२ व्या शतकापासून चालू होती. यज्ञयाग, हव्यकाव्य, विविध व्रते यांचे स्तोम न माजवता केवळ भक्तिमार्गाचा अवलंब करून परमेश्वरी कृपा संपादन करावी अशी शिकवण या संतांच्या माध्यमातून पंढरपूर चळवळीने दिली आहे. वारकरी संप्रदायाला 'नाममार्ग' ही म्हणतात. यामध्ये विठ्ठलाच्या नामस्मरणाला महत्त्व आहे. हा सोपा मार्ग सर्व जातीच्या स्त्री-पुरुषांना खुला होता. संतांनी आपले लिखाण सर्वसामान्य समाजाला आवडेल अशा साध्या-सोप्या मराठी भाषेत केले. आत्तापर्यंत संस्कृत भाषेत बंदिस्त असलेले ज्ञान मराठी भाषेतून खुले केले. अभंग, ओवी, गवळणी, भारूडे, किर्तने यातून अध्यात्माचे तत्त्वज्ञान सर्व संतांनी मांडण्याचा प्रयत्न केला. ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, एकनाथ हे संत केवळ स्वत:च्या ध्यानधारणेत आणि अभ्यास लेखनात गुरफटून राहिले नाहीत. ज्या समाजाचे आपण घटक आहोत त्या समाजाचा प्रामुख्याने त्यांनी विचार केला. आपल्या भोवतीच्या समाजातील सद्‌गुणांचा त्यांनी गौरव केला. तसं दुर्गुणांचा धिक्कार केला. ज्ञानाच्या एकांतिक भूमिकेला भावनेचा ओलावा वारकरी संप्रदायाने प्राप्त करून दिला. तत्त्वज्ञान आणि भक्ती यांचा समन्वय नीतीमूल्यांच्या शाश्वत पायांवर त्यांनी उभा केला. भक्तीचा गाभा नीतीचा असतो असे घोषवाक्य प्रत्येक वारकऱ्यांच्या अंत:करणावर वारकरी संप्रदायाने कोरले. वारकरी संप्रदायाचा अन्वयार्थ लावणारे अनेक ग्रंथ आधुनिक काळात निर्माण झाले. त्या सर्व ग्रंथातून वारकरी संप्रदायाची ऐतिहासिक कामगिरी उत्तम रीतीने विशद केली आहे. ज्ञानेश्वरादी संतांनी महाराष्ट्र भाषेत अजरामर वाङ्मयसंपदा निर्माण करून समाजप्रबोधनाचे उत्कृष्ट कार्य केले आहे. वारकरी संप्रदाय हा मानवी जीवनामध्ये परमेश्वरी प्रेमाची अनुभूती वारंवार घेऊन, जीवन खऱ्या अर्थाने समृद्ध व संपन्न कसे करावे याचा सुलभ राजमार्ग सांगणारा पंथ आहे.

संतांची चरित्रे आणि चारित्र्ये ही नेहमीच अलौकिक आणि अजरामर असतात, चिरंजीव असतात. त्यामुळे पिढ्या पिढ्यांना शतकानुशतके अशी चरित्रे मार्गदर्शन करतात. महाराष्ट्राची आजची जी संस्कृती आपल्याला दिसते तिचा पाया संतांनी घातला. संतसंप्रदायाच्या इतिहासाबरोबर तिची घडण बनत गेली. संत चळवळीची भव्यता ही तिच्या मानण्यात साठविलेली आहे. सारे संत मानवतेच्या पातळीवर उभे होते या संप्रदायाचे अनुयायीही बहुजन समाजातील असून गरीब कुटुंबातील असतात परंतु त्यांची नीतिमत्ता, आदर्श, सदाचारी वर्तणूक बहुसंख्य वारकऱ्यांच्या कर्तव्यातून आणि कर्मातून सहजपणे प्रगट होत असतो. भारताच्या अत्यंत प्रतिकूल कालखंडात वारकरी संप्रदायाने केलेली कामगिरी सर्वार्थाने अतुलनीय आहे.

## ३.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :

१) **वारकरी =** पंढरपूरला नियमित विठ्ठलाच्या दर्शनाला जाणारी व्यक्ती

२) **माळकरी =** गळ्यात तुळशीची माळ धारण करणारी व्यक्ती

३) **ताम्रपट =** तांबच्या पत्र्यावर कोरलेला लेख

४) **अद्वैत =** एकात्म ज्ञानाची अनुभूती होणे

५) **घुमन =** पंजाबमधील गुरुदासपूर जिल्ह्यातील एक गाव.

## ३.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - १ :**

**(अ)**

| | | |
|---|---|---|
| १) वारकरी संप्रदाय | २) वारकरी | ३) माळकरी |
| ४) माळकरी | ५) वारीकर | ६) भक्त पुंडलिक |
| ७) श्री विठ्ठल | ८) चंद्रभागा | ९) रामकृष्णहरी |
| १०) १३ वे शतक | | |

**(ब)**

| | | |
|---|---|---|
| १) संत ज्ञानेश्वर | २) ज्ञानेश्वरी | ३) संत नामदेव |
| ४) संत नामदेव | ५) घुमन | |

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - २ :**

| | | |
|---|---|---|
| १) संत एकनाथ | २) संत एकनाथ | ३) पैठण |
| ४) संत एकनाथ | ५) आवडा/आवली | |

**(ब)**

| | | |
|---|---|---|
| १) संत निळोबाराय | २) देहू | ३) संत तुकाराम |
| ४) इंद्रायणी | ५) इ. स. १६५० | |

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय :

**(अ) लघुत्तरी प्रश्न.**

१) वारकरी संप्रदाय
२) वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान
३) संत ज्ञानेश्वर
४) संत नामदेव
५) संत एकनाथ
६) संत तुकाराम
७) वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान
८) तुकारामांची गाथा

**(ब) दीर्घोत्तरी प्रश्न.**

१) वारकरी संप्रदायाचा उगम व इतिहास याचे स्पष्टिकरण करा.
२) पंढरपूर व श्री विठ्ठल याविषयी थोडक्यात माहिती द्या.
३) संत ज्ञानेश्वरांचे कार्य सांगा.

४) संत नामदेवांचे कार्य थोडक्यात स्पष्ट करा.

५) संत एकनाथांकालीन परिस्थितीचे स्पष्टीकरण करा.

६) संत तुकारामांचे योगदान सांगा.

७) संत तुकरामांचे साहित्याविषयी माहिती द्या.

८) वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान व वारसा याचे स्पष्टीकरण करा.

९) वारकरी / भागवत संप्रदायाचे कार्य स्पष्ट करा.

## ३.७ संदर्भ ग्रंथ :


१) अभ्यंकर शंकर वासुदेव : 'संत तुकाराम', आदित्य प्रतिष्ठान, पुणे.

२) बहिरट भा. प. आणि भालेराव प. ज्ञा. : 'वारकरी संप्रदाय - उदय व विकास', व्हिनस प्रकाशन, पुणे.

३) अभ्यंकर शंकर वासुदेव : 'संत एकनाथांचा भक्तियोग', आदित्य प्रकाशन, पुणे.

४) दांडेकर शं. वा. : 'वारकरी पंथांचा इतिहास', प्रकाशक शं. वां. दांडेकर, आळंदी, पुणे.

५) सुंठणकर बा. र. : 'महाराष्ट्रीय संत मंडळांचे ऐतिहासिक कार्य', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

६) प्रभाकर पाठक : 'संत नामदेवांची वाणी, अमृताची खाणी', अभिनंदन प्रकाशन, कोल्हापूर.

७) नसिराबादकर ल. रा. : 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास', फडके प्रकाशन, कोल्हापूर.

८) संत नामदेव : सात - व्याख्याने - संत नामदेव जन्मसप्तशताब्दि, व्याख्यानमाला १९७१, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

९) शंकरराव खरात : 'संतांची सामाजिक दृष्टी', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे.

१०) शंकर वासुदेव अभ्यंकर : 'वारकरी संप्रदाय', आदित्य प्रकाशन, पुणे.


❑❑❑

## घटक ४

# शीख धर्म


४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

४.२.१ स्वरूप आणि रचना

४.२.२ शीख धर्म पंथातील गुरू

४.२.३ तत्त्वज्ञान आणि वारसा

४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

४.४ स्वयं-अध्ययन प्रश्न आणि उत्तरे

४.५ सारांश

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ संदर्भ ग्रंथ


## ३.० उद्दिष्ट्ये :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणाला खालील गोष्टी कळू शकतील.

- शीख धर्माच्या उदयाची माहिती सांगता येईल.
- शीख धर्माची शिकवणूक सांगता येईल.
- शीख धर्माचे तत्त्वज्ञान स्पष्ट करता येईल.
- गुरु नानकांचा उपदेश समजेल.

- 'ग्रंथसाहेब' या शीख धर्मग्रंथाची माहिती समजेल.
- शीख गुरूंचे कार्य समजेल.
- शीखांची धर्मपीठे सांगता येतील.
- शीखांचे उत्सव दिन सांगता येतील.
- शीख धर्माची आचारसंहिता समजेल.

## ४.१ प्रास्ताविक :

गुरु नानकांनी शीख धर्माची स्थापना केली. त्यांच्या विचारांचे संकलन 'ग्रंथसाहेब' या पवित्र धर्मग्रंथात करण्यात आले आहे. शीख पंथामध्ये गुरु नानकांपासून ते गुरु गोविंदसिंगापर्यंत १० गुरू झाले. शीख धर्माने समतेवर भर दिला. मूर्तिपूजा व कर्मकांडास फाटा दिला. जातीयता व अस्पृश्यतेवर हल्ले चढविले. गुरु अंगद, गुरु अमरदास, गुरु रामदास, गुरु तेगबहादूर यांनी शीख धर्मप्रसारावर भर दिला तर गुरु अर्जुन, गुरु हरगोविंद व गुरु गोविंदसिंग यांनी क्षात्रधर्मावर भर दिला.

शीख धर्म पंथामध्ये एकूण १० गुरू झाले. पहिले गुरु, गुरुनानक होत तर १० वे गुरु, गुरु गोविंदसिंग होत. यानंतर गुरुंची परंपरा थांबली याचे कारण गुरु गोविंदसिंगानी घोषणा केली की, ''यापुढे गुरु होणार नाही. शिख धर्मियांनी गुरु ग्रंथसाहेबास शरण जावे व त्याप्रमाणे वागावे.'' गुरुंच्या कार्यामुळे शीख धर्माला तत्त्वज्ञानाची बैठक प्राप्त झाली. शीख धर्माचा प्रसार झाला.

शीख धर्माचे तत्त्वज्ञान 'ग्रंथसाहेब' या पवित्र धर्मग्रंथात पहावयास मिळते. शीख धर्म सांगतो, सृष्टीचा निर्माता ईश्वर आहे. नि:स्वार्थ भावनेने व नित्य-नियमाने ईश्वराचे स्मरण करावे, गुरुद्वारामध्ये नित्य-नियमाने जावे, स्त्री हा मानवसृष्टीचा मूलाधार आहे तर मानवधर्म हा ईश्वरी शिकवणुकीचा पाया आहे. शीख धर्माची आचारसंहिताही सर्वसमावेशक असल्याचे दिसते.

## ४.२ विषय-विवेचन :

### ४.२.१ स्वरूप आणि रचना :

**गुरु नानक व शीख धर्माची स्थापना :** गुरु नानकांनी शीख धर्माची स्थापना केली. 'शीख' या शब्दाचा अर्थ शिष्य असा घेण्यात येतो. गुरु नानकांच्या अनुयायांना शिष्य म्हणजेच 'शीख' असे संबोधले जाते. गुरु नानक भारतभर फिरले. अनेक तीर्थस्थळांना भेटी दिल्या. ते मक्केलाही जाऊन आले. गुरु नानकांनी आपल्या भ्रमंतीनंतर गुरुदासपूर जिल्ह्यातील करतारपूर येथे आपे जीवन घालविले. साध्या, सरळ व त्यागमय जीवनावर त्यांचा भर होता.

गुरु नानकांनी आपल्या शिष्यांना जो उपदेश केला. तो ग्रंथरुपाच्या माध्यमातून संग्रहित करण्यात आला. या पवित्र ग्रंथास 'ग्रंथसाहेब' (आदिग्रंथ) असे संबोधले जाते. शिखांचा हा धर्मग्रंथ असून गुरुद्वारामध्ये त्याचे पठन केले जाते. शिखांचे दहावे गुरु गुरु गोविदसिंग यांच्या आदेशानुसार त्यांच्या पश्चात शीख धर्मीय 'ग्रंथसाहेबास' गुरु मानून या पवित्र धर्मग्रंथाचे पठण करतात.

**अमृतसरची उभारणी :** अमृतसर हा शिखांचा प्रमुख गुरुद्वारा होय. शिखांचे चौथे गुरु रामदास यांनी तलाव खोदण्याचे व शहर उभारणीचे काम हाती घेतले. व्यापारपेठ वसविली. खोदण्यात येणाऱ्या सरोवराला गुरु रामदासांनी नाव दिले 'अमृतसर'. या नावावरुनच या शहराला अमृतसर हे नाव मिळाले. सरोवराचे खोदकाम पाचवे गुरु गुरु अर्जुनसिंगांच्या काळात पूर्णत्वास गेले. या सरोवराच्या मध्यभागी सुवर्णमंदिर उभारण्यात आले. शिखांचा धर्मग्रंथ 'ग्रंथसाहेब' सुवर्णमंदिरात ठेवण्यात आला आहे.

**शीख धर्माचा प्रसार :** गुरु नानकांनी स्थापन केलेल्या शीख धर्माच्या प्रसाराचे कार्य शीख धर्मगुरुंनी केले. त्यांनी पंजाब व भारताच्या पश्चिम भागात धर्मप्रसाराचे काम केले. गुरु अंगद यांनी गुरु नानकांचे जीवन व कार्य लोकांना समजण्यासाठी आपला शिष्य बाला यांस गुरु नानकांचे चरित्र लिहण्याची आज्ञा केली. गुरु अंगदांनी 'गुरुमुखी' सर्वसामान्यापर्यंत पोहचविली.

गुरु अमरदासांनी शीख संप्रदाय संघटीत होण्यासाठी २२ विभागाची रचना केली. विवाहप्रसंगी गुरुवाणीतील वचने वाचली पाहिजेत असा आदेश काढला. त्यांच्या कालखंडात कनिष्ठ वर्गातील लोक मोठ्या प्रमाणात शीख धर्मात समाविष्ठ झाले. शीख धर्माचे सातवे गुरु गुरु हरिराय यांनी धर्मप्रसाराच्या कार्याला प्राधान्य दिले. देशभर शीख धर्मप्रसारासाठी ३६० गाद्या म्हणजे धर्मकेंद्रे सुरू केली. शीख धर्मप्रसारासाठी त्यांनी देशभर धर्मप्रसारक पाठविले. गुरु तेजबहादूर यांनी धर्मप्रसारासाठी तीर्थयात्रा सुरु केली.

**शीख आणि क्षात्रधर्म :** गुरु अर्जुन यांनी शीख समाज संघटीत केला. त्यांनी शिखांना क्षात्र धर्माची दीक्षा देऊन त्यांच्यामध्ये राष्ट्रप्रेम वृद्धींगत केले. गुरु हरगोविंद यांनी राजकीय सत्ता आपल्या हाती घेण्यासाठी सैन्य उभारले, स्वत:चे घोडदळ निर्माण केले. ते म्हणतात, ''ज्याचे शस्त्र त्याचे राज्य, ज्याचे शस्त्र त्याचा धर्म.''

मुघल व शीख यांच्यातील संघर्षात गुरु तेजबहादूर पकडले गेले. औरंगजेबाने त्यांना ठार केले. वडिलांच्या हत्येचा सूड घेण्याचे गुरु गोविंदसिंगानी ठरविले. त्यांनी शिखांचे संघटन करून त्यांच्यातील क्षात्रधर्म जागा केला. त्यांनी शीख पंथीयांची खालसा संघटना स्थापन केली. खालसा पंथ म्हणजे पवित्र, स्वतंत्र, तत्त्वनिष्ठ व लढाऊ असा पंथ होय. या पंथाने ५'क' वापरण्यास सुरवात केली. यामध्ये The Five 'Ks' - Kes - Longhair, Kanga - a - comp, Kripan - a - sword, Kacch - Shorts, Kara - Steel bracelet यांचा समावेश होतो.

गुरु गोविंदसिंगांच्या लष्करी धोरणामुळे औरंगजेब संतापला. कारण पहाडी मुलखातून मुघलांना मिळणारा महसूल बंद झाला होता. औरंगजेबाने लाहोरच्या सुभेदारावर गुरु गोविंदसिंगांच्या बंदोबस्ताची जबाबदारी सोपविली. मुघलांनी आनंदपूरवर आक्रमण केले पण गुरु गोविंदसिंगांनी त्यांचा पराभव केला यानंतर गुरु गोविंदसिंगांनी लोहगड, फत्तेगड, फुलगड व आनंदगड असे मजबूत किल्ले बांधून आपला प्रदेश सुरक्षित केला.

**खालसा पंथातील पंचप्यारे :**

गुरु गोविंदसिंगांनी खालसा ही लढाऊ संघटना स्थापन केली. शिखांच्यामधील क्षात्रतेजाला चेतावणी दिली. शिखांच्यातील क्षात्रतेजाची व धर्मप्रेमाची परीक्षा घेण्याचे त्यांनी ठरविले. त्यांनी आनंदपूर येथे सन १६६६ मध्ये ८० हजार लोकांच्या उपस्थितीत नाट्यपूर्ण रीतीने म्यानातून तलवार काढली व आपल्या शीख बांधवांना प्रश्न केला,

''धर्मासाठी प्राण देण्यास कोण तयार आहे?'' सर्वप्रथम लाहोरच्या दयारामने तयारी दर्शविली. तो स्टेजवर येताच गुरु गोविंदसिंगांनी त्यास स्टेजमागील तंबूत नेले. बकऱ्यावर तलवार मारली व स्टेजवर येऊन रक्ताने माखलेली तलवार लोकांना दाखविली. याचप्रमाणे जगन्नाथ, धरमचंद, सोहबचंद व हिंमतराय यांचीही परीक्षा घेतली. शीख धर्मासाठी बलिदान देण्यास तयार झालेल्या या पाच शूर वीरांना शीख धर्मामध्ये पंचप्यारे म्हणून ओळखले जाते. हे पाच शुर वीर अनुक्रमे खत्री, जाट, परीट, न्हावी व कहार अशा पाच जातीचे होत. गुरु गोविंदसिंगांनी या पाच शूर वीरांना अमृतदीक्षा दिली.

**शिखांची धार्मिक केंद्रे :**

**अमृतसर :** शिखांचा प्रमुख गुरुद्वारा अमृतसर येथे आहे. गुरु रामदासांनी शहर उभारणीचे, बाजारपेठ वसविण्याचे काम सुरू केले. त्याचबरोबर एक प्रचंड तलाव खोदण्याचे काम सुरु केले. या तलावाला अमृतसर असे नाव दिले. यावरुनच शहराला अमृतसर असे नाव मिळाले. या सरोवराचे काम गुरु अर्जुनसिंगाच्या काळात पूर्णत्वास गेले. तलावाच्या मध्यभागी सुवर्णमंदिराची उभारणी करण्यात आली. सुवर्णमंदिरात शिखांचा पवित्र धर्मग्रंथ 'ग्रंथसाहेब' ठेवण्यात आला आहे.

**पाटणा :** शिखांचे दहावे गुरु गुरु गोविंदसिंग यांचे पाटणा हे जन्मस्थळ होय. शीख धर्मासाठीच्या गुरु गोविंदसिंगांच्या योगदानामुळे त्यांचे जन्मस्थळ असणारा येथील गुरुद्वारा महत्त्वाचा समजला जातो.

**आनंदपूर :** गुरु गोविंदसिंगांचे वडिल गुरु तेजबहादूर मुघल-शीख संघर्षात ठार झाले. याचा त्यांनी बदला घ्यायचे ठरविले. त्यांनी शिखांचे संघटन केले. आनंदपूर येथे लढाऊ खालसा पंथाची स्थापना केली. आनंदपूर येथेच त्यांनी वास्तव्य केले. इ. स. १६६६ मध्ये आनंदपूर येथेच खालसा पंथातील पंचप्यारे यांची परीक्षा घेतली. त्यामुळे येथील गुरुद्वारा महत्त्वपूर्ण आहे.

**नांदेड :** महाराष्ट्रातील नांदेड येथे गुरु गोविंदसिंगांची समाधी आहे. त्यामुळे शीख पंथीयांचे दक्षिणेकडील प्रमुख केंद्र म्हणून नांदेड प्रसिद्धीस आले आहे.

**इतर धार्मिक केंद्रे :**

**लाहोर :** गुरु गोविंदसिंग यांच्या कसोटीत उतरलेला पंचप्यारे मधील पहिला शिष्य 'दयाराम' याचे लाहोर हे जन्मस्थळ होय.

**दिल्ली :** शिखांचे नववे गुरू तेजबहादूर यांची औरंगजेबाने दिल्ली येथे हत्या केली. त्यामुळे येथील गुरुद्वारा महत्त्वपूर्ण आहे.

**द्वारका :** द्वारका येथे मोहनचंद याने गुरू गोविंदसिंगांच्या आज्ञेनुसार आत्मबलिदान दिले. त्यांच्या स्मरणार्थ याठिकाणी भव्य गुरुद्वारा बांधण्यात आला आहे.

**जगन्नाथपुरी :** गुरू गोविंदसिंगांच्या कसोटीस उतरलेला पंचप्यारे मधील हिंमतराय हा जगन्नाथपुरीचा असल्याने येथील गुरुद्वारा महत्त्वाचा मानला जातो.

**बिदर :** गुरू गोविंदसिंगांच्या कसोटीस उतरलेला पंचप्यारे पैकी जगन्नाथ हा बिदरचा असल्याने येथील गुरुद्वारा महत्त्वाचा मानला जातो.

**शिखांचा गुरुद्वारा :**

शिखांचा गुरुद्वारा म्हणजे त्यांचे प्रार्थना मंदिर होय. शीख गुरुद्वारामध्ये देवमूर्ती असत नाही. तर येथे गुरू नानकांचे विचार, शीख गुरूंचे विचार संग्रहित केलेला शिखांचा पवित्र धर्मग्रंथ 'ग्रंथसाहेब' कमी उंचीच्या चौरंगावर स्थानापन्न केला जातो. 'ग्रंथसाहेब' भरतकाम केलेल्या रेशमी रुमालात ठेवण्यात येतो. रोज सकाळी आदरपूर्वक 'ग्रंथसाहेब' रेशमी रुमालामधून उघडण्यात येतो. स्त्री-पुरुष 'ग्रंथसाहेबाचे' वाचन करतात. संध्याकाळी पुन्हा गुरूग्रंथ रेशमी रुमालात ठेवण्यात येतो.

गुरूद्वारामध्ये पहाटे पाचपासून प्रात:कालीन पाठ सुरू होतात. शीख धर्मिय जपुजी, सुखमनी, आसादीवार, जाप व आनंद हे नित्याचे पाठ म्हणतात. या पाठानंतर उपासनेसाठी आलेले लोक उभे राहून गुरू अर्जुनसिंग यांच्या सुखमनीतील प्रार्थना म्हणतात. आणि शेवटी दहा गुरू, चार राजपुत्र, पंचप्यारे व चाळीस हुतात्मे यांचे स्मरण केले जाते. येथे प्रार्थना समाप्त होते. प्रार्थनेनंतर प्रसाद म्हणून सर्वांना गोड शिऱ्याचा प्रसाद वाटण्यात येतो. संध्याकाळी व रात्रीही पाठ, प्रार्थना होतात. शीख धर्मीय गुरू गोविंदसिंगानी सांगितलेल्या ५'क्ष' चा काटाक्षाने वापर करतात. गुरुद्वारामध्ये जाताना हात-पाय धुवून जावे लागते. पुरुष उघड्या डोक्याने न जाता पगडी, फेटा वा हातरुमालाचा वापर करतात तर स्त्रिया डोक्यावर पदर घेऊन गुरुद्वारामध्ये प्रवेश करतात.

**स्वयंअध्ययन प्रश्न १ :**

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१) शिखांचा प्रमुख गुरुद्वारा ................ येथे आहे.

(अ) अमृतसर (ब) पाटणा
(क) नांदेड (ड) आनंदपूर

२) शिखांचा प्रमुख गुरुद्वारा अमृतसरच्या उभारणीस ................ नी प्रारंभ केला.

(अ) गरू अमरदास (ब) गुरू अर्जुनसिंग
(क) गुरू हरगोविंद (ड) गुरू रामदास

३) खोदण्यात येणाऱ्या सरोवराला ................ यांनी अमृतसर असे नाव दिले.

(अ) गुरू अमरदास (ब) गुरू रामदास
(क) गुरू अर्जुनसिंग (ड) गुरू हरगोविंद

४) ज्याचे शस्त्र त्याचे राज्य, ज्याचे शस्त्र त्याचा धर्म हा सिद्धांत ................ नी मांडला.

(अ) गुरू रामदास (ब) गुरू हरिराय
(क) गुरू हरगोविंद (ड) गुरू तेजबहादूर

५) गुरू गोविंदसिंगानी पंचप्यारेंची परीक्षा ................ येथे घेतली.

(अ) पाटणा (ब) दिल्ली

(क) आनंदपूर (ड) अमृतसर

**(ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) शिख धर्माची स्थापना कोणी केली?

२) शिखांच्या धर्मग्रंथाचे नाव काय?

३) 'अमतसर' सरोवराचे खोदकाम कोणाच्या काळात पूर्णत्त्वास गेले?

४) शिख पंथातील पंचप्यारेंची नावे सांगा.

५) शिखांच्या प्रमुख धार्मिक केंद्राची नावे सांगा.

## ४.२.२ शीख धर्म पंथातील गुरू :

गुरू नानकांपासून ते गुरू गोविंदसिंगापर्यंत शीख धर्म पंथामध्ये दहा गुरू झाले. शीख धर्मगुरूंनी पंजाब व भारताच्या पश्चिम व उत्तर भागात शीख धर्मप्रसाराचे कार्य केले. शीख समाज संघटीत केला. त्यांच्यातील क्षात्र धर्म जागा केला. ईश्वराचे खरे स्वरूप समजावून सांगितले. शीख पंथातील दहा गुरू व त्यांचा कालखंड पुढीलप्रमाणे -

१. गुरू नानक (इ. स.१४६९ ते १५३९)

२. गुरू अंगद (इ. स. १५३९ ते १५५२)

३. गुरू अमरदास (इ. स. १५५२ ते १५७४)

४. गुरू रामदास (इ. स. १५७४ ते १५८१)

५. गुरू अर्जुनसिंग (इ. स. १५८१ ते १६०६)

६. गुरू हरगोविंद (इ. स. १६०६ ते १६४५)

७. गुरू हरिराय (इ. स. १६४५ ते १६६१)

८. गुरू हरिकिशन (इ. स. १६६१ ते १६६४)

९. गुरू तेजबहादूर (इ. स. १६६४ ते १६७५)

१०. गुरू गोविंदसिंग (इ. स. १६७५ ते १७०८)

**१. गुरू नानक :** गुरू नानक यांचा जन्म दिनांक २६ नोव्हेंबर, १४६९ रोजी पंजाबमधील गुजरानवाला जिल्ह्यातील तलवंडी येथे खत्री परिवारात झाला. गुरू नानक संसारी जीवनात रमले नाहीत. ते देशभर फिरले. नेक धर्मियांच्या तीर्थस्थळांना त्यांनी भेटी दिल्या. लोकांच्या भक्तीमधील एक-सारखेपणा गुरू नानकांच्या ध्यानी आला. गुरू नानकांनी आपल्या भ्रमंतीनंतर पंजाबमधील गुरुदासपूर जिल्ह्यातील करतारपूर येथे आपले जीवन व्यतीत केले. करतारपूर येथेच इ. स. १५३९ मध्ये गुरू नानकांचे निधन झाले.

गुरू नानकांनी शीख संप्रदायाची स्थापना केली. साध्या, सरळ व त्यागमय जीवनावर त्यांचा भर होता. संसारी सुखात राहूनही मोक्ष मिळविता येतो असे त्यांनी प्रतिपादन केले. 'स्त्री हा मानवसृष्टीचा मूलाधार आहे' हा महान संदेश त्यांनीच दिला. ते म्हणतात, सर्व मानव समान आहेत. समतेवर त्यांचा भर होता. जातीयता व अस्पृश्यता म्हणजे समाजव्यवस्थेला लागलेली किड आहे. ती नष्ट करण्यावर त्यांनी भर दिला. हिंदू व मुस्लीम धर्मियांना एकत्र आणून त्यातून नवा समाज उभा करणे हे गुरू नानकांचे ध्येय होते.

गुरू नानकांनी आपल्या शिष्यांना जो उपदेश केला तो ग्रंथरूपात संग्रहित करण्यात आला. या ग्रंथास आदिग्रंथ तथा 'ग्रंथसाहेब' असे संबोधले जाते. शिखांचा हा पवित्र धर्मग्रंथ होय. गुरूद्वारामध्ये 'ग्रंथसाहेबाचे' पठण केले जाते. शिखांचे दहावे गुरू गुरू गोविंदसिंग यांच्या आदेशानुसार त्यांच्या पश्चात गुरू होणार नाही. यापुढे 'ग्रंथसाहेब' या धर्मग्रंथास गुरू माणण्यात यावे शीख धर्मीय 'ग्रंथसाहेबास' गुरू मानून त्याचे पठण करतात.

**२. गुरू अंगद :** गुरू अंगद हे गुरू नानकांचे शिष्य होत. त्यांनी गुरू नानकांचा विश्वास संपादन केला. गुरू नानकांनी आपल्या पश्चात अंगदाची गुरूपदी निवड केली. गुरू अंगद गुरू नानकांच्या सहवासात येण्यापूर्वी माता दुर्गेचे भक्त व उपासक होते. गुरू नानकांनी शीख धर्माची सर्व धुरा त्यांच्यावर सोपविली. गुरू अंगद यांनी परिश्रमपूर्वक 'गुरुमुखी' सर्वसामान्यांपर्यंत पोहचविली. गुरू अंगदांनी आपला शिष्य बाला यांस गुरू नानकांचे चरित्र लिहण्याची आज्ञा केली. शीख पंथीयांनी वेदविद्यज्ञा व ब्राह्मण वर्गाचे वर्चस्व अमान्य केले होते. गुरू अंगदांनी यांवर भर दिलाच, त्याचबरोबर त्यांनी उदासी पंथाच्या लोकांनाही शीख पंथातून बाहेर काढले. गुरू नानकांच्या थोरल्या मुलाचाही यामध्ये समावेश होता. थोडक्यात अत्यंत परिश्रमपूर्वक गुरू अंगदांनी शीख धर्मप्रसार केला. गुरू अंगद यांच्याबाबत असे म्हटले जाते की, गुरू नानकांनी अंगद यांची गुरुपदी नियुक्ती केली नसती तर शीख धर्मपंथ गुरु नानकांच्या पश्चात संपुष्टात आला असता.

**३. गुरू अमरदास :** गुरू अंगदानंतर गुरुपदी गुरू अमरदास आले. सुरवातीस ते वैष्णवपंथी होते. पुढे त्यांनी शीख संप्रदायाचा प्रचार व प्रसारास वाहून घेतले. गुरुपदी आल्यानंतर अमरदासांनी शीख संप्रदाय संघटीत करण्यासाठी २२ विभागाची निर्मिती केली. या विभागांना 'मंजी' असे संबोधले जो. गुरू अमरदासांच्या कालखंडातच कनिष्ठ वर्गातील लोक शीख संप्रदायामध्ये समाविष्ठ झाले. तर वरिष्ठ वर्गाचा शीख संप्रदायास असणारा विरोध मावळला. समाजातील श्रेष्ठ-कनिष्ठ अशी भेदभावाची दरी कमी करण्याच्या त्यांच्या प्रयत्नांना यश आले. विवाहप्रसंगी गुरुवाणीतील शब्द वाचले पाहिजेत, असा आदेश त्यांनी काढला. गुरू अमरदासांचे धार्मिक व सामाजिक कार्य पाहून सम्राट अकबराने त्यांना मोठी जमीन देऊ केली होती पण गुरू अमरदासांनी ती नम्रपणे नाकारली. मात्र यामुळे शीख धर्म व गुरू अमरदास यांची प्रतिष्ठा वाढली.

**४. गुरू रामदास :** गुरू अमरदासांनी आपल्या मुलाऐवजी जावयाची गुरुपदी निवड केली. शीख धर्मियांचे प्रमुख धार्मिक केंद्र असणाऱ्या अमृतसरच्या उभारणीस गुरू रामदासांनी सुरवात केली. त्यांनी व्यापारपेठ वसविली. व्यापाराच्या भरभराटीसाठी जवळजवळ ५२ व्यवसायांच्या लोकांना त्यांनी अमृतसरला आणले. त्यांनी शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी मोठे सरोवर खोदण्याच्या कामास सुरवात केली. या सरोवराला त्यांनी 'अमृतसर' असे नामाभिदान

दिले. यावरूनच या शहराला अमृतसर असे नाव प्राप्त झाले. पुढे या सरोवराच्या मध्यभागी सुवर्णमंदिराची उभारणी करण्यात आली.

**५. गुरू अर्जुनसिंग :** सन १५८१ मध्ये गुरू अर्जुनसिंग गुरुपदी आले. त्यांच्याच कालखंडामध्ये 'ग्रंथसाहेब' या शिखांच्या धर्मग्रंथाची रचना पूर्णत्वास गेली. शीख समाज संघटीत करण्यावर त्यांनी भर दिला. त्यात त्यांना यश आले. प्रत्येक शिखाने एक विशिष्ठ अशी रक्कम गुरुदक्षिणा म्हणून गुरुंना दिली पाहिजे असा त्यांनी दंडक घातला. अवतार कल्पना, तीर्थयात्रा, कर्मकांड यांस त्यांनी फाटा दिला. गुरू अर्जुनसिंगांच्या काळातच शिखांनी वेदांचे वर्चस्व नाकारले. गुरू अर्जुनसिंगांचा राष्ट्रीयत्वावर भर असल्याने त्यांनी शिखांना क्षात्र धर्माची दीक्षा दिली. शिखांच्यामध्ये अस्मिता जागी झाल्याने त्यांनी मुघलांच्या जुलूमशाहीविरुद्ध आवाज उठविला. शहजादा खुस्त्रो याने आपले वडिल जहांगिरच्या विरोधात बंड पुकारले. शहाजादा खुस्त्रो याचे बंड यशस्वी करण्यासाठी गुरू अर्जुनसिंगांनी त्यास सर्वतोपरी मदत केली. परिणामता संतापलेल्या जहांगिरने गुरू अर्जुनसिंगांना ठार केले.

**६. गुरू हरगोविंद :** इ. स. १६०६ मध्ये गुरू हरगोविंद गुरूपदी आले. गुरू अर्जुनसिंगांनी शिखांना क्षात्र धर्माची दिक्षा दिली होती. गुरू हरगोविंदांनी शिखांच्यात संघटन करण्याचे काम, सैन्य उभारणीचे काम, घोडदळ निर्माण करण्याचे कार्य सुरू केले. राजकीय सत्ता आपल्या हाती घेण्यासाठी प्रयत्न सुरू केले. 'ज्याचे शस्त्र त्याचे राज्य, ज्याचे शस्त्र त्याचा धर्म' असा महत्त्वपूर्ण सिद्धांत गुरू हरगोविंदांनी मांडला. शिखांना संघटीतपणाचे महत्त्व पटवून सांगताना ते म्हणतात, 'आपण जर एक असू तर मुघल सत्तेचा पाडाव करणे आपणास अशक्य नाही. गुरू हरगोविंदांनी समाजातील जातीभेद नष्ट करत सर्वांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. मूर्तिपूजा अमान्य केली. कर्मकांडाविरुद्ध धोरण आखले. संसार व परमार्थ या दोहोंचा समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. गुरू हरगोविंदांच्या धोरणात्मक निर्णयामुळे शीख समाज लष्करी व राजकीय दृष्ट्या जागृत झाला.

**७. गुरू हरिराय :** गुरू हरगोविंद यांनी आपल्या अवघ्या १४ वर्षे वयाच्या नातवाची गुरुपदी नियुक्ती केली. गुरू हरगोविंद म्हणजे आपल्या आजोबांच्या सल्ल्यानुसार गुरू हरिराय यांनी प्रचंड घोडदळाची निर्मिती केली. मात्र गुरू हरिराय वृत्तीने शांत असल्याने लष्करी युद्ध मोहिमामध्ये त्यांना रस नव्हता. त्यांनी लष्करी कामगिरीपेक्षा धर्मप्रसाराच्या कार्यावर भर दिला. त्यांनी मीर, बैरागी, भगत इत्यादींना शीख धर्मामध्ये समाविष्ठ केले. गुरू हरिराय यांनी कीरतपूरहून धर्मप्रसाराचे कार्य चालविले. भारतभर शीख धर्माच्या प्रसारासाठी ३६० गाद्या म्हणजे धर्मकेंद्रे निर्माण केली. या धर्मकेंद्राच्या, अडी-अडचणी सोडविण्यासाठी, धर्मकेंद्राला मदत करण्यासाठी त्यांनी बक्षिसी नावाची एक संस्था निर्माण केली. शीख धर्माचा देशभर प्रसार व्हावा यासाठी त्यांनी धर्मप्रसारक पाठविले. शीख धर्म प्रसारासाठी भाई सेंगतीचा यांस दुआबात तर भाई गौंडा यांस काबूलला पाठविले. त्यांच्या धर्मप्रसाराच्या कार्यामुळे शीख धर्म सर्वदूर पोहचण्यास मदत झाली.

**८. गुरू हरिकिशन :** इ. स. १६६१ मध्ये गुरू हरिकिशन गुरुपदी आले. त्यांना अवघा तीन वर्षाचा कालावधी मिळाला. त्यांनी आपल्या अल्प कालखंडातही धर्मप्रसाराचे मोठे काम केले. शीख धर्म संघटना महत्त्वाची असल्याचे लोकांना पटवून दिले. आपल्या शांत सौजन्यशील वृत्तीने लोकांना आपलेसे केले. गुरू हरिकिशन यांनी असे भाकीत

केले की, बंकाला नावाच्या खेड्यातील कोणी एक माणूस शीख धर्म प्रज्वलीत करील त्यांचे भाकीत पुढे खरेही ठरले. असे म्हटले जाते की ते आपल्या शिष्यांसह औरंगजेबाच्या भेटीसाठी गेले होते मात्र इतिहासात याबाबत मतभेद आहेत.

**९. गुरू तेजबहादूर :** गुरू हरगोविंदांचे पुत्र गुरू तेजबहादूर इ. स. १६६४ मध्ये गुरुपदी आले. यावेळी शीख समाज अस्थिरतेने ग्रासला होता. अधिकारी भ्रष्ट झाले होते. गुरू अर्जुनसिंगांच्या कालखंडापासून प्रत्येक शिखाकडून गुरू दक्षिणा जमा करण्यासाठी ठिकठिकाणी 'मसंद' नावाचे अधिकारी नेमले होते. मात्र असे जबाबदार अधिकारीही अत्यंत स्वार्थी झाले होते. शीख समाजाला फुटीरतेची लागण झाली होती. गुरू तेजबहादूरांच्या नातेवाईकांनीही त्यांच्याविरुद्ध बंड पुकारले होते. एवढेच काय त्यांचा भाऊही मुघलांना सामील झाला होता.

वरील सर्व अडचणींवर मात करण्यासाठी त्यांनी लष्कराची उभारणी केली. स्वत:ची नाणी तयार केली. शीख धर्मास आलेली मरगळ झटकण्यासाठी तीर्थयात्रा सुरू केली. धर्मप्रसारावर भर दिला. मुघल सत्ताधिशांकडून होणारे सक्तीचे धर्मांतर, शिखांवर होणारे अन्याय या विरोधात ते उभे ठाकले. मुघलांच्या विरोधात शस्त्रसज्ज लष्कराची जमावाजमव केली. गुरू तेजबहादूर म्हणतात, ''चारही वर्णियांच्या माणसांना आपण सिंह बनवून मुघलांना नष्ट करू'' मुघल-शीख यांच्यात झालेल्या संघर्षात ते बादशहा औरंगजेबाकडून पकडले गेले. औरंगजेबाने गुरू तेजबहादूर यांना ठार मारले. यामुळे शीख व मुस्लीम यांच्यात शत्रुत्वाची भावना वाढीस आगली.

**१० गुरू गोविंदसिंग :** गुरू गोविंदसिंग हे गुरू तेजबहादूरांचे पुत्र होत. शीख पंथातील ते दहावे व शेवटचे गुरू होत. गुरू गोविंदसिंगांचे वडिल औरंगजेबाकडून मारले गेले. याचा सुड घेण्याचे त्यांनी ठरविले. शिख धर्मियांचे संघटन केले. प्रचंड लष्करवाढ केली. शीख धर्मियांना त्यांच्या क्षात्रधर्माची आठवण करून दिली. राजस्थानमधील भेटावयास आलेल्या एका शिष्टमंडळाला परखडपणे सुनावताना गुरू गोविंदसिंग म्हणतात की, ''तुम्ही आपल्या मुली मुघलांना देऊन त्यांची सेवा करता, त्यामुळे तुमचे धन व तुमच्या कन्या यावर आपला अधिकारच आहे. असे तुर्क समजतात व ते तुम्ही मान्य करता? तुमच्यात काही क्षात्रतेज उरले नाही काय? तुर्कांनी चालविलेल्या या घोर अन्यायाचा प्रतिकार करण्याऐवजी तुम्ही कसल्या धर्मा-अधर्माच्या क्षुत्र गोष्टी घेऊन बसला आहात. आम्ही मात्र तुर्कांनी चालविलेल्या अन्यायाचा प्रतिकार करण्याचे ठरविले आहे. त्यास तुम्ही मदत करावी.''

गुरू गोविंदसिंगांनी शीख पंथीयांमधील क्षात्रधर्म जागता राहावा यासाठी शीख पंथीयांची खालसा संघटना स्थापन केली. खालसा पंथ म्हणजे पवित्र, स्वतंत्र, तत्त्वनिष्ठ व अत्यंत लढाऊ असा पंथ होय. या पंथाने ५'क्ष' वापरण्यास सुरवात केली. यामध्ये The Five 'Ks' - kes - Longhair, kanga - a - comb, Karpan - a - sword, kacch - shorts, kara - steef breacelet यांचा समावेश होतो.

गुरू गोविंदसिंगांच्या लढाऊ बाण्यामुळे व आक्रमक लष्करी धोरणामुळे बिथरलेले रजपूत राजेच त्यांच्यावर चाल करून आले. परंतु त्यांना पराभवाचा सामना करावा लागला. गुरू गोविंदसिंगांनी अनेक पहाडी सत्ताधिशांना आपल्या बाजूस वळविले. गुरू गोविंदसिंगांनी आपली आघाडी मजबूत केली. पहाडी मुलखातून मिळणारा महसूल बंद झाल्यामुळे बादशहा औरंगजेब संतापला. त्याने गुरू गोविंदसिंगांचा बंदोबस्त करण्याचे ठरविले. मात्र यावेळी

बादशहा औरंगजेब मराठ्यांचे राज्य नष्ट करण्यासाठी धडपडत होता. परंतु मराठे त्यास दाद देत नव्हेत. यामुहे औरंगजेबास दक्षिणेतच थांबणे आवश्यक वाटत होते. म्हणून औरंगजेबाने गुरू गोविंदसिंगांच्या बंदोबस्ताची जबाबदारी लाहोरच्या सुभेदारावर सोपविली. यानुसार मुघलांनी आनंदपूरवर स्वारी केली पण शिखांकडून त्यांना पराभव पत्करावा लागला. मुघलांचा पराभव केल्यानंतर गुरू गोविंदसिंगांनी आनंदपूर भोवतालच्या प्रदेशात लोहगड, फत्तेगड, फुलगड, आनंदगड अशा भक्कम किल्ल्यांची बांधणी केली व आपला प्रदेश लष्करीदृष्ट्या सुरक्षित केला.

लाहोरच्या मुघल सुभेदाराचा झालेला दारुण पराभव व गुरू गोविंदसिंगांची लष्करी घौडदौड यामुळे बादशहा औरंगजेब संतापला. त्याने शहजादा मुअज्जम व अनेक रजपूत सरदार यांच्याबरोबर प्रचंड सैन्य देऊन गुरू गोविंदसिंगांच्या बंदोबस्तास पाठविले. मुघल सैन्याने आनंदपूरला वेढा दिला. परिस्थितीचा विचार करून गुरू गोविंदसिंगांनी बचावात्मक धोरणाचा अवलंब करून चमकौरचा किल्ल्याकडे प्रयाण केले. शिखांनी कडवी झुंज दिली. मात्र यामध्ये गुरू गोविंदसिंगांचे दोन पुत्र मारले गेले. परंतु गुरू गोविंदसिंगांना पराभूत करण्यात मुघलांना यश मिळाले नाही. दरम्यान दि. २० फेब्रुवारी १७०७ रोजी मराठ्यांची लढत देणारा बादशहा औरंगजेब अहमदनगर येथील भुईकोट किल्ल्यात मृत्यू पावला.

बादशहा औरंगजेबाच्या मृत्यूनंतर शहजादा बहादूरशहा व शहजादा मुअज्जम यांच्यामध्ये यादवी युद्ध झाले. गुरू गोविंदसिंगांनी बहादूशहाला मदत देऊ केली. यादवी युद्धात बहादूरशहा यशस्वी झाला. त्याने गुरू गोविंदसिंगांना १ लाख मोहरा दिल्या. दोघांमध्ये मैत्रीचे संबंध वाढीस लागले. बहादूशरहाच्या विनंतीवरून गुरू गोविंदसिंग दक्षिणेत आले. मराठ्यांच्या प्रमाणेच व मराठ्यांच्या मदतीने पंजाबमध्ये स्वराज्य निर्मितीचा त्यांचा मानस होता. परंतु तो सिद्धीस जावू शकला नाही. गोविंदसिंग नांदेड मुक्कामी असतानाच दोन पठाणांनी ते झोपेत असतानाच त्यांची हत्या केली. नांदेड येथे गुरू गोविंदसिंगांची समाधी आहे. शिखांचे हे दक्षिणेकडील पवित्र धर्मस्थळ होय.

शीख धर्मपंथामध्ये गुरू नानक ते गुरू गोविंदसिंग असे दहा गुरू झाले. यानंतर गुरू झाले नाहीत कारण दहावे गुरू गोविंदसिंग यांनी असा निर्णय घेतला की, ''यापुढे कोणी गुरू होणार नाही. शिखांनी येथून पुढे 'ग्रंथसाहेबास' शरण जावे व त्यातील उपदेशाप्रमाणे वागावे. गुरूग्रंथामध्ये आजवरच्या सर्व गुरूंची आत्मज्योत प्रकाशत आहे हे लक्षात ठेवावे.''

**बंदा बैरागी (इ. स. १७०७ ते १७१६) :**

बंदा बैरागी हा लढवैय्ये शीख धर्मियांचा मानदंड होय. तो मूळचा पंजाबचा होय. संसाराचा त्याग करून तो दक्षिणेत आला. गुरू गोविंदसिंग दक्षिणेत असताना बंदा बैरागी त्यांच्या सहवासात आला. गुरू गोविंदसिंगांनी त्यास शीख पंथाची दीक्षा देऊन एका महान कामगिरीसाठी त्याची निवड केली. त्याच्याबरोबर २५ शिष्य देण्यात आले. पंजाबमधील प्रमुख सरदारांना खलिते पाठवून बंदा बैरागी याचे नेतृत्त्व स्विकारण्याची आज्ञा करण्यात आली. गुरू गोविंदसिंगांच्या पाठिंब्यामुहे बंदा बैरागीने ४० हजारांची फौज उभी केली. बंदास गुरू तेजबहादूर यांच्या खुनाचा तसेच गुरू गोविंदसिंगांच्या दोन मुलांच्या खुनाचा बदला घ्यावयाचा होता.

बंदा बैरागीने मुलकी व लष्करी प्रशासन यंत्रणा अद्ययावत करण्याचा प्रयत्न केला. त्याने शिखांचे एक नाणे

काढले. त्याच्या एका बाजूस 'गुरू गोविंदसिंग जय' असे कोरले तर दुसऱ्या बाजूस गुरू नानक व गुरू गोविंदसिंग यांचे ऋण व्यक्त करण्यात आले. बंदाने ३/४ पंजाब आपल्या वर्चस्वाखाली आणला व या प्रांतातील जमीनदार पद्धत नष्ट केली. मुघल बादशहा औरंगजेब याचा सरहिंदचा सुभेदार वजीरखान याने गुरू गोविंदसिंगांच्या दोन मुलांना ठार केले होते. त्यास बंदा बैरागीने पकडले व त्यास ठार केले. सरहिंद उद्‌ध्वस्त केले. यावेळी मुस्लिमांची जी कत्तल करण्यात आली त्यामुळे पंजाबमधील मुस्लिमांनी शिखांची मोठी धास्ती घेतली.

बंदाने मुघलांना दिलेल्या आव्हानांचा सामना करण्यासाठी बादशहा बहादूरशहाने त्याच्यावर मोठी फौज पाठविली. बंदाने मुघलांना जेरीस आणले होते. तो हार जात नव्हता. मुघलांनी प्रसंगावधान साधून बंदा गुरूदासपूरच्या किल्ल्यात असतानाच त्या किल्ल्यास वेढा दिला. शीखांच्या पुढे रसदेचा प्रश्न निर्माण झाला. अन्नपाण्यावाचून मरण्यापेक्षा वीरमरण पत्करण्याचा निर्णय बंदा बैरागीने घेतला. तो ससैन्य बाहेर पडला. बलाढ्य मुघली सेनेसमोर त्याचा निभाव लागला नाही. मुघल सेनेशी लढता लढता बंदा बैरागी मारला गेला. (१९ जून, १७१६) यावेळी ५०० शीख सैनिकांना कैद करण्यात आले. या सैनिकांचे आतोनात हाल करण्यात आले. यावेळी प्रत्येक सैनिकास विचारण्यात आले की, 'तू मुसलमान होणार असशील तर तुझी सुटका होईल अन्यथा मारले जाईल.' अशा जीवन मरणाच्या प्रसंगात एकाही शीख सैनिकांने जीवाला घाबरून मुसलमान धर्म स्वीकारला नाही. यावरून शिख धर्मियांमधील जाज्वल्य क्षत्रियत्व दिसून येते.''

लढवय्या शिखांचा धोका ओळखून बादशहा फार्रुखशियर यांनी एक आदेश काढला त्यात ते म्हणतात, ''ज्या मुघल अधिकाऱ्यांच्या हातात शीख सापडेल त्याला त्याने मुसलमान तरी करावे नाही तर ठार तरी मारावे.'' यामुळे शीख धर्मियांची मोठी कोंडी झाली. गुरू अर्जुनसिंग, गुरू गोविंदसिंग यांनी जागृत केलेला क्षत्रिय धर्म शिखांना स्वस्थ बसू देत नव्हता. त्यांनी शिख खालसा पंथांच्या माध्यमातून शीख धर्मियांचे संघटन केले. शिखांनी इ. स. १७६९ मध्ये सर्व पंजाब आपल्या वर्चस्वाखाली आणला. मुघल विरोधाला न जुमानता शीख धर्मियांनी आपल्या स्वतंत्र राज्याची निर्मिती केली.

**स्वयंअध्ययन प्रश्न २ :**

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१) 'स्त्री हा मानवसृष्टीचा मूलाधार आहे' असे ................ नी प्रतिपादन केले.

(अ) गुरू अर्जुनसिंग (ब) गुरू हरगोविंद

(क) गुरू नानक (ड) गुरू अंगद

२) 'चारही वर्णीयांच्या माणसांना आपण सिंह बनवून मुघलांना नष्ट करू' असे ................ नी म्हटले.

(अ) गुरू तेजबहादूर (ब) गुरू अर्जुनसिंग

(क) गुरू हरगोविंद (ड) गुरू हरकिसन

३) शीख पंथीयांची खालसा संघटना ................ नी स्थापन केली.

(अ) गुरू तेजबहादूर (ब) गुरू गोविंदसिंग

(क) गुरू हरगोविंद (ड) गुरू अमरदास

४) गुरू गोविंदसिंग यांची समाधी ................ येथे आहे.

(अ) अमृतसर (ब) पाटणा

(क) आनंदपूर (ड) नांदेड

**(ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) गुरू अंगद यांनी गुरूनानकांचे चरित्र लिहीण्याची आज्ञा कोणास केली?

२) शिखांचे दहावे गुरू कोण?

३) गुरुनानक यांचा जन्मदिन सांगा.

४) सरहिंदचा मुघल सुभेदार वजीरखान यांस कोणी ठार केले?

## ४.२.३ तत्त्वज्ञान आणि वारसा :

**गुरू नानक व ग्रंथसाहेब :**

गुरू नानकांनी शीख धर्माची स्थापना केली. गुरू नानकांच्या अनुयायांना शिष्य म्हणजेच 'शीख' असे संबोधले जाते. गुरू नानकांनी देश विदेशात भ्रमंती केली. अनेक तिर्थस्थळांना भेटी दिल्या. अखेरीस त्यांनी आपले जीवन गुरुदासपूर जिल्ह्यातील करतारपूर येथे व्यथीत केले. गुरू नानकांचे विचार शिखांचा 'आदिग्रंथ' म्हणजेच 'ग्रंथसाहेब' या पवित्र धर्मग्रंथात संकलीत करण्यात आले आहेत.

गुरू नानक म्हणतात, संसारी सुखात राहूनही मोक्ष मिळविता येतो. त्यांनी समतेवर भर देत जातीयता व अस्पृश्यतेवर कठोर टिका केली. सर्व मानव समान आहेत यावरती त्यांचा भर होता. स्त्री ही मानवसृष्टीचा मूलाधार असल्याने कुटूंब व समाजात स्त्रियांना सन्मानाची वागणूक मिळावयास हवी यावर त्यांनी भर दिला. हिंदू व मुस्लीम यांना एकत्र आणून नविन समाज उभा करणे हे गुरू नानकांचे ध्येय होते, पण ते पूर्णत्वास जावू शकले नाहीत.

**शीख धर्माचे तत्त्वज्ञान :**

गुरू नानकांपासून ते गुरू गोविंदसिंगापर्यंत शीख धर्मात दहा गुरू झाले. त्यांनी आपल्या आचार-विचारातून शीख धर्माला तत्त्वज्ञानाची बैठक प्राप्त करून दिली. शीख धर्म तत्त्वज्ञान 'ग्रंथसाहेब' (आदिग्रंथ) यामध्ये संग्रहित करण्यात आले आहे. शीख धर्म तत्त्वज्ञान पुढीलप्रमाणे -

१. सृष्टीचा निर्माता हा ईश्वर आहे.

२. ईश्वर अनादी, अनंत, स्वयंभू व अद्वितीय असा आहे.

३. अवतार म्हणजे ईश्वर नाही.

४. ईश्वराचे नामस्मरण नित्य-नियमाने करावे.

५. ईश्वराचे नामस्मरण नि:स्वार्थ भावनेने करावे.

६. सततच्या नामस्मरणाने आत्मोन्नती होते. हा मोक्षप्राप्तीचा मार्ग होय.

७. ईश्व साधनेसाठी व मोक्षाप्रत जाण्यासाठी संन्यास घेण्याची आवश्यकता नाही.

८. शीख धर्मीयांनी गुरुद्वारामध्ये नित्यनेमाने जावे व सत्संगाचा लाभ घ्यावा.

९. संसार, प्रपंच करणे ही एकप्रकारे ईश्वरसेवाच होय.

१०. स्त्री हा मानवसृष्टीचा मूलाधार आहे.

११. प्रत्येक शिखाने गुरूनिष्ठा अगी बाणवावी.

१२. सद्‌गुरू हा ज्ञानमय असून त्याचे स्मरण हे परमार्थाचे साधन होय.

१३. जीवनातील सर्व संकटांचा निर्भयपणे सामना करावा.

१४. मृत्यूला निर्भयपणे सामोरे जावे ते नव्या जीवनाचे प्रवेशद्वार आहे.

१५. मानवता धर्म हा ईश्वरी शिकवणुकीचा पाया आहे.

शीख धर्माचे तत्त्वज्ञान मानवतावादावर भर देणारे असून ते सर्वांना आचरण्यास साधे व सोपे आहे.

**शीख धर्माची आचारसंहिता :**

शीख धर्मामध्ये गुरू नानक ते गुरू गोविंदसिंग असे दहा गुरू झाले. त्यांच्या आचार-विचारांच्या माध्यमातून शीख धर्मीयांनी आचारसंहिता बनविली आहे. सर्वसामान्यांना पेलवेल असा आचारधर्म यामध्ये सांगितला आहे. शीख धर्मीय व्यक्तिगत नियमावली म्हणून तिचा अवलंब करतात.

१. नित्यनेमाने ईश्वरी नामस्मरण करावे.

२. गुरुद्वारामध्ये नियमित जावे, कारण तो ईश्वर प्राप्तीकडे जाणारा मार्ग होय.

३. मन शुद्ध व पवित्र ठेवावे.

४. राग, द्वेष, मद, मोह, मत्सर या विकारांचा त्याग करावा.

५. जीवन संयमित व संतुलित असावे.

६. स्त्रियांचा आदर करावा.

७. विश्वव्यापकता अंगी बाणवावी.

८. साधुसंतांच्या सहवासात राहावे, सत्संगात वाढ करावी.

९. मनावर संयम ठेवावा.

१०. वाणीवर संयम ठेवावा.

११. जनसेवा हीच ईश्वरसेवा समजून काम करावे.

१२. समाजकल्याणाचा विचार सतत मनी धरावा.

१३. श्रेष्ठ, कनिष्ठ असा भेदभाव मानू नये.

१४. अंधश्रद्धा, कर्मकांड, त्याज्य रुढी यांचा त्याग करावा.

१५. दोन शीख एकमेकांना भेटताना 'सत्‌श्रीअकाल' असे म्हणावे.

**चार धर्मपीठे :**

अमृतसर, पाटणा, आनंदपूर व नांदेड ही शिखांची चार धर्मपीठे होत. शिखांचा प्रमुख गुरूद्वारा अमृतसर येथे आहे. गुरू रामदास यांच्या कालखंडात अमृतसर सरोवराचे खोदकाम सुरू झाले. गुरू अर्जुनसिंगांच्या काळात ते पूर्णत्वास गेले. या सरोवराच्या मध्यभागी सुवर्णमंदिराची उभारणी करण्यात आली. सुवर्णमंदिरात शिखांचा पवित्र धर्मग्रंथ 'ग्रंथसाहेब' ठेवण्यात आला आहे. पाटणा हे गुरू गोविंदसिंगांचे जन्मस्थळ होय. आनंदपूर येथे गुरू गोविंदसिंगानी खालसा पंथाची स्थापना केली तसेच येथे पंचप्यारेंची परीक्षा घेतली. तर नांदेड येथे गुरू गोविंदसिंगांची समाधी आहे. त्यामुळे ही ठिकाणे शिखांची चार धर्मपीठे होत.

चार धर्मपीठाप्रमाणेच लाहोर-दयारामचे जन्मस्थळ, दिल्ली-गुरू तेजबहादूरांची समाधी, द्वारका-मोहनचंदाचे आत्मबलिदान, तर जगन्नाथपुरी-हिंमतराय व बिदर जगन्नाथाची कर्मभूमी असल्याने शीख धर्मियांची ही धार्मिक स्थळे महत्वाची आहेत. शीख धर्मियांचा वारसा या धर्मस्थळांच्या माध्यमातून पहावयास मिळतो.

**शीख आणि क्षात्रधर्म :**

गुरू नानकांनी स्थापन केलेल्या शीख धर्माच्या प्रसाराचे कार्य शीख धर्मगुरूंनी पार पाडले. गुरू अंगद यांनी गुरुमुखी सर्वसामान्यापर्यंत पोहचविली. गुरू अमरदासांनी शीख समाज संघटीत करण्यासाठी २२ विभाग निर्माण केले. तर गुरू हरिराय यांनी धर्मप्रसारासाठी ३६० गाद्या / धर्मकेंद्रांची निर्मिती केली. शीख धर्मगुरूंच्या कार्यामुळे शीख धर्म पंजाब, पश्चिम व उत्तर भारतात प्रसार पावला.

शिख समाज लढवय्या म्हणून ओळखला जातो. त्यांच्यात क्षात्रधर्म जागृत करण्याचे कार्य शिख धर्मगुरूंनी केले. गुरू अर्जुनसिंग यांनी शिख समाजाचे संघटन करून त्यांना क्षात्रधर्माची दिक्षा दिली. गुरू गोविंदसिंगांनी 'ज्याचे शस्त्र त्याचे राज्या, ज्याचे शस्त्र त्याचा धर्म' या धोरणानुसार सैन्याची उभारणी केली. गुरू गोविंदसिंगांनी वडिलांच्या हत्येचा सूड घेण्यासाठी शिखांचे संघटन केले. शिख पंथियांची लढाऊ खालसा संघटना निर्माण केली. गुरू गोविंदसिंगांच्या धोरणानुसारच शिख पंथियांनी ५'क्ष' वापरण्यास सुरवात केली. पुढे बंदा बैरागीने तर गुरू गोविंदसिंगांच्या पाठिंब्यावर ४० हजाराची फौज उभी केली. बंदाने मुलकी व लष्करी व्यवस्था निर्माण करून ३/४ पंजाब आपल्या वर्चस्वाखाली आणला. शिखांचा कट्टर विरोधक सरहिंदचा मुघल सुभेदार वजीरखान यास ठार केले. सरहिंद उद्‌ध्वस्त केले. पुढे मुघल-शिख संघर्षात बंदा ठार झाला. शिखांची हालाखीची परिस्थिती निर्माण झाली. परंतु गुरू अर्जुनसिंग, गुरू गोविंदसिंग यांनी शिखांच्यामध्ये जागृत केलेला क्षात्र धर्म त्यांना स्वस्थ राहू देत नव्हता. त्यांनी खालसा पंथांच्या माध्यमातून शिखांना पुन्हा संघटीत केले. मुघलांच्या विरोधाला न जुमानता इ. स. १७६९ मध्ये सर्व पंजाब आपल्या वर्चस्वाखाली आणून स्वतंत्र पंबाज राज्याची निर्मिती केली. शिखांच्यामधील क्षात्रधर्म भारतवर्षाला अभिमान वाटावा असाच आहे.

**शिखांचे उत्सव दिन :**

शिखांच्या उत्सव दिनामध्ये प्रामुख्याने खालील उत्सव दिनांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे.

१. गुरू नानक जयंती - २६ नोव्हेंबर

२. गुरू गोविंदसिंग यांची जयंती

३. अमृतदीक्षा दिन

४. गुरू अर्जुनसिंगांचा बलिदान दिन

वरील घटनांचा आढावा घेतल्यानंतर आपणास असे म्हणता येईल की शीख धर्माचे तत्त्वज्ञान सर्वांना आचरता येईल असे आहे. तर वारसा उज्ज्वल, क्षात्रधर्म व राष्ट्रप्रेम वृद्धींगत करणारा आहे.

**स्वयंअध्ययन प्रश्न ३ :**

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१) संसारी सुखात राहूनही मोक्ष मिळविता येतो असे ................ नी म्हटले.

(अ) गुरू अमरदास (ब) गुरू रामदास
(क) गुरू नानक (ड) गुरू अर्जुनसिंग

२) दयारामचे जन्मस्थळ ................ होय.

(अ) लाहोर (ब) द्वारका
(क) जगन्नाथपुरी (ड) बिदर

३) गुरुमुखी सर्वसामान्यापर्यंत पोहचविण्याचे काम ................ नी केले.

(अ) गुरू अमरदास (ब) गुरू अंगद
(क) गुरू हरिराय (ड) गुरू हरकिशन

४) शीख धर्मप्रसारासाठी ................ यांनी ३६० गाद्या तयार केल्या.

(अ) गुरू अंगद (ब) गुरू हरिराय
(क) गुरू अमरदास (ड)गुरू हरगोविंद

**(ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) शिख धर्माचे तत्त्वज्ञान कोणत्या ग्रंथात संग्रहीत करण्यात आले आहे?

२) दोन शीख एकमेकांना भेटताना काय म्हणतात?

३) शिखांची चार धर्मपीठे सांगा.

४) शीख समाज संघटीत करण्यासाठी २२ विभाग कोणी निर्माण केले?

## ४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :

**१) शिख =** शिख या शब्दाचा अर्थ शिष्य होय. गुरू नानकांच्या अनुयायांना शिष्य म्हणजेच शीख असे संबोधले जाते.

**२) ग्रंथसाहेब =** गुरू नानकांनी आपल्या शिष्यांना जो उपदेश केला गेला तो ग्रंथरूपात संग्रहित केला तो म्हणजेच शिखांचा पवित्र धर्मग्रंथ 'ग्रंथसाहेब' होय.

**३) ५'क' The Five 'Ks' =** Kes - Longhair, Kanga - a - Comb, Kripan - a - Sword, Kacch - shorts, Kara - Steel bracelet.

**४) चारधर्मपीठे =** चार धर्मपीठे म्हणजे अमृतसर शिखांचा मुख्य गुरूद्वारा, पाटणा - गुरू गोविंदसिंगाचे जन्मस्थळ, आनंदपूर - गुरू गोविंदसिंगाकडून खालसा पंथाची स्थापना व नांदेड - गुरू गोविंदसिंगाची समाधी ही होत.

**५) पंचप्यारे =** गुरू गोविंदसिंगानी आनंदपूर येथे धर्मासाठी प्राण देण्यास कोण तयार आहे? अशी परीक्षा घेतली. यामध्ये दयाराम, जगन्नाथ, धरमचंद, सोहबचंद व हिम्मतराय हे यशस्वी झाले. त्यांना गुरू गोविंदसिंगानी अमृतदिक्षा दिली.

## ४.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

### स्वयंअध्ययन प्रश्न १ :

**(अ)** १) अ) अमृतसर
२) ड) गुरू रामदास
३) ब) गुरू रामदास
४) क) गुरू हरगोविंद
५) क) आनंदपूर

**(ब)** १) शीख धर्माची स्थापना गुरू नानकांनी केली.
२) शीख धर्मग्रंथाचे नाव 'ग्रंथसाहेब' होय.
३) 'अमृतसर' सरोवराचे खोदकाम गुरू अर्जुनसिंग यांच्या काळात पूर्णत्त्वास गेले.
४) दयाराम, जगन्नाथ, धरमचंद, सोहबचंद, हिंमतराय हे शीख पंथातील पंचप्यारे होत.
५) शिखांची प्रमुख धार्मिक केंद्रे अमृतसर, पाटणा, आनंदपूर, नांदेड ही होत.

### स्वयंअध्ययन प्रश्न २ :

**(अ)** १) क) गुरू नानक
२) अ) गुरू तेजबहादूर
३) ब) गुरू गोविंदसिंह
४) ड) नांदेड

**(ब)** १) गुरू अंगदांनी बाला या आपल्या शिष्यास गुरू नानकांचे चरित्र लिहण्याची आज्ञा केली.

२) गुरू गोविंदसिंग ह शिखांचे दहावे गुरू होत.

३) २६ नोव्हेंबर १४६९ हा गुरू नानकांचा जन्मदिन होय.

४) सरहिंदचा मुघल सुभेदार वजीरखान यांस बंदा बैरागी याने ठार केले.

**स्वयंअध्ययन प्रश्न ३ :**

**(अ)** १) क) गुरू नानक

२) अ) लाहोर

३) ब) गुरू अंगद

४) ब) गुरू हरिराय

**(ब)** १) शीख धर्माचे तत्त्वज्ञान 'ग्रंथसाहेब' या धर्मग्रंथात संग्रहीत करण्यात आले आहे.

२) दोन शीख एकमेकांना भेटतात तेव्हा ते 'सत्‌श्रीअकाल' असे म्हणतात.

३) अमृतसर, पाटणा, आनंदपूर व नांदेड ही शिखांची चार धर्मपीठे होत.

४) शीख समाज संघटीत करण्यासाठी गुरू अमरदास यांनी २२ विभाग निर्माण केले.

## ४.५ सारांश :

गुरू नानकांनी शीख धर्माची स्थापना करून शीख धर्माला वैचारिक बैठक प्राप्त करून दिली. गुरू नानकांचे विचार 'ग्रंथसाहेब' या ग्रंथामध्ये संग्रहीत करण्यात आले. पुढील काळात गुरू अंगद, गुरू अमरदास, गुरू हरिराय, गुरू तेजबहादूर, गुरू रामदास यांनी शीख धर्मप्रसारावर भर दिला. शिखांच्यामध्ये क्षात्र धर्म जागृत करण्याचे कार्य गुरू अर्जुन, गुरू हरगोविंद, गुरू गोविंदसिंग, बंदा बैरागी इत्यादींनी केले. अमृतसर, पाटणा, आनंदपूर व नांदेड ही शिखांची चार धर्मपीठे होत. तर शिखांच्या इतर धार्मिक केंद्रात लाहोर, दिल्ली, द्वारका, जगन्नाथपुरी, बिदर यांचा समावेश होतो.

गुरू नानकापासून ते गुरू गोविंदसिंगापर्यंत शीख धर्मात एकूण १० गुरू झाले. गुरू गोविंदसिंगच्या आज्ञेनुसार शीख धर्मीय शिखांचा पवित्र ग्रंथ 'ग्रंथसाहेबास' गुरू मानतात व त्यानुसार आपले आचरण ठेवतात. शीख धर्मगुरूंनी शीख समाज संघटित केला. त्यांच्यातील क्षात्र धर्म जागृत केला. त्यांच्या कार्यामुळे पंजाब व उत्तर भारतात शीख धर्मप्रसार झाला.

शीख धर्मगुरूंच्या आचार-विचारातून शीख धर्माला तत्त्वज्ञानाची बैठक प्राप्त झाली. शीख धर्माचे तत्त्वज्ञान 'ग्रंथसाहेब' या ग्रंथात संग्रहीत करण्यात आले आहे. शीख धर्म मानवतावादावर भर देतो. स्त्रियांचा सन्मान करतो. जातीभेद पाळत नाही. शीख धर्म सांगतो सृष्टीचा निर्माता ईश्वर असून नित्य-नियमाने व नि:स्वार्थपणे ईश्वराचे स्मरण करावे. गुरुद्वारामध्ये नित्त-नियमाने जावे. शीख धर्माची आचारसंहिता पाळावी.

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय :

**प्रश्न २ : टिपा लिहा.**

१) गुरू नानक

२) गुरू गोविंदसिंग

३) बंदा बैरागी

४) शिखांची धार्मिक केंद्रेव गुरूद्वारा

५) शीख धर्माचे तत्त्वज्ञान

**प्रश्न ३ : दीर्घोत्तरी प्रश्न.**

१) शीख धर्माचे स्वरूप आणि रचना स्पष्ट करा.

२) शीख पंथातील गुरूंच्या कार्याचा आढावा घ्या.

३) शीख धर्माचे तत्त्वज्ञान व वारसा विशद करा.

४) शीख धर्म तुमच्या शब्दात विशद करा.

## ४.७ संदर्भ ग्रंथ :


१) कृ. ना. चिटणीस : 'मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था', खंड १ ते ४

२) डॉ. पी. एन. शिंदे, डॉ. विश्वनाथ पवार : 'मुघलकालीन भारताचा इतिहास'.

३) इरफान हबीब (संपा.) : 'मध्यकालीन भारत'

४) आर. के. सक्सेना : 'मुघल शासनप्रणाली'

५) एस. एस. गाठाळ : 'भारताचा इतिहास'

६) ए. एल. श्रीवास्तव (अनु.) : 'सम्राट अकबर'

७) न. वि. गाडगीळ : 'शिखांचा तिहास'

८) सोमनाथ रोडे : 'शिखांचा इतिहास'

९) W. H. Moreland : 'Akbar to Aurangzeb'

१०) I. H. Qureihi : 'The Administration of The Mughal Empire'.


❑❑❑